अकोला । शुक्रवार
दि. २७ जून २०२५
वर्ष : १९ अंक : ११७
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

## नमस्कार 'फ्रॉम स्पेस'!

» शुभांशू शुक्ला अंतराळात दाखल!
» भारताची अभिमानास्पद झेप



**न्यूयॉर्क, दि. २६ वृत्तसंस्था**

भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर गुरुवारी दुपारी ४:०१ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात सुखरूप दाखल झाले आहेत. हे सर्व अंतराळवीर सुमारे २८ तासांच्या प्रवासानंतर आयएसएसमध्ये पोहोचले आहेत. दरम्यान, ॲक्सिओम स्पेसने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये शुभांशू यांनी त्यांच्या अंतराळ प्रवासाच्या रोमांचक अनुभवाचे वर्णन केले.

व्हीडीओमध्ये शुभांशू म्हणतात, नमस्कार फ्रॉम स्पेस. मला खूप अभिमान वाटतोय. माझ्या खांद्यावरचा तिरंगा सांगत होता की, सर्व देशवासी माझ्यासोबत आहेत. भारताच्या मानवी अंतराळ उड्डाणासाठी हे एक मोठे पाऊल आहे. अंतराळ प्रवास हा माझ्यासाठी स्वप्नासारखा अनुभव आहे. प्रक्षेपणानंतर जेव्हा मी पृथ्वी पाहिली, तेव्हा असे वाटले की, जणू एखाद्या चित्रकाराने निळे आणि हिरवे रंग मिसळून कॅनव्हास बनवला आहे. ड्रॅगन अंतराळयान प्रक्षेपणानंतर १० मिनिटांनी रॉकेटपासून वेगळे झाले, तेव्हा मला खिडकीतून सूर्याची चमक आणि तारे दिसले. माझ्यासाठी ते अविश्वसनीय होते. हा माझा प्रवास नाही, तर भारताच्या अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात आहे. माझ्याद्वारे तुम्हीही या प्रवासाचा पुरेपूर आनंद घ्या. हे एक नवीन आणि आव्हान वातावरण आहे. मी माझ्या सहकारी अंतराळवीरांसोबत हा अनुभव खूप एन्जॉय करत आहे. आम्ही तुम्हाला जॉय आणि ग्रेस दाखवले. हे एक हंस असून एक महत्त्वाचे प्रतीक आहे. ते खूप गोंडस दिसते, आपल्या भारतीय संस्कृतीत हंस बुद्धिमत्तेचे प्रतीक आहे. मला वाटते की पोलंड, हंगेरी आणि (पान २ वर)

## थोडक्यात

### दुचाकी चालकांकडून टोल घेणार नाही–गडकरी



**मुंबई :** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून १५ जलै २०२५ पासून दुचाकी वाहन चालकांकडून टोल वसूल करण्यात येईल, अशा प्रसारमाध्यमात बातम्या गेल्या काही दिवसांपासून झळकत होत्या. त्यामुळे दुचाकी वाहनचालक संभ्रमात पडलेले आहेत. मात्र या बातम्या केवळ अफवा असून दुचाकी चालकांकडून कोणत्याही प्रकारे टोल घेतला जाणार नाही, असे केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली. त्यामुळे दुचाकीस्वार वाहनचालकांनी आनंद व्यक्त केला आहे. अशा बातम्यांवर विश्वास ठेऊ नका, असं नितीन गडकरी यांनी आपल्या सोशल मीडियाच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. गडकरी म्हणाले की, काही माध्यमांद्वारे राष्ट्रीय महामार्गांवर दुचाकी वाहनांकडून टोल वसूल केला जाणार आहे, अशा दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवल्या जात आहेत. परंतु, असा कोणताही निर्णय झाला नाही. दुचाकी वाहनांना टोल शुल्कातून सूट देण्यात आली. सत्य जाणून न घेता दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवू नयेत. मी अशा माध्यमांचा निषेध करतो.

### राज ठाकरेंनी मोर्चाची तारीख बदलली



**मुंबई :** हिंदी भाषा सक्ती या मुद्द्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी भाषा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेच्या रक्षणासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. यापूर्वी ६ जुलै २०२५ रोजी नियोजित असलेला त्रिभाषा सूत्राविरोधी मोर्चा आता एक दिवस आधी, म्हणजेच शनिवार, ५ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता काढण्यात येणार आहे. यासोबतच, दोन स्वतंत्र मोर्चांऐवजी एकच संयुक्त मोर्चा काढण्यासाठी मनसेने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (उबाठा) पक्षाशी चर्चा सुरू केली आहे. राज ठाकरे यांनी सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि मराठी जनतेला या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## अहमदाबाद विमान अपघात

# ब्लॅक बॉक्स डेटा झाला रिकव्हर!

### अपघाताचे कारण निश्चित करण्यात होईल मदत

**अहमदाबाद, दि. २६ वृत्तसंस्था**

१२ जून रोजी अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानाच्या ब्लॅक बॉक्समधील डेटा रिकव्हर करण्यात आला आहे. गुरुवारी एका सरकारी निवेदनात म्हटले आहे की, डेटा डाउनलोड करण्यात आला आहे. मेमरी मॉड्यूलचा ॲक्सेस देखील मिळवण्यात आला आहे. आता तपास यंत्रणा ब्लॅक बॉक्समधून मिळालेल्या डेटाचे विश्लेषण करेल. यामुळे अपघाताची कारणे उघड होतील.

एअर इंडियाचं विमान नेमकं कशामुळे दुर्घटनाग्रस्त झालं?




शेवटच्या क्षणी नेमकं कॉकपिटमध्ये काय घडलं? वैमानिकानं अपघात टाळण्यासाठी नेमके कोणते प्रयत्न केले? दोन्ही वैमानिकांमध्ये काय संवाद झाला? या आणि अशा सर्व प्रश्नांची उत्तरं या ब्लॅक बॉक्समधून शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुर्घटनेत या ब्लॅक बॉक्सचं काहीसं नुकसान झाल्यामुळे त्यातील माहितीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झालं होतं. मात्र, त्यातील माहिती यशस्वीरीत्या डाऊनलोड करण्यात आल्याचं केंद्रीय मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे. यापूर्वी २४ जून रोजी नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितले होते की, ब्लॅक बॉक्स तपासासाठी परदेशात पाठवला जात नाही. एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो त्याची चौकशी करत आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, अपघातग्रस्त विमानातून दोन ब्लॅक बॉक्स (आणि) संच सापडले आहेत. यामध्ये अपघाताच्या वेळी वैमानिकांच्या संभाषणाचा रेकॉर्ड आणि विमानाची तांत्रिक माहिती असेल. पहिला संच १३ जून रोजी आणि दुसरा १६ जून रोजी सापडला. एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो प्रमुखांच्या नेतृत्वाखालील एक बहु-विद्याशाखीय पथक या विमान अपघाताची चौकशी करत आहे. अधिकाऱ्यांच्या मते, तपासाचा एक भाग म्हणून (पान २ वर)

ब्लॅक बॉक्स हे विमानात बसवलेले एक छोटे उपकरण आहे. ते उड्डाणादरम्यान विमानाची तांत्रिक आणि आवाजाशी संबंधित माहिती रेकॉर्ड करते. ब्लॅक बॉक्स दोन मुख्य रेकॉर्डरने बनलेला असतो. कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर वैमानिकांचे संभाषण रेकॉर्ड करतो. त्याच वेळी, फ्लाइट डेटा रिकव्हरी विमानाची तांत्रिक माहिती जसे की वेग, उंची, इंजिन कामगिरी रेकॉर्ड करते. ब्लॅक बॉक्स नावाबद्दल बऱ्याच गोष्टी बोलल्या जातात. रिपोर्ट्सनुसार, त्याचा आतील भाग काळा होता, म्हणून त्याला हे नाव पडले. दुसरे मत असे आहे की अपघातानंतर आगीमुळे त्याचा रंग काळा झाला, म्हणून लोकांनी त्याला ब्लॅक बॉक्स म्हणायला सुरुवात केली.

## हसन मुश्रीफांना मोठा दिलासा!

### ईडीने दाखल केलेल्या गुन्ह्यात क्लीन चिट

**कोल्हापूर, दि. २६ वृत्तसंस्था**

वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांना सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्यातील कथित ४० कोटी रुपयांच्या आर्थिक अफरातफर प्रकरणात क्लीन चिट देण्यात आली आहे. मुरगूड पोलिसांनी या प्रकरणात कागल न्यायालयात क्लोजर रिपोर्ट दाखल केला आहे. या रिपोर्टच्या आधारे मुश्रीफ यांची गुन्हा रद्द करण्यासाठी दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने निकाली काढली



आहे. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. दरम्यान, गुन्हा रद्द झाल्याने मुश्रीफ यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण याच गुन्ह्याच्या आधारे ईडीने गुन्हा दाखल केला होता. भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी २ वर्षांपूर्वी हसन मुश्रीफ यांच्यावर संताजी घोरपडे साखर कारखान्यामध्ये ४० कोटी रुपयांच्या आर्थिक अफरातफर झाली असल्याचे आरोप केले होते. या आरोपांनंतर कोल्हापुरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. मुश्रीफ यांच्यावर अटकेचीही टांगती तलवार होती. पुढे मुश्रीफ यांनी महायुतीत प्रवेश केला आणि शिंदे सरकार, फडणवीस सरकारमध्ये त्यांना वैद्यकीय शिक्षणमंत्री पद मिळाले.

## हिमाचलमध्ये ढगफुटी; धर्मशालामध्ये पुरात दोघांचा मृत्यू, ११ बेपत्ता!

**धर्मशाला, दि. २६ वृत्तसंस्था**

नैऋत्य मान्सून पश्चिम हिमालयीन क्षेत्रात आपले रौद्र रूप दाखवत आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. हिमाचलच्या कुलू आणि धर्मशाला जिल्ह्यांमध्ये पाच ठिकाणी ढगफुटी होऊन आलेल्या पुरात दोन जणांचा मृत्यू झाला आहे, तर ११ जण बेपत्ता आहेत. उत्तराखंडमध्ये केदारनाथ धाम यात्रा मार्गावर मोठे भूस्खलन झाले आहे. चीन सीमेला जोडणाऱ्या



रस्त्यावर दरड कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. जम्मूच्या कटरा येथील माता वैष्णोदेवी धाम यात्रा मार्गावरील हिमकोटी येथे दरड कोसळल्याने वाहतूक १० तास बंद होती. हिमाचल प्रदेशात बुधवारी मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळाबाबत हवामान खात्याने आधीच ऑरेंज अलर्ट जारी केला होता. अपेक्षेप्रमाणेच ढगांनी जोरदार वृष्टी केली. कुलू जिल्ह्यातील सैंज, गडसा, मनाली आणि बंजारच्या विविध भागांत ढगफुटीच्या घटना घडल्या. सैंजच्या रैला बिहालमध्ये ढगफुटीमुळे तीन जण वाहून गेले आहेत. धर्मशालाच्या खनियारा येथील मनूणी खड्यातढगफुटीमुळे आलेल्या पुरात निर्माणाधीन जलविद्युत प्रकल्पाचे १० हून अधिक मजूर वाहून (पान २ वर)

## अबुझमाडच्या जंगलात चकमकीत दोन महिला नक्षलवादी ठार

**छत्तीसगड, दि. २६ वृत्तसंस्था**

राज्यातील अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या अबुझमाडच्या जंगलात नक्षलवाद्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. सुरक्षा दल आणि नक्षलवादी यांच्यात आज झालेल्या भीषण चकमकीत दोन महिला नक्षलवादी ठार झाल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरक्षा दलाकडून अबुझमाडच्या घनदाट जंगलात नक्षलवाद्यांविरोधात विशेष मोहीम राबवली जात आहे. याच मोहिमेदरम्यान, जवानांचा नक्षलवाद्यांशी सामना झाला आणि दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार सुरू झाला. चकमकीनंतर परिसरात राबवण्यात आलेल्या शोध मोहिमेदरम्यान (सर्च ऑपरेशन)



या दोन्ही महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह जवानांच्या हाती लागले. घटनास्थळाची पाहणी केली असता, मृतदेहांजवळून एक रायफल, काही इतर शस्त्रे, वैद्यकीय साहित्य आणि दैनंदिन वापराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. परिसरात अजूनही चकमक सुरूच असून, आणखी काही नक्षलवादी सुरक्षा दलाच्या निशाण्यावर असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या कारवाईमुळे नक्षलवादी चळवळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

## महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून मुंबईत

**मुंबई, दि. २६ वृत्तसंस्था**

महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलै २०२५ या कालावधीत मुंबईत होणार आहे. या अधिवेशनात शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती आणि शक्तीपीठ महामार्ग या मुद्द्यांवरून विरोधक महायुती सरकारला घेरण्याची शक्यता आहे. अधिवेशनापूर्वी २९ जूनला चहापानाचा कार्यक्रम होईल, पण विरोधक त्यास उपस्थित राहतील की नाही, हे पाहावे लागेल.

विधानभवनात झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशनाच्या तारखा निश्चित झाल्या. बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मंत्री चंद्रकांत पाटील, आशिष शेलार, छगन भुजबळ, गिरीश महाजन, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य



### हिंदी सक्तीचा वाद

» राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, राज्य सरकारने त्रिभाषा धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला होता. यानुसार, शाळांमध्ये पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याचे ठरले, ज्यात तिसऱ्या भाषेसाठी हिंदी सक्तीची होती. प्रचंड टीकेनंतर सरकारने ही सक्ती मागे घेतली, पण अपुरी शिक्षकसंख्या आणि अन्य कारणांमुळे हिंदीला प्रोत्साहन देणारे धोरण स्वीकारले. मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्यासह विरोधकांनी याला तीव्र विरोध केला आहे. या मुद्द्यावर अधिवेशनात जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

दीपक केसरकर, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, अमीन पटेल, भाई जगताप, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, श्रीकांत भारतीय आणि सचिव जितेंद्र भोळे उपस्थित होते. या अधिवेशनात विरोधक (पान २ वर)

तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी
आणि अजिंक्य भारत प्रस्तुत
वटपौर्णिमा उत्सव
भरपूर बक्षिसांची लय लूट!





महिलांसाठी वटपौर्णिमा विशेष स्पर्धा
रांगोळी स्पर्धा
मेहंदी स्पर्धा
वटपौर्णिमा महत्व कथन स्पर्धा
थाळी सजावट स्पर्धा
वेशभूषा स्पर्धा
नृत्य स्पर्धा
शनिवार दि. २८ जून २०२५ । वेळः दुपारी १:०० वाजता
स्थळ : खंडेलवाल भवन आळशी प्लॉट, अकोला.
प्रेक्षक महिलांसाठी देखील बक्षीस जिंकण्याची सुवर्णसंधी!
सांस्कृतिक रंग आणि आनंदाची पर्वणी तुमच्यासाठी घेऊन येत आहोत!
सर्व महिलांनी आवर्जून उपस्थित राहावे!
अधिक माहितीसाठी संपर्क
कु. आकांक्षा गोमासे 9284536052
सौ. सुचिता घोगरे 7875155586
Powered by

# पान 1 वरून...

## अहमदाबाद विमान अपघात...

कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर आणि फ्लाइट डेटा रेकॉर्डरचे विश्लेषण सुरू करण्यात आले आहे. पुढील ब्लॅक बॉक्समधून क्रॅश प्रोटेक्शन मॉड्यूल सुरक्षितपणे ताब्यात घेण्यात आले असून, २५ जून २०२५ रोजी मेमरी मॉड्यूलमधील माहिती यशस्वीपणे मिळवण्यास सुरुवात केली आहे. त्याचा डेटा एएआयबी लॅबमध्ये डाउनलोड करण्यात आला आहे, असे नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे.

१२ जून रोजी लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान एआय-१७१ अहमदाबाद येथे उड्डाणानंतर लगेचच कोसळले. या घटनेत २४१ जणांचा मृत्यू झाला, तर एक प्रवासी बचावला. या घटनेत एकूण २७० जणांचा मृत्यू झाला. अहमदाबाद विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या २५१ जणांची डीएनएद्वारे ओळख पटवण्यात आली आहे. २४५ जणांचे मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सोपवण्यात आले आहेत. ही माहिती अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलचे अधीक्षक डॉ. राकेश जोशी यांनी २२ जून रोजी दिली. त्यांनी सांगितले की, ६ मृतदेह ब्रिटनमधील रहिवासी असलेल्या कुटुंबांचे आहेत. हे मृतदेह लवकरच त्यांच्या कुटुंबियांना सुपूर्द केले जातील.

## नमस्कार 'फ्रॉम स्पेस'...

भारतातही त्याचे प्रतीकात्मक महत्त्व आहे. हा योगायोग वाटेल, पण तसे नाही. याचा अर्थ यापेक्षा खूप जास्त आहे, असेही शुभांशू म्हणाले. दरम्यान, ॲक्सिओम मिशन-४ अंतर्गत चार अंतराळवीर बुधवारी दुपारी १२ वाजता आयएसएससाठी रवाना झाले. त्यांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटला जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमधून केनेडी स्पेस सेंटरमधून उड्डाण केले होते. तांत्रिक बिघाड आणि हवामानाच्या समस्यांमुळे हे मिशन ६ वेळा पुढे ढकलण्यात आले होते.

## हिमाचलमध्ये ढगफुटी...

गेले आहेत. आतापर्यंत दोघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. एसडीआरएफची पथके घटनास्थळी असून बचावकार्य सुरू आहे. सैंज खोऱ्यात वेगवेगळ्या ठिकाणी १५० हून अधिक वाहनांसह २,००० हून अधिक पर्यटक अडकले आहेत. सिउंडजवळ रस्ता खराब झाल्याने त्यांना बाहेर पडण्याचा मार्ग नाही. लाहौलमध्येही २५ पर्यटक अडकले आहेत. हवामान विज्ञान केंद्र सिमलाने हिमाचलच्या अनेक ठिकाणी मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे. २ जुलैपर्यंत बहुतांश भागांत हवामान असेच राहील. हवामान खात्याने पाच जिल्ह्यांतील काही भागांत पूर येण्याचा इशारा दिला आहे. २७ जून रोजी पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. राजस्थानमध्येही मान्सून सक्रिय झाला आहे. गेल्या २४ तासांत राज्यात मुसळधार पाऊस झाला आहे. सर्वाधिक १८० मिमी पावसाची नोंद बारां जिल्ह्यातील मांगरोळ येथे झाली. अनेक भागांत पुरासारखी परिस्थिती निर्माण झाली असून सखल भागांमध्ये पाणी साचले आहे. हवामान खात्याने २५ ते २७ जून दरम्यान बिकानेर, जैसलमेर, जोधपूर आणि उदयपूरमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. २७ जूनपासून पूर्व राजस्थानमध्येही पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

जम्मू-काश्मीरमध्येही पूर-ढगफुटीचा धोका

हवामान खात्याने आगामी ४८ तासांत जम्मू विभागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. मैदानी भागांत पूर येण्याचा आणि ढगफुटीचा धोका आहे. गेल्या २४ तासांत जम्मू विभागातील तीन जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस झाला आहे. यामध्ये रियासीच्या कटरा येथे १०९ मिमी, रामबनच्या बनिहाल आणि बटोत येथे प्रत्येकी १२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जम्मूमध्ये चार आणि काझीगुंडमध्ये तीन मिमी पावसाची नोंद झाली आहे. काश्मीरमध्ये हलका पाऊस झाला आहे.

## महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी...

सरकारला कर्जमाफी, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि अन्य मुद्द्यांवर घेरण्याचा प्रयत्न करतील. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील चर्चा आणि प्रश्नोत्तरांमुळे अधिवेशनात तणावपूर्ण वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

शक्तीपीठ महामार्गावरून शेतकऱ्यांचा रोष : शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला सरकारने नुकतीच मंजुरी दिली. मात्र, कोल्हापूर, धाराशिव, बीडसह अनेक भागांतील शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी जाण्याच्या भीतीने स्थानिकांकडून या प्रकल्पाला विरोध होत आहे. भूसंपादनासाठी जाणाऱ्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी हुसकावले आहे. हा मुद्दा अधिवेशनात गाजण्याची शक्यता आहे.

# डाबकी रोडवरून 'हरित अकोला २०३०'ची हिरवी सुरुवात!

## 'वृक्षमित्र' सुनील गोहर यांचा वृक्षारोपण उपक्रम जोमात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २६ :** झाडे लावा, झाडे जगवा या हाकेला खऱ्या अर्थाने प्रतिसाद देत अकोल्यातील पर्यावरण-प्रेमी व सामाजिक कार्यकर्ते सुनील मधु गोहर यांचे अखंड वृक्ष संगोपनाचे व्रत १८ वर्षांपासून सुरू आहे. गुरुवारी डाबकी रोड परिसरात त्यांच्या नव्या हिरवाई मोहिमेला जल्लोषात प्रारंभ झाला. कडुनिंब, मायरुख, पिंपळ अशा स्थानिक हवामानास साजेशी शेकडो रोपे लागवड-संगोपनाचा गाभा आहेत.

गोहर यांच्यासोबत अजय पटोने, ललित शेठ भगत, नंदू चोपडे, कृष्ण पटोने व संस्कार गोहर यांची निस्वार्थ साथ लाभत आहे. पहिल्या टप्प्यात डाबकी रोड, आसरा नगर, गोकरणा पार्क आणि भिरड कॉन्व्हेंट परिसर हिरवेगार करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.यावर्षी अकोल्यात उष्णतेने उच्चांक गाठला; मे अखेरीस पारा ४४ अंशांवर पोहोचला.झाडे केवळ सौंदर्यासाठी नाहीत, पर्यावरण वाचवण्याची अत्यावश्यक गरज आहेत. आम्ही फोटोसेशनवर थांबत नाही; दररोज झाडांना पाणी घालतो, खत देतो, तण काढतो आणि कुंपण करतो. हेच झाड भविष्यात अनेकांना प्राणवायू देईल, अशी ठाम भूमिका सुनील गोहर व्यक्त करतात.

गोहर पथक रोज पहाटे ६ वाजता रोपांची पाहणी करते. प्रत्येक दिवसाचा फोटो, वाढलेली उंची व नोंदी सोशल मीडियावर 'ग्रीन जर्नल'मधून प्रसिद्ध होतील, त्यामुळे मोहिमेत सातत्य राखले जाणार आहे.संपूर्ण शहर हिरवेगार करण्यासाठी 'हरित अकोला २०३०' हे लक्ष्य ठेवून टीम कार्यरत आहे. घर, सोसायटी किंवा रस्त्याच्या कडेला थोडी जागा असेल तरी नागरिकांनी झाडे लावावीत, असे आवाहन कार्यकर्त्यांनी केले. एक झाड एक कुटुंब; थंड हवा, शुद्ध प्राणवायू! अकोल्याला हरित, स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी प्रत्येकाने एक झाड लावा, एक जीवन वाचवा, असा विश्वास सुनील गोहर यांनी व्यक्त केला.

# अमृतसरोवराच्या काठावर योगदिन साजरा



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** आंतरराष्ट्रीय योगदिनाला दहा वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त जलसंधारण कार्यालयातर्फे जिल्ह्यातील ६ अमृत सरोवरांच्या काठावर योगदिन साजरा करण्यात आला.

जिल्ह्यात योगदिन शनिवारी साजरा करण्यात आला. जलसंधारण कार्यालयातर्फे वणी रंभापूर, पाराभवानी, आखतवाडा, अंभोरा, तुलंगा (बु.) व पंचगव्हाण येथील सरोवरांच्या काठावर योग प्रात्यक्षिके करून योगदिन साजरा करण्यात आला. जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर, योग प्रशिक्षक चंद्रकांत अवचार व अधिकारी, तसेच नागरिक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

योगाच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठीच्या लाभाबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. सूर्यनमस्कार, प्राणायाम, योगासने, ध्यानधारणा यांच्यासह विविध प्रात्यक्षिके करण्यात आली.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात नेत्रदान जनजागृती अभियानाचे आयोजन; ४०० जणांनी भरले संमती पत्र

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २६ :** ''डोळे ही विधात्याची अमूल्य देणगी आहे. नेत्रदानाच्या माध्यमातून आपण कोणालातरी नवी दृष्टी देऊ शकतो, त्याच्या आयुष्यात नवे उजाड निर्माण करू शकतो. त्यामुळे प्रत्येक भारतीयाने मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करावा,'' असे भावनिक आवाहन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने अकोला येथील कृषी महाविद्यालयाच्या स्व. के. आर. ठाकरे सभागृहात नेत्रदान जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाचे उद्घाटन करताना डॉ. गडाख बोलत होते. महाराष्ट्राचे राज्यपाल मा. पी.सी. राधाकृष्णन यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या ''नेत्रदान जनजागृती मोहीम'' या उपक्रमाला विद्यापीठाने सकारात्मक प्रतिसाद देत राज्यभरातून ७५ हजार संमती पत्र संकलनाचा संकल्प केला आहे.कार्यक्रमात उपस्थित जिल्हा सामान्य रुग्णालयाचे नेत्रतज्ज्ञ डॉ. सैद देशमुख यांनी नेत्रदानाच्या तांत्रिक बाजूंवर सविस्तर माहिती दिली. नेत्रदानामुळे अंध व्यक्तींच्या जीवनात कसा बदल होतो, याची अनेक उदाहरणे त्यांनी मांडली आणि उपस्थितांना भावनिकदृष्ट्या जोडले.या प्रसंगी विद्यापीठाचे अधिष्ठाता (कृषी) डॉ. श्यामसुंदर माने, विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे, विद्यापीठ नियंत्रक प्रमोद पाटील तसेच विविध विभागप्रमुख, वैज्ञानिक, अधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'जायके का सफर' कार्यक्रमात श्रुती जैन यांनी उलगडले चविष्ट रहस्य

## कार्यक्रमात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. २६ :** जीतो लेडीज विंग तर्फे आयोजित ''जायके का सफर'' हा विशेष कार्यक्रम आज अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध शेफ श्रुती जैन उपस्थित होत्या. त्यांच्या पाककौशल्याने सर्व महिलांना मंत्रमुग्ध केले.

श्रुती जैन यांचे नाव एशिया बुक आणि लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंदले गेले आहे. त्यांना ''शेफ ऑफ नागपूर'' हा सन्मान मिळाला आहे, त्या अमूल मास्टरशेफ स्पर्धेच्या सहभागी राहिल्या आहेत, फेमिना मासिकात त्यांचा उल्लेख झाला आहे आणि त्या अनेक नामांकित ब्रँड्सच्या ॲम्बेसेडर म्हणून कार्यरत आहेत. या कार्यक्रमात त्यांनी १० पेक्षा अधिक आकर्षक पार्टी स्टार्टर रेसिपीज महिलांना शिकवल्या. या रेसिपीज खास प्रसंगांसाठी उपयुक्त आणि सोप्या पद्धतीच्या होत्या. त्यांनी फक्त पाककृतीच नाही, तर स्वयंपाक क्षेत्रात करिअर घडवण्याची आणि स्वयंपूर्ण होण्याची प्रेरणा सुद्धा दिली. या कार्यक्रमाचा उद्देश महिलांना चव आणि नवीन कौशल्यांशी जोडणे, आत्मविश्वास वाढवणे आणि एकमेकांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे होता. २०० पेक्षा अधिक महिलांनी उपस्थित राहून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यक्ष अलका खटोड यांनी केले, तर आभारप्रदर्शन कोमल जैन यांनी केले. कार्यक्रमाचे सह-संयोजक: दीपाली छल्लानी, मनीषा मेहता यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निर्मला खटोड, प्रिया संकलेचा, हिना शाह, निशा सेठी, संजना बिलाला यांनी प्रयत्न केले.

# जिल्हा परिषद तथा कनिष्ठ महाविद्यालय अडगाव बु. येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अडगांव बु , दि. २६ :** स्थनिक जिल्हा परिषद तथा कनिष्ठ महाविद्यालय अडगांव बु '' येथे शैक्षणिक सत्र २०२५ ते२०२६ ला शाळेचा पहिला दिवस२३ जून हा दिवस शाळा प्रवेश महोत्सव मोठ्या उत्सवात जिल्हा परिषद विद्यालय तथा कनिष्ठ महाविदयालयात साजरा करण्यात आला शाळा प्रवेश महोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री विलास किसनराव वानखडे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद शाळा बचाव समितीचे अध्यक्ष श्री रितेश रमेश देशमुख त्याच बरोबर शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षण प्रेमि तज्ञ श्री अमोल जगणराव खंडारे कनिष्ठ सहाय्यक महेंद्र वानखडे सुधाकर लबडे आनंद लबडे दिनकर सिरसागर निलेश खंडेराव उपस्थित होते क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन श्री विलास वानखडे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्राचार्य श्री चारूदत्त मेहरे रितेश देशमुख,अमोल खंडारे यांच्या हस्ते हारार्पणन करून शाळा प्रवेश महोत्स कार्यक्रमाची सुरुवात झाली मान्यवरांच्या हस्ते वर्ग सहावा ते अकरावीच्या विद्यार्थांचे गुलाब पुष्प तसेच पेन्सिल . पेन खोडरबर दप्तर पुस्तकांचा संपूर्ण संच देवून विद्यार्थी यांचे स्वागत करण्यात आले त्याच बरोबर बुट मोजे व गणवेश सुद्धा वाटप करण्यात आले या सर्व प्रसंगी कनिष्ठ महाविद्यालय चे प्रा डॉ संतोष गायकवाड सर प्राचार्य चारूदत्त मेहरे यांनी सन २०२४ ते २०२५ ह्या शैक्षणीक सत्रामध्ये शाळेच्या विद्यार्थी त्याच बरोबर विद्यालयातील शिक्षक शिक्षिका यांनी केलेल्या कामगिरीचा आलेख उपस्थित मान्यवराच्या समोर मांडला शिष्यवृती परिक्षा एस एस सी व एच एस सी परिक्षाचा सन २०२५ चा निकाल इत्यादी माहिती मांडली श्री विलास वानखडे अमोल खंडारे रितेश देशमुख यांनी त्यांच्या भाषणात विद्यार्थी यांची अभ्यासातील तसेच स्पर्धा परीक्षा जिल्हा परिषद विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय ह्या शाळेचे नावलौकीत करावेत त्याच बरोबर ह्या शाळेची पटसंख्या वाढविण्याचे प्रयत्न करावेत असे सर्व उपस्थित शिक्षक वर्ग यांना आवाहन करण्यात आले शाळा प्रवेश महोत्सवाच्या दिनाच्या निमित्ताने विद्यार्थी याना शुभेच्छा दिल्या त्याच प्रथम दिवशी मध्यम भोजन मध्ये विद्यार्थी यांना गोड पदार्थ म्हणून मोतीचूर लाडु चॉकलेट पेढे आणि जेवण देण्यात आले या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे प्राचार्य चारूदत्त मेहरे , साखरे , प्रा डॉ संतोष गायकवाड , सौ निखाडे , मिसाळ , संतोष सोळंके , मिलिंद लोखंडे , त्याच बरोबर पालवर्ग आणि विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ प्रा संतोष गायकवाड यांनी केले

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई

पंढरपूर, दि. २६ वृत्तसंस्था



आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या सोहळ्याला सुरवात झाली असून, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत आहे. मंदिर परिसर व दर्शनरांग गजबजली आहे. आषाढी सोहळ्याकरिता श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज यांच्यासह असंख्य पालख्या व दिंडया श्रीक्षेत्र पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत. या यात्रेच्या निमित्ताने श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर, मंदिर परिसर, श्री.संत तुकाराम भवन व श्री.संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप या ठिकाणी रंगीबेरंगी व आकर्षक तसेच अत्याधुनिक पद्धतीची विद्युत रोषणाई करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या गाभा-यावरील कळसास विशेष रोषणाई करण्यात आली असल्याने, भाविक कळस दर्शना बरोबर विद्युत रोषणाईचा आनंद घेत आहेत. रात्रीची ही दृष्य डोळ्यांची अक्षरशः पारणे फेडणारी आहेत. संपूर्ण परिसर प्रकाशमय झाला आहे. मंदिर समितीकडून यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

सदरची विद्युत रोषणाई श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती व शिवदत्त डेकोरेटर्स पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आठवड्याभराच्या अथक प्रयत्नांनंतर करण्यात आली असून, याची जबाबदारी विभाग प्रमुख शंकर मदने यांना देण्यात आली आहे.

# मॉ जिजाऊ वाचनालयात छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. २६ :** छत्रपती शिवरायांच्या आदर्शांवर आधारित शासनकारभार आणि सामाजिक न्यायाची संकल्पना यांचे प्रेरणास्थान ठरलेले, समाजहिताच्या कार्यात अग्रस्थानी असलेले राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती न्यू महसुल कॉलनीतील मॉ जिजाऊ सार्वजनिक वाचनालयात उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त तहसीलदार आत्माराम तेलगोटे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त ए.एस. आय. वासुदेवराव चक्रनारायण, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामकुमार खंडारे (गुरुजी), सुभाष वानखडे, जिल्हाधिकारी कार्यालयातील से.नि. रत्नाकर भुजाडे, ग्रामीण बँकेचे मॅनेजर कमलेश ठाकरे, उभरते युवा नेतृत्व इंजी. राहुल इंगोले उपस्थित होते.

वाचनालयाचे सभासद ओरा चक्रे सर, दिनेश सोनोने, मंगेश झिने, वाचनालयाच्या कोषाध्यक्षा सुनंदा पंजाबराव वर, मनिषा भुजाडे, मिनाक्षी शेगोकार, विद्या अंभोरे, सुरेखा सोनोने, तसेच आदित्य अंभोरे, उत्कर्ष शेगोकार, ईश्वरी, समृद्धी, सार्थक, अजिंक्य, अनूजा आदींनी कार्यक्रमात उपस्थिती लावली.

कार्यक्रमात इंजी. राहुल इंगोले यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या समाजसुधारणेतील कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या कार्याची माहिती दिली. लहानग्या अजिंक्य सोनोने यानेही शाहू महाराजांवरील भाषणातून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन मॉ जिजाऊ वाचनालयाचे अध्यक्ष पंजाबराव वर यांनी केले.शेवटी मिठाई वाटून आणि सामूहिक आनंदात छत्रपती शाहू महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# राज्यातील प्रवासी, माल वाहतूकदार २ जुलैपासून बेमुदत संपावर

पुणे, दि. २६ वृत्तसंस्था

राज्यातील प्रवासी, मालवाहतूक संघटनांनी येत्या दोन जुलैपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित वाहनचालकांकडून जबरदस्तीने ई-चलनाद्वारे दंड आकारला जात असून, शहरांमधील वाहतुकीस प्रतिबंधात्मक प्रवेश, तक्रार निवारण प्रक्रियेत होणारा विलंब, अतिरिक्त कामगारांची सक्ती आणि इतर मागण्यांसंदर्भात आझाद मैदान येथे बेमुदत उपोषण करूनही कुठलीच दखल न घेतली जात नसल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य वाहन, चालक, मालक आणि प्रतिनिधी महासंघाने बुधवारी पत्रकाद्वारे केला.

प्रवासी आणि माल वाहतूक करणाऱ्या राज्यातील विविध संघटनांची संयुक्त बैठक नुकतीच पार पडली. यावेळी वाहतूक संघटना महासंघाचे अध्यक्ष डॉ. बाबा शिंदे, वाहतूकदार बचाव कृती समितीचे संयोजक उदय बर्गे, ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसचे प्रकाश गवळी आणि इतर संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्य सरकारने दहा दिवसांत निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यव्यापी बंद करण्याबाबत एकमत झाले. याला राज्यातील सर्व वाहन संघटना, वाहतूकदारांनी पाठिंबा दिला असल्याचे पत्रकात नमूद केले.व्यावसायिक वाहने उभे करण्यासाठीच्या (नो एन्ट्री) विभागातील निर्बंधांचा पुनर्विचार करावा.राज्य सरकारने प्रवासी आणि मालवाहतूक करणाऱ्या वाहनचालकांवर जाचक अटी लादल्या आहेत.

# विद्यांचल द स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन आणि जागतिक संगीत दिन उत्साहात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोट, दि. २६ :** २१ जून रोजी, विद्यांचल शाळेने आंतरराष्ट्रीय योग दिन आणि जागतिक संगीत दिन मोठ्या उत्साहात साजरा केल्याने शाळेचा परिसर उत्साह आणि उर्जेने भरून गेला.या दुहेरी उत्सवात योगाची शांतता आणि संगीताची सुरस यांचे सुंदर मिश्रण होते.ज्यामुळे विद्यार्थ्यांना मन आणि शरीराच्या आरोग्याचा आणि कलात्मक अभिव्यक्तीचा समग्र अनुभव मिळाला.दिवसाची सुरुवात शाळेच्या परिसरात आयोजित एका विशेष योग सत्राने झाली,जिथे विद्यार्थी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध आसने,प्राणायाम आणि ध्यान तंत्रे सादर केली.निरोगी जीवनशैली आणि आंतरिक शांती राखण्यासाठी योगाचे महत्त्व या सत्रात अधोरेखित करण्यात आले.योग कार्यक्रमानंतर, विद्यार्थ्यांनी जागतिक संगीत दिनानिमित्त वाद्ये,एकल आणि समूह गायन सादरीकरण आणि संगीत नाटकाद्वारे आपली प्रतिभा दाखवत संपूर्ण कॅम्पस सुरेल सुरांनी दुमदुमून गेला. शास्त्रीय रागांपासून ते उत्साही समकालीन गाण्यांपर्यंत,संगीतमय सादरीकरणांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रतिभांचे आणि सर्वांना जोडणाऱ्या संगीताच्या वैश्विक भाषेचे दर्शन घडवले.मुख्याध्यापकांनी संगीत आणि क्रीडा विभागातील शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.कार्यक्रमाचे संचालन क्रीडा विभाग प्रमुख सुजय कल्पेकर यांनी केले.शारीरिक आरोग्य आणि कलात्मक आनंद यांच्यातील परिपूर्ण सुसंवादाचे प्रतीक असलेल्या योग आणि संगीताच्या एकत्रित सादरीकरणाने महोत्सवाचा समारोप झाला. हा कार्यक्रम केवळ प्रतिभेचे प्रदर्शन नव्हता तर शिक्षणातील समग्र विकासाच्या भूमिकेची आठवण करून देणारा होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संचालक दिनेश भुतडा,सौ. सारिका भुतडा,आणि प्रशासकीय अधिष्ठाता प्रशांत विनायक यांनी त्यांचे संपूर्ण मार्गदर्शन आणि योगदान दिले.

# पहलगाम हल्ल्याचा उल्लेख नसलेल्या कागदपत्रावर स्वाक्षरी करण्यास भारताचा नकार

## चीनमध्ये राजनाथ सिंहांची कठोर भूमिका

क्रिंगदाओ, दि.२६ वृत्तसंस्था

चीनमधील क्रिंगदाओ येथे झालेल्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. वृत्तानुसार, या निवेदनात पहलगाममधील भयानक दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख टाळण्यात आला होताठ परंतु बलुचिस्तानमधील दहशतवादी कारवायांचा थेट उल्लेख होता. पाकिस्तानने वारंवार भारतावर बलुचिस्तानच्या स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देण्याचा आरोप केला आहे, जो आरोप भारताने पूर्णपणे नाकारला आहे.

शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या बैठकीत एप्रिलमध्ये झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राजनाथ सिंह यांनी दहशतवादाविरोधात कडक संदेश दिला आणि पाकिस्तानवर जोरदार टीका केली. सिंह यांनी म्हटले की, ''काही देश सीमेपलिकडील दहशतवादाचा वापर धोरणात्मक साधन म्हणून करतात आणि दहशतवाद्यांना आश्रय देतात. अशा दुटप्पी निकषांना स्थान नसावे. अशा देशांवर टीका करण्यास शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनने मागेपुढे पाहू नये.''

यानंतर, २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा आणि मे महिन्यात भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचा थेट उल्लेख करत राजनाथ सिंह म्हणाले, ''पहलगाम दहशतवादी हल्ला ज्या प्रकारे झाला, त्याच प्रकारे लष्कर-ए-तैयबाने मागील काही काळात भारतात दहशतवादी हल्ले केले आहेत. दहशतवाद रोखण्यासाठी आणि सीमेपलिकडील



दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी आपल्या अधिकाराचा वापर करून भारताने ७ मे २०२५ रोजी दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबवले.''यावेळी राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांच्या उपस्थितीतच म्हटले की, ''दहशतवादाचे कोणतेही कृत्य गुन्हेगारी आणि अन्याय्य आहे. त्याचा हेतू काहीही असो, कुठेही, केव्हाही आणि कोणाकडूनही असो. शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या सदस्यांनी या दुष्कृत्याचा स्पष्टपणे निषेध केला पाहिजे.''

पुढे ते म्हणाले, ''भारताचा असा विश्वास आहे की, बहुपक्षीय संवाद आणि सहकार्यासाठी यंत्रणा तयार केली पाहिजे. यामुळे विविध देशांमध्ये संघर्ष रोखण्यासाठी सहकार्य निर्माण करण्यास मदत होऊ शकते. कोणताही देश, कितीही मोठा आणि शक्तिशाली असला तरी, एकटा काम करू शकत नाही. प्रत्येक देशाने त्यांच्या परस्पर आणि सामूहिक फायद्यासाठी एकमेकांसोबत काम केले पाहिजे. हे आमची जुनी संस्कृत म्हण 'सर्वे जनाः सुखिनो भवन्तु' चे प्रतिबिंब आहे, ज्याचा अर्थ सर्वांसाठी शांती आणि समृद्धी आहे.''

# भाजपाकडून राज्यात भाषिक आणीबाणी

## उद्धव ठाकरेंचा फडणवीस सरकारवर आरोप

मुंबई , दि.२६ वृत्तसंस्था



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की मी त्रिभाषा सूत्र स्वीकारणार नाही तर पाच मिनिटांत हिंदी सक्तीचा विषय संपेल. मात्र सादरीकरण वगैरे गोष्टी केल्या जात आहेत. भाजपाकडून एकाधिकारशाही लादण्याची ही पावलं आहेत असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. तसंच भाजपाकडून भाषिक आणीबाणी लादली जात असल्याचंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. आमचा विरोध हिंदी भाषेला नाही तर हिंदी सक्तीला आहे. हिंदीला विरोध नाही कारण हिंदी चित्रपटसृष्टी मुंबईतच जन्माला आली. अमिताभ बच्चन असतील, हिंदी कलाकार असतील, गायक असतील हे मुंबईत आले आणि मोठे झाले. हिंदी सिने तारे-तारका इथे येऊन मोठी होतात. एकाधिकारशाहीकडे भाजपाची वाटचाल सुरु आहे. आणीबाणी लादल्याचा विषय भाजपाने आणला होता. त्यांनी बुधवारच्या दिवशी विरोध दर्शवला पण मी हे सांगतो आहे की भाषिक आणीबाणी आहे. भाषिक आणीबाणी भाजपाकडून लादली जाते आहे असा आरोप उद्धव ठाकरेंनी केला आहे.हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतला जाणार नाही तोपर्यंत आमचं आंदोलन झालं आहे.

# इराणने पर्वताखाली लपविले युरेनियम साठे

## अमेरिका आणि इस्त्रायलची सावलीही पडली नाही

तेहरान, दि.२६ वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवार, २० जून रोजी घोषणा केली की अमेरिकन बी-२ बॉम्बर्सनी इराणचे सर्वात सुरक्षित फोर्डो नष्ट केले आहे आणि असेही म्हटले आहे की, त्यांची इतर अणुस्थळे नतान्झ आणि इस्फहान देखील नष्ट झाली आहेत. काही अहवालांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की हल्ल्यापूर्वी इराणने फोर्डोहून आपले युरेनियम गुप्त ठिकाणी हलवले होते आणि ते सहजपणे आपला अणुकार्यक्रम सुरू ठेवू शकतात.

इराणमधून ४०० किलोग्रॅम युरेनियम गायब असल्याचे वृत्त आहे. तेहरानने हे युरेनियम नातान्झजवळील कुह-ए-कोलांग गज लामध्ये हस्तांतरित केले असावे, ज्याला 'पिकॅक्स माउंटन' असेही म्हणतात. असा दावा केला जात आहे की इराणने या पर्वतावर फोर्डो



पेक्षा जास्त खोलीवर अणुऊर्जा प्रकल्प बांधले आहेत, ज्याबद्दल कोणतीही बातमी नाही.

अमेरिका आणि इस्त्रायली सरकारे म्हणतात की त्यांनी त्यांच्या हल्ल्यांनी इराणचा अणुकार्यक्रम नष्ट केला आहे. पण दुसरीकडे, ट्रम्प यांनी असेही म्हटले होते की इराणने हा करार स्वीकारला पाहिजे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जर अमेरिकेला असे वाटत असेल की इराणचा अणुकार्यक्रम संपला आहे, तर ते अणुकराराबद्दल का बोलत आहे.

जेव्हा आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्यामहासंचालकांनी इराणला पिकॅक्स पर्वताखाली काय चालले आहे असे विचारले तेव्हा इराणचे उत्तर थोडक्यात आणि तीक्ष्ण होते. इराणी अधिकाऱ्यांनी सांगितले, ''याचा तुमच्याशी काहीही संबंध नाही.'' ज्या सुविधांबद्दल क्वचितच बोलले जाते, ती फोर्डो पेक्षाही अधिक मजबूत असल्याचे म्हटले जाते.

एप्रिलमध्ये इन्स्टिट्यूट फॉर सायन्स अँड इंटरनॅशनल सिक्युरिटीने प्रकाशित केलेल्या उपग्रह प्रतिमेवरून असे दिसून आले की इराण माउंट कोलांग गाझच लाच्या तळाभोवती एक नवीन सुरक्षा रिंग बांधत आहे. ''नवीन कॉम्प्लेक्समध्ये फोर्डो युरेनियम समृद्धीकरण स्थळापेक्षा खोलवर गाडलेले हॉल आहेत,'' असे ने एप्रिलच्या मूल्यांकनात म्हटले आहे.

# अलकनंदा नदीत बस कोसळून भीषण अपघात; ११ प्रवासी बेपत्ता, सात जण वाचले

रुद्रप्रयाग, दि.२६ वृत्तसंस्था

उत्तराखंडमधील रुद्रप्रयागमध्ये एक बस अलकनंदा नदीत कोसळून अपघात झाला आहे. या बसमध्ये १८ प्रवासी बसले होते. त्यापैकी सात जणांना वाचवण्यात आलं आहे तर ११ प्रवासी बेपत्ता झाले आहेत. या ठिकाणी मदत आणि बचाव कार्य तातडीने सुरु करण्यात आलं आहे. स्थानिक पोलीस, एसडीआरएफचं पथक यांच्याकडून बचावकार्य सुरु आहे. ११ बेपत्ता प्रवाशांना शोधण्यात येतं आहे. नेमकं काय झालं याचा तपासही केला जातो आहे. गेल्या काही दिवसांपासून रुद्रप्रयाग, केदारनाथ या ठिकाणी पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे अलकनंदा नदीचा प्रवाहही वेगाने वाहतो आहे. बस याच नदीत कोसळली आहे. त्यामुळे हे प्रवासी या प्रवाहासह



वाहून गेले आहेत. या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचीही माहिती ने दिली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार १८ प्रवाशांना घेऊन जाणारी बस ब्रदीनाथला चालली होती. त्यावेळी चालकाचं बसवरचं नियंत्रण सुटलं. ही बस नदीत कोसळली. स्थानिकांना ही बाब कळल्यानंतर त्यांनी याबाबतची माहिती पोलिसांना कळवली. पोलीस आणि एसडीआरएफचं पथक या ठिकाणी आलं. ०८, ७४४४ या बसचा अपघात झाला आहे. या बसमध्ये चालकाहह एकूण २० जण बसलेले होते. या बसमध्ये उदयपूर (राजस्थान) आणि गुजरात येथील सोनी परिवार चारधाम यात्रेसाठी आला होता. याच बसचा अपघात झाला आहे.

१८ प्रवाशांना घेऊन बस चालली होती. ही बस अलकनंदा नदीत कोसळली आणि अपघात झाला. रुद्रप्रयाग जिल्ह्यातील ही घटना आहे. घटनेची माहिती मिळताच या ठिकाणी मदत आणि बचाव कार्य सुरु झालं आहे. एका व्यक्तीचा या घटनेत मृत्यू झाला आहे. विभागीय आयुक्त विनय शंकर पांडे यांनी माहिती दिली आहे की या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. सात जण जखमी झाले आहेत आणि त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

# महाराष्ट्र नविनर्माण सेनेचा मराठी माणसासाठी मुंबईत मोर्चा

मुंबई, दि.२६ वृत्तसंस्था



शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची नुकतेच मनसे प्रमुख राज ठाकरेंसोबत पहिलीपासून हिंदी भाषेच्या सक्तीसंदर्भात चर्चा झाली. मात्र या बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही, अशी माहिती दादा भुसे यांनी दिली. त्यानंतर राज ठाकरेंनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी राज ठाकरे यांनी मराठी माणसासाठी ६ जुलैला गिरगावहून मोर्चा काढणार आहे. प्रत्येक मराठी माणसाने या मोर्चामध्ये सहभागी व्हा, सरकारच्या या निर्णयाविरुद्ध सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येण्याचे आवाहनही राज ठाकरेंनी केले आहे, असे आवाहन केले आहे.हिंदी असेल किंवा इतर कोणत्या ही भाषेची सक्ती राहणार नाही. मी सर्व पक्षांना आवाहन करत आहे की, येत्या ६ जुलैला आम्ही गिरगाववरून मोर्चा काढायचे ठरवलं आहे.

# पाकिस्तानसाठी हेरगिरी : नौदलातील क्लार्कला अटक

## मोबाईल चॅटिंगमधून धक्कादायक माहिती समोर

नवी दिल्ली, दि.२६ वृत्तसंस्था

पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी नौदलातील एका क्लार्कला अटक केली. नौदल भवनातील अप्पर डिव्हिजन क्लार्क (यूडीसी) असलेल्या विशाल यादववर ही अटकेची कारवाई करण्यात आली. विशाल यादव हा सोशल मीडियाद्वारे गुप्त माहिती पाठवत असे. राजस्थान पोलिसांच्या गुप्तचर शाखेने नवी दिल्ली येथून ही अटक केली.

याबाबत पोलिस महानिरीक्षक (सीआयडी-सुरक्षा) विष्णूकांत गुप्ता यांनी माहिती दिली आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले की, यूडीसी विशाल यादवला बुधवारी (दि.२५) अटक करण्यात



आली. यादव हा पुंसिका रेवाडी (हरियाणा) येथील रहिवासी आहे. राजस्थान पोलिसांचे 'सीआयडी-गुप्तचर' पाकिस्तानी गुप्तचर संस्थांच्या हेरगिरी कारवायांवर सतत लक्ष ठेवून होते. त्यानुसार, आता ही कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, विशाल हा सोशल मीडियाद्वारे पाकिस्तानला माहिती पाठवत असायचा. नौदल भवन दिल्लीतील 'डॉकयार्ड डायरेक्टरेट'मध्ये काम करणारा विशाल यादव सोशल मीडियाद्वारे पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या एका महिला हँडलरशी सतत संपर्कात असल्याचे समोर आले.

यापूर्वी विशाल यादवचे नाव एका मोठ्या हेरगिरी नेटवर्कशी आले होते. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यानही त्याचे नावे पुढे आले. त्यावेळीही त्याने भारतीय नौदलाशी संबंधित संवेदनशील माहिती एका परदेशी एजन्सीला दिली होती. आता पुन्हा एकदा त्याच्याविरुद्ध ठोस पुरावे मिळाल्यानंतर राजस्थान इंटेलिजेंसने त्याला दिल्लीतून अटक केली.

# राज कुशवाहाच्या घरी पोलिसांना सापडले पिस्तुल, सोनम रघुवंशीच्या लॅपटॉपचा शोध सुरु



नवी दिल्ली , दि.२६ वृत्तसंस्था

मेघालय या ठिकाणी घडलेल्या हनिमून मर्डरची चर्चा देशभरात आहे. राजा रघुवंशीला त्याची पत्नी सोनमने प्रियकर राज कुशवाहा आणि तीन सुपारी किलर्सच्या मदतीने ठार केलं. राज कुशवाहावर सोनमचं प्रेम होतं. पण घरातल्यांनी विरोध दर्शवला आणि सोनमचं लग्न राजा रघुवंशीशी करण्यात आलं. लग्नानंतर सात दिवसातच सोनमने राजाच्या हत्येचा कट रचला होता. आता या प्रकरणी राज कुशवाहाच्या घरी पोलिसांना पिस्तुल सापडलं आहे. पोलीस अजूनही सोनमच्या लॅपटॉपचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांना राज कुशवाहाच्या घरी पिस्तुल सापडलं आहे. हे पिस्तुल राज कुशवाहाचं आहे. पोलिसांच्या दृष्टीने शोधण्यासाठी कठीण असलेला हा पुरावा आता आमच्या हाती लागला आहे अशी माहिती इस्ट खासी हिल्सचे पोलीस अधीक्षक विवेक सैय्याम यांनी दिला आहे. हे पिस्तुल राज कुशवाहाचं आहे, मात्र याची नोंदणी किंवा हे पिस्तुल राजाच्या हत्येसाठी वापरलं गेलं होतं का? याबाबत पोलिसांनी काही भाष्य केलेलं नाही. पोलिसांनी राजा रघुवंशी हत्या प्रकरणात मंगळवारी आठवी अटक केली. राजाची हत्या घडवून आणल्यानंतर सोनम ज्या फ्लॅटमध्ये लपली होती त्या फ्लॅटच्या मालकाला मेघालय पोलिसांनी अटक केली आहे. लोकेंद्र सिंग तोमर असं या आठव्या आरोपीचं नाव आहे. सोनमकडे असलेला लॅपटॉप, काळी बॅग आणि इतर महत्त्वाचे पुरावे लोकेंद्रने नष्ट केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे. त्याआधी पोलिसांनी प्रॉपर्टी डिलर सिलोम जेम्सलाही अटक केली आहे.

# चीनमध्ये सापडले आणखी २० विषाणू; अख्ख्या जगाची झोप उडणार!

नवी दिल्ली, दि.२६वृत्तसंस्था

जेव्हा-जेव्हा साथीच्या आजारांचा इतिहास सांगितला जातो तेव्हा 'कोरोना'व्हायरसमुळे झालेला विनाश विसरला जाणार नाही. ही एक अशी साथीची रोगराई होती ज्याने केवळ लाखो लोकांचे जीव घेतले नाहीत तर त्याच्या संसर्गामुळे मानवी संबंधांवर ज्या प्रकारे परिणाम झाला ते कल्पना करणेही भयानक आहे. तुम्हाला हे जाणून धक्का बसेल की, आणखी २२ विषाणू पाइपलाइनमध्ये आहेत, ज्यांचे संसर्ग सर्वत्र कहर निर्माण करेल.

हा शोध अशा वेळी लागला आहे जेव्हा जग अजूनही कोविड-१९ साथीच्या आजाराच्या नवीन प्रकाराशी झुंजत आहे. २०१९ मध्ये चीनच्या वुहान शहरात



कोविड-१९ चा पहिला रुग्ण आढळला आणि वटवाघळांमध्ये आढळणाऱ्या कोरोनाव्हायरसमुळे वुहान व्हायरस संशोधन केंद्र कुप्रसिद्ध झाले. पुन्हा एकदा, २२ प्राणघातक विषाणू वटवाघळांमधून पसरू शकतात, जे मानवांसाठी खूपच घातक ठरू शकतील.चीनमधील संशोधकांनी वटवाघळांमध्ये कमीत कमी २० नवीन विषाणू शोधले आहेत, जे भविष्यात प्राणी आणि मानवांसाठी धोका निर्माण करू शकतात. २०१७ ते २०२१ दरम्यान युनान प्रांतातील १४२ वटवाघळांच्या मूत्रपिंडाच्या ऊतींमधून २२ विषाणू ओळखले गेले. यापैकी दोन विषाणू हेंद्रा आणि निपाहसारखे आहेत.संशोधनात एक अज्ञात जीवाणू आणि क्लोसिएला युनानेन्सिस नावाचा परजीवी देखील आढळून आला आहे. वटवाघळे फळबागा आणि गावांजवळ राहत होते, ज्यामुळे मूत्राद्वारे फळांना विषाणू दूषित होण्याचा धोका असतो. तो मानवांमध्ये किंवा प्राण्यांमध्ये अगदी सहजपणे पसरू शकतो.

युनान बॅट हेनिपाव्हायरस १ आणि २ हे विषाणू पूर्वी अज्ञात होते आणि त्यांचे अनुवांशिक घटक इतर हेनिपाव्हायरसशी ५२ ते ५७ टक्के जुळतात. तज्ञांनी इशारा दिला आहे की हे विषाणू फळे किंवा पाण्याद्वारे मानवांपर्यंत पोहोचू शकतात, म्हणजेच ते खूप सहजपणे संक्रमित होतील. कोरोनासारखे गंभीर श्वसन आजार होण्याव्यतिरिक्त, हे विषाणू मेंदूमध्ये सूज निर्माण करू शकतात, ज्यामुळे रुग्णाच्या मेंदूला नुकसान होईल.

### 'हे' विषाणू किती धोकादायक आहेत?

हे विषाणू वटवाघळांच्या मूत्रपिंडात आढळले आहेत आणि त्यांच्यात मानवांमध्ये किंवा प्राण्यांमध्ये पसरण्याची क्षमता आहे. ते अनेक गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकतात. आतापर्यंत संशोधकांनी कोणत्याही नवीन साथीची पुष्टी केलेली नाही, परंतु या धोक्याकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. वटवाघळांमध्ये किमान २० नवीन विषाणू आढळले आहेत, ज्यात दोन हेनिपा विषाणू आणि एक परजीवी यांचा समावेश आहे.

## थोडक्यात

### हिमाचलमध्ये ढगफुटीने हाहाकार; दोन जणांचा मृत्यू , २० जण गेले वाहून

**धर्मशाळा :** हिमाचल प्रदेशात पाऊस आणि पुरामुळे प्रचंड हाहाकार माजला आहे. ढगफुटी, अचानक आलेल्या पूर आणि मुसळधार पावसामुळे दोघांचा मृत्यू झाला, तर सुमारे २० जण वाहून गेल्याची भीती आहे. कांगडा जिल्ह्यातील मनुनी खाड येथून दोन मृतदेह सापडले, तर इंदिरा प्रियदर्शिनी जलविद्युत प्रकल्पाच्या जागेजवळील कामगार वसाहतीत राहणारे सुमारे १५-२० कामगार खनियारा मनुनी खाड येथे पाण्याची पातळी वाढल्याने वाहून गेल्याची भीती आहे.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसामुळे प्रकल्पाचे काम थांबवण्यात आले होते आणि कामगार बांधकाम स्थळाजवळील तात्पुरत्या निवार्यात विश्रांती घेत होते, तेव्हा मनुनी खाड आणि जवळच्या नाल्यांमधून येणारे पुराचे पाणी कामगार वसाहतीकडे आले आणि कामगारांना वाहून गेले. शोध आणि बचाव कार्य करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ), स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत आणि महसूल विभागाच्या पथके घटनास्थळी पोहोचली आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की प्रकल्पाशी संबंधित काही स्थानिक कामगार सुरक्षित आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे. कामगारांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करताना त्यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्टमध्ये लिहिले आहे की, ''हिमाचल प्रदेशातील धर्मशाळाजवळील खानियारा येथील मनुनी खडमध्ये पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अनेक कामगार वाहून गेल्याचे दुःखद वृत्त मिळाले. मी शोकग्रस्त कुटुंबांप्रती माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करतो.''त्यांनी पुढे लिहिले की, ''संकटाच्या या काळात, प्रत्येक भाजप कार्यकर्ता देवभूमीतील नागरिकांना शक्य तितकी मदत करण्यास समर्पित आहे.

### मंत्री दादा भुसे राज ठाकरेंच्या भेटीला शिवतीर्थ निवासस्थानी



**मुंबई :** राज्यात पहिलीपासून हिंदी भाषेच्या अंमलबजावणीवरून वाद सुरू आहेत. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पहिलीपासून शाळांमध्ये हिंदी सक्तीच्या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. यातच आज शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेण्यासाठी शिवतीर्थ निवासस्थानी दाखल झाले आहेत. हिंदी सक्तीबाबत दादा भुसे राज ठाकरेंची समजूत काढण्याचा प्रयत्न करणार आहेत. यावेळी मंत्री दादा भुसेंसह शिक्षण खात्यातील सर्व अधिकारी राज ठाकरेंना हिंदी भाषा सक्तीबाबत माहिती देणार आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये अर्ध्या तासापासून चर्चा सुरु आहे. या भेटी आधी दादा भुसे माध्यमांसोबत संपर्क साधताना म्हणाले की, ''महाराष्ट्र शासनाने शिक्षण विभागाच्या माध्यमातून जी काही भूमिका घेतलेली आहे, ती भूमिकेत काय मुद्दे आहेत हे आम्ही राज ठाकरे यांच्यासमोर ठेवणार आहोत. त्यांचे काही मुद्दे असतील, त्या मुद्द्यांवर शासनाची बाजू त्यांच्यासमोर आम्ही ठेवू. मला विश्वास आहे की, चर्चा सकारात्मक होईल. त्यांच्या काही सूचना असतील तर निश्चितपणे आम्ही त्याचे स्वागत करू.'' दरम्यान, राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा तिसऱ्या पर्यायी भाषेच्या रूपात शिकवण्याचा निर्णय घेतल्याने अनेकांनी विरोध केला. या मुद्द्यावर मनसेने आक्रमक भूमिका घेत विरोध केला आहे.

### भाजप नेते शेतकरी बापाला भिकारी समजतात का-रोहित पवार

**मुंबई :** लोणीकर यांनी शेतकऱ्यांबाबत केलेल्या विधानामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोप केले जात आहे. एका गावातील कार्यक्रमात भाषण करताना त्यांनी सोशल मीडियावर सरकारवर अथवा आपल्यावर टीका करणाऱ्यांबाबत बोलताना वादग्रस्त विधान केले आहे. ''तुझ्या बापाला पेरणीसाठी सहा हजार पंतप्रधान मोदी यांनी दिले आहे,'' अशी भाषा लोणीकर यांनी केली आहे. यावरुन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी भाजपावर टीका केली आहे.आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत लिहिले की, ''भाजप नेते बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांवर उपकार करत असल्याची केलेली भाषा म्हणजे त्यांच्या पक्षाचे संस्कार दर्शवते. एकीकडे शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला असताना त्यांना दिलासा देण्याऐवजी उपकाराची भाषा नेत्यांना शोभते का? भाजपा नेते शेतकरी बापाला भिकारी समजतात का?,'' अशी टीका आमदार रोहित पवार यांनी केली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

# जुने महामार्ग अगोदर व्यवस्थित करा हो!

एकीकडे भर पावसाळ्यामध्ये राज्यात विविध ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था मोठ्या प्रमाणात समोर येत असतानाच, राज्य सरकारतर्फे वादग्रस्त अशा शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाची घोषणा केली जाते हा विरोधाभास राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना पेचात टाकणारा आहे. सध्या महाराष्ट्रात जे महामार्ग कार्यरत आहेत त्यापैकी अनेक महामार्गांची अवस्था चांगली आहे असे म्हणता येत नाही. महामार्गावरील खड्डे असोत किंवा भरपावसात पाणी साठण्याचे प्रकार असोत, हे पाहता विकासाचे महामार्ग अनेक वेळा गैरसोयीचे महामार्गसुद्धा ठरतात. अशा प्रकारे महामार्गांच्या प्रकल्पांचे काम सुरू असताना संबंधित परिसरातील नागरिकांना जी प्रचंड गैरसोय सहन करावी लागते त्याचा विचारही या निमित्ताने करावा लागणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताच्या आर्थिक विकासाची चर्चा होत असताना या विकासाचे मापदंड म्हणून भले मोठे पूल, विस्तीर्ण महामार्ग याच गोष्टी वापरल्या जात आहेत की काय, अशी शंका येत आहे. भारताच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी यासारख्या भौतिक गोष्टीच वापरल्या जात असल्याने महाराष्ट्र सरकारने वादग्रस्त अशा शक्तिपीठ महामार्गासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद करून हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला असावा. मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या शक्तिपीठ महामार्गाच्या निधीसाठी तरतूद करण्यात आली आणि लवकरच या महामार्गाचे कामही सुरू करण्यात येणार आहे. खरे तर लोकसभा निवडणुकीच्या कालावधीमध्ये या महामार्गाला मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने हा निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला होता. विधानसभा निवडणुकीच्या कालावधीमध्येही कोल्हापूर भागातील शेतकरी बांधवांनी तीव्र आंदोलन केल्याने भूसंपादनाचे काम आणि इतर गोष्टी थांबविण्यात आल्या होत्या. पण आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या या शक्तिपीठ महामार्गाला पुन्हा एकदा चालना मिळालेली आहे. अर्थात, हा निर्णय घेताना मुख्यमंत्र्यांनी वादग्रस्त असे कोल्हापूर क्षेत्र त्यातून सध्या वगळले आहे. सुमारे ८१० किलोमीटर लांबीचा हा महामार्ग विदर्भातील वर्धा ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवी इथपर्यंत असणार आहे. राज्यातील बारा जिल्ह्यांमधील प्रमुख तीर्थक्षेत्रे यानिमित्ताने जोडली जाणार आहेत. सरकारच्या या योजनेमध्ये राज्यातील जी १८ तीर्थक्षेत्रे आहेत, त्या तीर्थक्षेत्रांपर्यंत पोहोचण्यासाठी सध्या सुस्थितीतील रस्ते आहेत. तीर्थक्षेत्रांच्या सभोवताली विकासही चांगला झाल्याचे दिसून येते. तरीही अशा प्रकारचा शक्तिपीठ महामार्ग करण्याचा अट्टाहास का, हे समजून येत नाही. रस्ते आणि महामार्ग यांची कामे झाल्यावरच विकास झाला असे आपल्याला जाहीर करता येते अशा धारणेतून अशा प्रकारचे निर्णय घेतले जाऊ शकतात. गेल्या काही वर्षांचा इतिहास पाहता अशा महामार्गांचे प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत राबवण्याचे सरकारचे धोरण दिसते. याच प्रकारे समृद्धी महामार्ग पूर्ण करण्यात आला किंवा राज्यातील आणि देशातील प्रमुख महानगरांमध्ये मेट्रो प्रकल्प राबविण्यात आले. म्हणजेच वाहतुकीच्या सुविधांच्या माध्यमातूनच विकासाचे चित्र उभारण्याचा सरकारचा मनोदय स्पष्ट आहे. खरे तर समृद्धी महामार्ग असो किंवा विविध मेट्रो प्रकल्प असो तेथेसुद्धा वाद झाले आहेत. पण वाद झाला की कामाची गती मंद करून वाद संपुष्टात आला की कामाला गती देण्याचे धोरण सरकारने अवलंबिले आहे आणि तशाच प्रकारचे धोरण आता शक्तिपीठ महामार्गाबाबतही राबविले जाणार आहे असे दिसते. मेट्रो प्रकल्पांचे काम सुरू असल्याने अनेक महानगरांमध्ये वाहतुकीची झालेली दुरवस्था असो किंवा काही महामार्गांचे काम सुरू असल्यामुळे छोट्या शहरांना जोडणारे रस्ते असोत या ठिकाणी केवळ गैरसोयींचे साम्राज्य दिसते. देशाच्या आणि राज्याच्या विकासाचा रथ महामार्गावरूनच धावू शकतो अशी जर केंद्र सरकारची आणि राज्य सरकारची धारणा झाली असेल, तर छोट्या छोट्या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत आणि तेथील सोयी सुविधांबाबतही सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुळात अशा प्रकारचे सर्व प्रकल्प 'बीओटी' तत्त्वावर म्हणजे 'बांधा वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर कार्यरत होत असल्याने आगामी काळात टोलनाक्यांचा प्रश्नही निर्माण होणार आहे. राज्य सरकारने जरी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा केली असली, तरी त्याला विरोध होणे उघड आहे आणि आगामी कालावधीमध्ये या विरोधाला शेतकरी आंदोलनाची पार्श्वभूमी लाभणार असल्याने सरकारसमोर ते एक मोठे आव्हानही ठरणार आहे. नजीकच्या कालावधीमध्ये कोणतीही मोठी निवडणूक नसल्याने कोणत्याही परिस्थितीमध्ये हा प्रकल्प रेटण्याची मानसिकता राज्य सरकारने तयार केली आहे असेच दिसते. वादग्रस्त कोल्हापूरचे क्षेत्र वगळून वर्धा ते सांगली या कामाला सुरुवात करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. शक्तिपीठ महामार्ग हा खूप मोठा प्रकल्प असल्याने आगामी काही वर्षे हा विषय चर्चेत राहणार आहे याचे संकेत आतापासूनच मिळू लागले आहेत. म्हणूनच सरकारला जो विकासाचा महामार्ग वाटत आहे तो विवादाचा महामार्गही ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. नवे महामार्ग उभारतानाच जुन्या खराब झालेल्या महामार्गांची दुरुस्तीही तितकीच महत्वाची आहे. यामुळे किमान येथून पुढेतरी सरकारने असे निर्णय घेताना सर्वसामान्य नागरिकांना विश्वासात घेणे आवश्यक आहे.

## आणीबाणी





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

काँग्रेसने लादली होती
आणीबाणी तो भूतकाळ

भाजपाला झाली उपरती
रम्य कसा आला हा काळ

स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे
अदा होत आहे मानधन
खरंच धन्य ते लढणारे
आहे त्यांना हा सन्मान

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



तुझ्या चष्म्यातून
तुला सारे दिसे ।
बापू जग दिसे
शांतीप्रिय ॥

सत्याग्रह किती
मजबूत आहे ।
दाखविले आहे
जगाला या ॥

अहिंसेची खरी
ताकद कळली ।
अहिंसा कळली
विश्वव्यापी ॥

बापू तुझ्यामुळे
स्वातंत्र्य कळले ।
स्वच्छंद कळले
जगणे हो ॥



## चर्चा

तुषार कोरडे
9764111447

# अनुत्तरित प्रश्न??

खोलीत फक्त दोनच आवाज होते , एक रोजप्रमाणे चालणाऱ्या घड्याळाची टिकटिक आणि दुसरा म्हणजे त्याच्या हृदयाची जोरात धडधड करणारी स्पंदने ....!! वास्तविक जगासाठी हे दोनच आवाज होते पण त्याच्या आतमधल्या विश्वात नुसतीच कोलाहल होती, नुसता गदारोळ , नुसतेच प्रश्न आणि प्रत्येक वेळा छातीपासून कंठापर्यंत येऊन तिथंच विसावलेला हुंदका ...!! त्याला हुंडक्यांना डोळ्यापर्यंत येऊ द्यायचं नव्हतंच कधी , नाहीतर नकळत शांतता भंग पावली असती.

पण नेमकं कारण काय होतं ....?? कारण एकच होतं , पुस्तक वाचून संपलेलं होतं. संपलं होतं की संपवलं होतं कुणास ठाऊक ?? अगदी त्यालासुद्धा पत्ता नव्हताच की कुणी कुणास संपवलं..?? त्याने पुस्तकाला की पुस्तकाने त्याला ...??

एवढ्या हजारो अनुत्तरित प्रश्नासोबत फक्त वेळ निघत चालली होती अन् प्रश्न वाढतच होते. एवढ मात्र खरं की , पुस्तकाचे पहिले पान उघडताना जेवढा आनंद होतो वाचायला तेवढंच वेदनादायी अन् अशांत करून सोडणारा त्याचा शेवट असतो त्यासोबत ते पुस्तक असंख्य प्रश्नांना वाचा फोडून निघून जातं...! त्यासोबत सोडून जातं अनाकलनीय वाटणारा अतिशय भावनिक शेवट , एक विचारशून्य स्तब्धता, अनेक अनुत्तरित प्रश्न आणि वाचणाऱ्याच्या मनाला लागलेला अदृश्य असहाय्य चटका ....!!

त्याचही चुकलंच जरा , जर त्याने ते पुस्तक निवडलंच नसतं तर..?? फक्त बाह्यचित्रे पाहून पुस्तक वाचण्याची हिम्मत केलीच नसती तर ..?? एकदा त्या पुस्तकाबद्दल थोडं अजून जाणून घेतलं असत तर ..?? पुस्तक वाचताना अनेक वेळा लोभनीय आणि अत्यल्प काळासाठी सुखावणाऱ्या प्रसंगाना वाचलं नसतं तर ...?? अजून एक खूप मोठी चूक होती त्याची, नकळत पुस्तकात एक मथळा होता लिहून त्यात जुन्या वाचकांची यादी होती , पण पुस्तक एवढ त्रासदायक आहे हा वाचकांचा अनुभव नव्हता लिहून त्यात तिथेच मोठी गफलत झाली..!! एकदा त्या जुन्या वाचकांचा अभिप्राय मी स्वतःचा मानला असता तर कदाचित नसता झाला एवढा त्रास , सोडताना हे पुस्तक त्याला ...??

होय.....!! मीच वाचलंय ते पुस्तक . अनेकांनी असच कधीतरी अनुभवलं असेल , मला माहीत आहे , प्रत्येकाला लिहून काढणं नसेल जमल कदाचित . तशीच वेळेसोबत जखम भरून जाईल , ते ठीक वाटल असेल त्यांना. पण वेळ प्रत्येक गोष्टीच दुःख संपवून टाकत असेल का ..?? संपवू शकेल का त्या सर्व खुणा ज्या रस्त्यावर जाताना कोरल्या होत्या नकळत ...??




संपवू शकेल का ती पोकळी जी खोट्या प्रेमाने भरून काढली होती कुणीतरी ...?? संपवू शकेल का त्या आठवणी ज्याला साकारताना कधीच वेळेच भान नव्हतं...?? संपतील का त्या सर्व शपथा ज्या गुलाबाच्या पाकळीप्रमाणे सुखुन गेल्या असतील...?? संपवू शकेल का स्मृतीतला पाकळ्यांचा गंध ज्या पाकळ्यांसाठी रोपट्यानं माती होऊ दिलं स्वतःला पण पाकळी जपून ठेवली ...??

ठरवलं असतं तर पाकळ्या चुरगळून सुद्धा टाकल्या असत्या ...!! पण मग त्या ठेच लागलेल्या तत्वाच पारायण कुठं मांडल असतं त्या फुलपाखराने ज्याने कधीही वेड्यासारखा सुगंध वेचण्याचाच प्रयत्न केला हक्क असताना सुद्धा ....?? या खोलीत आतासुद्धा एकांतातल एकटेपण अनुभवतोय हा वाचक ...!! फक्त या आशेवर की या टिकटिक करणाऱ्या अन् कुणासाठीही न थांबणाऱ्या वेळेसोबत भरून निघेल ही पोकळी कधीतरी ....!!



## विचारमंथन

विजय वाहोकार
9922865638

# तिची देवावरी सत्ता...

चारित्र्य, नीती, प्रेम, त्याग, विश्वास, समर्पण अशा एक ना अनेक संकल्पनांमुळेच आपली भारतीय संस्कृती ही संपूर्ण विश्वात पूजनीय मानली जाते. याच भारतीय संस्कृतीमध्ये पतीव्रतेला अनन्यसाधारण महत्त्व दिलं जातं. कारण स्त्री ही सृजनाची जननी, जीवनाचा स्रोत मानली जाते.

पतिव्रता म्हणजे काय? सरळ अर्थाने सांगायचं झालं, तर जिचं जीवन पतीशिवाय अपूर्ण वाटतं, जी आपल्या पतीशी पूर्णपणे एकनिष्ठ असते तीच खऱ्या अर्थाने पतिव्रता. तुकोबाराय म्हणतात :

''पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती,
सर्व भावे पती ध्यानी मनी.''

पतिव्रता स्त्री इतर कोणत्याही परपुरुषाची स्तुती ऐकू शकत नाही, कारण ती पतीशी भावनिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या पूर्णतः एकरूप झालेली असते. तिच्या मनात, विचारांत आणि भावनांमध्ये नेहमी फक्त पती असतो. मात्र, केवळ पतीची छाया बनून राहणे हे पुरेसे नाही. पत्नीने आपल्या कुटुंबाच्या स्थैर्यासाठी एक मजबूत पाया व्हायला हवे. अशा आदर्श कुटुंबव्यवस्थेला संतांनीही मान्यता दिली आहे. कारण असे कुटुंब एक आदर्श समाज आणि राष्ट्रनिर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त ठरतं.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात:

''विश्व ओळखावे आपणावरून,
आपणची विश्व घटक जाण ।
व्यक्तीपासून कुटुंब निर्माण,
कुटुंबापुढे समाज अपुला ॥
समाजापुढे ग्राम आहे,
ग्रामापुढे देश राहे ।
देश मिळोनी ब्रह्मांड होय,
गती गतीने जवळ ते ॥''

व्यक्तीपासून ब्रह्मांडनिर्मितीपर्यंतची एकमेवाद्वितीय अशी आदर्श साखळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मांडलेली आहे. आणि या साखळीचा मूळ आधार म्हणजे पातिव्रत्य धर्म. हे समजून घेणे आवश्यक आहे. अशा धर्मवती स्त्रीचा गौरव वेदांनीही मोठ्या आदराने केला आहे. ''मातृदेवो भव'' या वचनातून वेदांनी स्त्रीचं महत्त्व अधोरेखित केलं आहे.

''याच गुणे मातृदेवो भव, वेदाने
आरंभीच केला गौरव। ''नररत्नांची खाण
अपूर्व,
मातृ जाती म्हणोनीया ॥''

अनसूया, सावित्री, सीता, दमयंती, अहिल्या, तारामती अशा महान पतिव्रतांचे नाव आजही समाजात आदराने घेतले जाते. इतिहासात अनेक तेजस्वी, अजरामर स्त्रिया होऊन गेल्या आहेत, ज्यांनी संपूर्ण समाजासमोर एक आदर्श स्त्रीत्व आणि पतिव्रत्य मांडलं आहे. पतिव्रतेचे ठळक गुणधर्म म्हणजे त्याग, निष्ठा, धैर्य, सामर्थ्य, संयम, समर्पण. हे गुण पातिव्रत्य धर्माचे मूळ आहेत.

पतिव्रता स्त्री आपल्या पतीच्या सुखासाठी, यशासाठी, कल्याणसाठी स्वतःच्या इच्छांचा त्याग करते आणि संपूर्णपणे त्याला समर्पित राहते. हा समर्पणभाव इतका महान आहे की, संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात:

''जें सारसांही विघडतां ।
होय वोहाहूनी वत्स काढीतां ॥
का भणंगु दवडीतां ।



भाणयावरूनी
॥ पैं मायेपुढौनी बाळक ।
काळें नेतां एकुलतें एक ॥
होय कां उदक । तुटतां मीना ॥''

म्हणजेच चक्रवाक पक्ष्यांच्या जोड्यांची ताटातूट केली असता अथवा गाईला पाना फुटल्यावर कासेंपासून वासरास माघारी ओढले असता किंवा क्षुधितांस पानावरून उठून लावले असता अथवा आई पुढून एकुलते एक लेकरू काळाने ओढून नेले असता किंवा माशास पाण्यातून काढले असता जसे दुःख होते, या उदाहरणांपेक्षा अनेक पटीने दुःख पतीव्रतेला आपल्या पतीच्या वियोगात होतं. आणि हाच समर्पण भाव स्त्रीला वंदनीय बनवितो. परंतु, आज याच मूल्यांचा समाजात अभाव दिसून येतो. घराघरांत क्लेश, द्वेष, मद, मत्सर, अहंकार यांसारख्या विकारांनी घरं पोखरली आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली घरातील शांततेचा, शालीनतेचा ऱ्हास झाला आहे. एकेकाळी उंबरठा ओलांडताना इतरांच्या भावना लक्षात घेणारी स्त्री, आज स्वतःच्या भावविश्वात हरवलेली आहे. डोक्यावरचा पदर आता वैयक्तिक अहंकाराने झाकला गेला आहे.

सून सासूला ज्ञान पाजते, आणि सासू सुनेला तुच्छ लेखते. लहानसहान कारणांवरूनही वाद होतात. आर्थिक संपन्नता असूनही अनेक कुटुंब वैचारिक दारिद्र्य भोगत आहेत. कुणीही एकमेकांना समजून घ्यायला तयार नाही.

राष्ट्रसंत म्हणतात :

''कर्तव्याचे काम जिथे, तेथे
दुर्बल घात करी ।
उपदेशाचे काम नसे, तेथे वाचा मौन
बरी॥''

ज्या घरातील स्त्री हा विचार अंगीकारते, त्या घरात स्वर्ग नांदतो. या संपूर्ण गोष्टी स्त्री करिता यासाठीच आहेत कारण स्त्रीच्या वाणीतील माधुर्य आणि कर्तृत्वातील सामर्थ्य हे पुरुषांपेक्षा कित्येक पटीने अधिक आहे. ''मातेच्या स्वभावे पुत्राची घडण,
त्यास उज्वल ठेवी तिचे वर्तन ।
स्त्रीच्या तेजावरी पुरुषाचे मोठेपण,
ऐसे आहे ॥'' एवढेच नाही तर ''जिच्या हाती पाळण्याची दोरी,
तीच जगाते उद्धरी.'' ही स्त्रीची थोरवी आहे. पतिव्रतेचा समर्पणभाव केवळ पतीपुरता मर्यादित नसून संपूर्ण कुटुंबासाठी असतो. अशा समर्पणातूनच बिघडलेल्या समाजाची घडी पुन्हा सावरू शकते. असेल त्या परिस्थितीमध्ये कुटुंबाला वैकुंठ बनविण्याची ताकद फक्त स्त्रीमध्ये आहे. माता अनुसया सीतेला म्हणते: ''हे सीते, १४ वर्षांच्या वनवासाचा स्वीकार करून तू पतीसोबत येण्याचा निर्णय घेतलास, त्यामुळेच तू जगातील श्रेष्ठ पतिव्रता म्हणून ओळखली जाशील.'' या वचनांमधून सीतेच्या संयम, निष्ठा आणि मानसिक शक्तीची प्रचिती येते. ती राजा जनकाची कन्या, चक्रवर्ती सम्राटाची सून, अयोध्येच्या राजाची पत्नी ती वनवासाऐवजी हवा तो निर्णय घेऊ शकली असती अशा स्थितीत असूनही तिने वनवास स्वीकारला. हे मानसिक गुलामगिरी नव्हे, तर भारतीय संस्कृतीचं प्रतिक आहे.

आज समाजाला या विचारांनी प्रेरित होणं अत्यंत गरजेचं आहे. तरच प्रत्येक घर नंदनवन होऊ शकतं. अन्यथा परिस्थिती अशी होईल की, जिथे माणसं राहत असतील पण जीवनमूल्यांची जागा स्वार्थीपणाने घेतलेली असेल. समाज सुधारायचा असेल, तर पुरुषांचाही दृष्टिकोन बदलणं तितकाच आवश्यक आहे. पतिव्रता ही एकतर्फी जबाबदारी नाही. पती-पत्नी दोघांनीही एकमेकांप्रती समान समर्पण, आदर, निष्ठा आणि सहवासातील संवेदनशीलता बाळगली पाहिजे. पातिव्रत्य धर्म हा स्त्रीच्या निष्ठेचे, प्रेमाचे प्रतीक आहे. आणि आधुनिक काळात सुखी संसार हाच हवे असेल, तर दोघांचंही समर्पण गरजेचं आहे. म्हणूनच भारतीय संस्कृतीने पतिव्रतेचा गौरव आणि उद्घोष केला आहे. कारण तिची सत्ता ही फक्त संसारावरच नाही, तर देवावरही चालते. ''तुका म्हणे पतिव्रता । तिची देवावरी सत्ता ॥''



## राजकारण

डॉ. विनोद गायकवाड
राजकीय अभ्यासक, मो. ९८५०३२४२०२

# भारताचे शांततामय सहअस्तित्वाचे धोरण!

इराण-इस्रायल युद्धात अमेरिका उघडपणे उतरल्याने युद्ध गंभीर रूप घेते असे वाटत असतांनाच १२ व्या दिवशी अमेरिकेच्या मध्यस्थीने युद्धविराम झाल्याची घोषणा दोन्ही देशांनी केली असली तरी शस्त्रसंधीच्या उल्लंघनाच्या काही घटना घडल्यात . मोठ्या देशांच्या हितसंबंधांमुळे पश्चिम आशिया युद्धभूमी बनला. इराणच्या सीमेलगत असलेले अफगाणिस्तान व पाकिस्तान हे दोन्ही देश सार्कचे सदस्य आहेत. मात्र पाकिस्तान-भारत सीमावाद असून दहशतवाद हा प्रमुख मुद्दा आहे. तिकडे इराण व इस्राइल या दोन्ही देशांसोबत भारताचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. अशा परिस्थितीत भारताचे परराष्ट्र धोरण अलिप्ततेचे असले तरी भारत आंतरराष्ट्रीय शांततेकरीता पुढाकार घेतो आहे.

इराण आणि इस्रायलसोबत भारताचे व्यापारीक संबंध आहेत. भारत इस्रायलकडून कच्चे तेल, सुकामेवा आणि शस्त्रांची आयात करतो, तर भारत कृषी उत्पादित मालाची निर्यात इस्रायलला करतो. ऑपरेशन सिंदूर दरम्यान इस्रायल निर्मित मिसाईलचा पराक्रम दिसला. तिकडे भारताचे इराणसोबतही मैत्रीपूर्ण संबंध आहेत. भारत-इराण चाबहार करार भारताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. भारताने इराणसोबत हा करार केला तेव्हा पाकने थयथयाट केला. पश्चिम आशिया भारतासाठी मोठी बाजारपेठ असल्याने चाबहार बंदराचे महत्व अधिक आहे. भारत-पाक तणावातही भारत व इराण संबंध मैत्रीपूर्ण राहिलेत. दोन्ही देशातून भारतीय नागरिकांना परत आणण्यासाठी ऑपरेशन सिंधू राबविण्यात आले. त्याकरिता दोन्ही देशाने सहकार्य केले. मक्का, मदिना ही दोन्ही धार्मिक स्थळे सौदी अरेबियात असून भारतीय मुस्लिम मोठ्या संख्येने तिथे जातात. म्हणजेच भारत आणि सौदी अरेबिया यांच्यात धार्मिक हितसंबंध आहेत. तिकडे या युद्धाचा परिणाम भारतावर झाला असून त्याची झळ पोहचली. या युद्धादरम्यान इस्राइलने चहा आणि तांदूळाची आयात थांबविल्याने आसाम आणि पंजाबमधील शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्यात. सोन्याचे भाव कमी-जास्त होत आहेत. पश्चिम आशिया अशांततेचे क्षेत्र असल्याने भारत पर्याय म्हणून रशियाकडून ३८ टक्के कच्च्या तेलाची आयात करतो. या अशा व्यापारिक संबंधात भारत-पाक संबंध अडसर ठरले नाहीत. महत्वाचे म्हणजे मध्यपूर्वेतील अमेरिकेच्या बाजूने असलेल्या देशांनाही भारताच्या शांततेच्या भूमिकेचे महत्व पटायला लागले. २०२२ मधील रशिया-युक्रेन युद्धादरम्यान भारतीय नागरिकांना बाहेर काढण्यासाठी ऑपरेशन गंगा, त्यापूर्वी २०२१ मधील अफगाणिस्तान-तालिबान संघर्षाच्या वेळी ऑपरेशन देवी शक्ती राबविण्यात आले. परस्पर सहकार्याचा हा परिणाम आहे.

या युद्धात भारताची भूमिका शांततेची आहे, तर पाकिस्तानची भूमिका काहीतरी पदरात पाडून घेण्याची दिसली. इराण आणि पाकिस्तान यांच्या ९०० किलोमीटरच्यावर सीमा लागून आहेत. अशा परिस्थितीत इराणला नियंत्रणात ठेवण्यासाठी पाकिस्तानचे सहकार्य अमेरिकेला आवश्यक आहे. पश्चिम आशियावर नियंत्रण ठेवायचे असेल तर पाकिस्तानची मदत



गरजेची आहे, हा अमेरिकेचा दृष्टिकोन पुढे आला. म्हणूनच अमेरिका पाकिस्तानचे लाड करतो. त्याकरिता अमेरिकेने डिनर डिप्लोमाशी राबविली. या युद्धादरम्यान पाक लष्करप्रमुख मुनीर यांचा अमेरिका दौरा अमेरिकेच्या भूमिकेवर संदेह निर्माण करणारा ठरला. मुनीर यांनी ट्रम यांना शांततेचे नोबेल देण्याची शिफारस केली ते त्यांच्या अंगलट आले. पाकिस्तानी नागरिक त्याला विरोध करतांना दिसते आहे. इस्रायलने अमेरिकेच्या मदतीने इराणमधील अणुबॉम्ब असलेल्या ठिकाणं उध्वस्त केल्याचा दावा केला. यानंतर पुढील नंबर पाकिस्तानचा असल्याची भूमिका इस्रारायल पंतप्रधान नेतन्याहू यांनी मांडल्याने पाकिस्तानच्या मनात भीती निर्माण झाली. या युद्धात अमेरिका उतरल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ट्रम्प यांनी युद्धविरामची घोषणा केली. दोन्ही देशाने युद्धविरामची मागणी केल्याचे अमेरिकेचे मत आहे. एकीकडे अमेरिका प्रॉक्सी युद्ध करतो, तर दुसरीकडे शांतिदूत बनण्याचा प्रयत्न करतो आहे. अशी त्याची दुटप्पी भूमिका आता जगासमोर आली. अमेरिकेने हल्ला केला त्या ठिकाणी युरेनियम नव्हते हे आता स्पष्ट झाले.

अफगाणिस्तानमधील तालिबानी राजवट, पाकमधील लष्कर आणि दहशतवादी संघटनांचे संबंध, पाकमधून इराणमध्ये होणाऱ्या दहशतवादी कारवाया, पश्चिम आशियातील हमास, पीपल्स मुजाहिदीन ऑफ इराण अशा काही दहशतवादी संघटना सक्रिय असतांनाही भारताची दहशतवादविरोधी लढाई सुरू असून त्या विरोधात जागतिक पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतो आहे. या प्रयत्नात भारताला आंतरराष्ट्रीय पाठिंबाही मिळतो आहे. छोटे-मोठे देश दहशतवादाचा वापर स्वार्थासाठी करीत असून ती एक विकृती आहे हे जगाला पटवून देण्यात भारत पूर्णपणे यशस्वी ठरला असे म्हणता येणार नाही. कारण दहशतवादाचा वापर शत्रु देशातील शांतता भंग करण्याकरिता होतो आहे. म्हणजेच कुरघोडीच्या राजकारणाकरिता होतो आहे.

इराण आणि इस्रायल या दोन्ही देशांना भारताकडून पाठिंब्याची अपेक्षा आहे. मात्र भारताने दोन्ही देशांना युद्ध थांबून शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन केले. ज्याप्रमाणे रशिया- युक्रेन युद्धात भारताने शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले. त्याचप्रमाणे या युद्धातही भारताची भूमिका शांततेच्या बाजूनेच होती. भारताचे इराणपेक्षा इस्रायलसोबत अधिक व्यापारिक आणि मैत्रीपूर्णसंबंध असतांनाही भारताने इस्रायलचीही बाजू घेतली नाही. भारताने स्वातंत्र्यापासूनच अमेरिका आणि रशियाच्या शीतयुद्धापासून स्वतःला दूर ठेवले. अलिप्तता म्हणजे निष्क्रिय तटस्थता नव्हे. अण्वस्त्रांच्या जगात युद्धांची जी भीती निर्माण झाली आहे अशा स्थितीत भारत एक शांतता क्षेत्र म्हणून कार्य करील हे भारताचे स्वातंत्र्यापासूनचेच उद्दिष्ट आहे. तेच परराष्ट्र धोरण अशा परिस्थितीत उपयुक्त ठरतांना दिसते. त्या धोरणाला सहकार्यात्मक शांततेची जोड देऊन आपले आर्थिक हितसंबंध सुनिश्चित करण्याचा भारताचा प्रयत्न नवीन समीकरणांची मांडणी करणारा ठरतो. रशिया भारताचा पारंपारिक मित्र देश असतांनाही रशिया-युक्रेन युद्धात भारताने रशियाची बाजू घेतली नाही. तेच इराण-इस्रायल युद्धात केल्याने भारताची जगा आणि जगू द्या ही भूमिका जगासमोर आली. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक, कृषी व आर्थिक विकासासाठी बडया राष्ट्रांकडून मदत मिळवून आपला औद्योगिक व कृषी विकास घडवून आणला. जागतिक संघर्ष, शीतयुद्ध व युद्ध प्रवृत्तीपासून जगाला शांततेचा व सहजीवनाचा मार्ग दाखविण्याचे यशस्वी कार्य परराष्ट्र धोरणातील पंचशील व शांततापूर्ण सहअस्तित्व या मूलभूत तत्त्वांमूळे सुरू राहिले. शांततामय सहजीवनाचे आवाहन रशियाने जगाला केल्यानंतर शीतयुद्धाची धार कमी झाली होती. मात्र अमेरिकेच्या भूमिकेमुळे पुन्हा-पुन्हा युद्धाची वेळ येते. अशा परिस्थितीत खऱ्या अर्थाने शांततामय सहअस्तित्व प्रस्थापित करण्याचा भारताचा प्रयत्न सुरू असतो.

भारताची सार्क सदस्य देशांसोबत मदतीची भूमिका आहे. प्रमुख मोठे देश असलेल्या जी-२० देशांसोबतच्या व्यापारीक संबंधांवर भारताच्या या धोरणाचा कोणताही परिणाम झालेला नाही. भारताची संयुक्त राष्ट्रातील भूमिका परस्पर सहकार्याची आणि विश्वासहार्ययतेची आहे. एकूणच भारताचे अलिप्ततेतून शांततेकडे या नवधोरणाचे आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वागतच होत आहे. त्यातूनच भारताने व्यापारीक सहअस्तित्वाची जाणीवही करून दिली. असो इराण-इस्रायल युद्ध सुरू करणारी आणि थांबविणारी अमेरिका जिंकली असली तरी नुकसान मात्र युद्धभूमी असलेल्या दोन्ही देशाचे झाले, म्हणजेच मानवतेचे झाले.

लोकजागर

# नोव्हो नॉर्डिस्कचे वजन व्यवस्थापन औषध विगोव्ही आता भारतात उपलब्ध



नोव्हो नॉर्डिस्क ही डॅनिश औषध कंपनी आहे जिच्याकडे दीर्घकालीन रोगांची काळजी घेण्यासाठी १०० वर्षांहून जास्त काळाचा वारसा आहे आणि तिने भारतामध्ये विगोव्ही (इंजेक्शन घेण्यायोग्य सेमाग्लुटाइड) लाँच करण्याची घोषणा केली. विगोव्ही हे एक आठवड्यात एकदा इंजेक्शन घेण्यायोग्य ग्लुकागॉन-सारखे पेप्टाईड-१ रिसेप्टर अगॉनिस्ट (जी.एल.पी-१ आर.ए) असून हे स्थूलतेने त्रस्त असलेल्या लोकांसाठी भारतात दीर्घकालीन वजन व्यवस्थापन आणि महत्त्वाच्या प्रतिकूल हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी घटनांची (एम.ए.एस.इ ची) जोखीम कमी करण्यासाठी दर्शविलेले पहिले आणि एकमेव औषध आहे. हे पाच डोस ताकदींमध्ये उपलब्ध असून त्यात अभिनव वापरण्यास सुलभ पेन उपकरणाची सोय आहे. विगोव्ही हे एक प्रिस्क्रिप्शन-केवळ औषध आहे ज्यामध्ये लठ्ठपणा किंवा जास्त वजन असलेल्या लाखो भारतीयांचे जीवनमान सुधारण्याची क्षमता आहे. च्या अभ्यासानुसार, भारतात सामान्यीकृत लठ्ठपणा असलेले २५४ दशलक्ष लोक आणि पोटातील लठ्ठपणा असलेले ३५१ दशलक्ष लोक आहेत. जास्त वजन आणि लठ्ठपणा असलेले लोक राहणाऱ्यांमध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. चिंताजनक म्हणजे, लठ्ठपणा हा २०० हून अधिक आजारांशी संबंधित आहे, ज्यामध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, विशिष्ट प्रकारचे कर्करोग आणि टाइप २ मधुमेह यांचा समावेश आहे. लठ्ठपणाबद्दल गैरसमजांमध्ये असे म्हटले जाते की ते चुकीच्या जीवनशैली निवडी आणि स्वयं-शिस्तीच्या अभावाचा परिणाम आहे. तथापि, लठ्ठपणा अनेक वेगवेगळ्या घटकांमुळे होतो, ज्यामध्ये अनुवंशशास्त्र, जीवशास्त्र, मानसशास्त्र, समाज आणि आपण ज्या वातावरणात राहतो त्यासह. टाइप २ मधुमेह किंवा दमा यासारख्या इतर जुनाट आजारांप्रमाणे, लठ्ठपणासाठी प्रभावी उपचार उपायांसह दीर्घकालीन व्यवस्थापन आवश्यक आहे. विगोव्ही हे फक्त औषधपत्र (प्रिस्क्रिप्शन) दिल्यावरच दिले जाणारे औषध आहे जे लाखो भारतीयांमध्ये स्थूलतेने त्रस्त किंवा वजन जास्त असलेल्या लोकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याची क्षमता ठेवते.

# काळानुसार एसटी सेवेत परिवर्तन होणे आवश्यक आहे का?

वाद संवाद

**आनंद मराठे** जेष्ठ नागरिक

होय बदलत्या काळानुसार महाराष्ट्रातील अगदी खेड्यापाड्यात दुर्गम भागात पोचणाऱ्या एसटी सेवेत बदल हा व्हायलाच हवा. एसटीचे सर्वांगाने अत्याधुनिकरण झाले तरच आर्थिक दृष्टिकोनातून डबघाईला आलेली एसटीची सेवा हि पुढे कायम सुरळीत ठेवता येण शक्य आहे. खाजगी प्रवासी वाहतूक सेवांच्या तुलनेत एसटी चे जुने स्वरूप म्हणजे भंगार आहे यात बदल केल्याशिवाय तरणोपाय नाही.

**जगदीश माळी** एसटी चालक

एसटीची सेवा हि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची सर्वात स्वस्त आणि दूरगामी सेवा आहे. मध्यंतरी दिवंगत अभिनेते विक्रम गोखले याना एसटी चे ब्रँड अँबेसेडर बनवून नवे बदल केले गेले. मात्र तरी देखील प्रवाशांची एसटीकडे पाठच आहे. एसटीचे खाजगीकरण केले गेले आणि अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी वाहन जर आणली तर एसटीची सेवा हि वेगाने धावू शकेल असं वाटत.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 84



## हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
- कड
- कद
- कन्या
- कर
- क्रम
- काच
- केका
- खाक
- खूर
- तान
- धोंड
- नशा
- न्यारा
- पात
- भद्र
- माल
- मास
- वणी
- वाफ
- सर
- सहा

**तीन अक्षरी**
- कवच
- कवडी
- कानन
- खोपडी
- गीताई
- जपान
- डोरले
- पामर
- पणजा
- पाटली
- पारवा
- पालव
- पावली
- बाजार
- मरण
- मिरगी
- रपका
- रासभ
- वचक
- वतन
- वारीस
- शैतान
- क्षीणता
- सारस
- हडप

**चार अक्षरी**
- आमाशय
- करवत
- कास्तकार
- गीतकार
- चक्रपाणी
- चामखीळ
- प्रमाणित
- बारगीर
- भाद्रपद
- भानगड
- मयसभा
- वहिवाट
- वायबार
- वारकरी
- सारवान

**पाच अक्षरी**
- टवाळखोर
- डरकावणी
- मकरध्वज
- मदतगार

**सहा अक्षरी**
- शववाहिका
- कमालखानी हार
- आपादमस्तक
- महर्षी धोंडो केशव कर्वे
- गाजरपारखी
- नीर क्षीर न्याय

**अन्य अक्षरी**

(उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 464



**—: आडवी विधानेः—**

1) संशय, संदेह
3) जुन्या काळी राज्यकर्त्याकडून बक्षिसादाखल मिळालेला मुलूख
6) उघड, स्पष्ट
8) निरोप, बातमी
10) जंगल, वन
11) अंधार, काळोख
12) मौजेची मोठी गोष्ट
13) शय्या, अंथरुण
15) राजाची पत्नी
16) वर देणारा, प्रसन्न
17) तुरुंगात राहणे
18) सखा, दोस्त
19) ...... ठाय, गाळलेले शब्द भरुन ही म्हण पूर्ण करा
21) पुस्तकाचे पान, मागची किंवा वरची बाजू
22) धरणारा
24) गदा धारण करणारा
26) प्राणीसंग्रहालय (इं.)
27) वेणू, बांसरी
29) काही दिवसांकरीता माहेरी आलेली स्त्री
31) नरमणे, मृदू होणे
33) वंशपरंपरेने मिळालेली वृत्ती, देश
34) टी. व्ही. वरील एक खासगी मराठी चित्रवाहिनी
36) ज्वाला, आगीचा झोत
37) हिंदीत विणकर
38) लाक्षणिक अर्थाने दुर्जन किंवा गुंड
39) तरचा सोबती
40) व्याजाने कर्जाऊ पैसे देणारा
41) थोडेसे, वार्धक्य, म्हातारपण
42) व्यर्थ भाषण, उगाचच केलेली बडबड
44) ज्याचा क्रोध हा विकार नष्ट झालेला आहे असा
46) साधारणतः उन्हाळ्यात मिळणारे एक फळ
49) रानरेडा
51) शिक्षा, दंड (हिं.)
52) पर्ण, विडा
53) शौचास साफ न होणे
55) सूट, सवलत
56) वाटणे, वितरीत करणे
58) नवीन
59) वांति, ओकारी
60) वैराग्य, मन विटणे, विरक्ती
62) पशुपक्ष्यांची शिकार
63) जुन्या काळातील एक प्रचलित चलन, रुपयाचा सोळावा भाग
64) दूध, खीर
65) जवळपासचा प्रदेश, वातावरण
66) घोड्याला काबूत ठेवणारा चामड्याचा पट्टा
68) मामा किंवा मामाचे घर
70) महाभारताचे रचयिता
71) मर्यादा, अंत
72) श्रीलंकेचा एक शेजारी देश
74) पात्र, योग्य
76) मुर्खपणा (हिं.)
78) विचारविनिमयासाठी जमलेली मंडळी, बैठक
80) गवताची पेंढी, ओझे
81) पथ, वाट
82) एक लक्ष ही संख्या
83) मन मोहून टाकणारे

**—: उभी विधानेः—**

2) चुलता, वडिलांचा भाऊ
3) रामायणातील सीतेचा पिता
4) प्रख्यात कवि ग.दि. माडगुळकर यांचेद्वारा रचित व सुधीर फडके यांनी गायिलेले रामायणावरील सुमधुर महाकाव्य
5) मनाला रमविणारे
6) चूक, हयगय
7) ओढा, झोंक
8) सायंकाळी देवघरात लावलेला तेलाचा दिवा
9) चर्चा, भांडण
12) पर्वत
13) टिप्पणी, खुलाशादाखल केलेला उल्लेख
14) क्षणार्धात, पापणी लवण्यास जेवढा वेळ लागतो तेवढा काळ
16) वर, देणगी
17) लाकूड
20) आंच, उष्णता
22) भूकंप
23) गव्हाचे दाणेदार पीठ
25) मुस्लिम वर्षाचा नववा महिना
27) पाप, दुष्कर्म
28) मर्कट
30) झटकन काव्य रचणारा कवी
32) .......... जय मल्हार, खंडोबाचा जयजयकार
33) जंगलाचा राजा, सिंह
34) छान, देखणा, गोंडस
35) ग्लानी येणे, थकल्यासारखे होणे
37) दाटी, गर्दी
40) रक्तवाहिनी
42) सुधारणाप्रिय, प्रगतीप्रिय
43) चुगली, चहाडी
45) उष्ण, गरम
47) उन्हाळ्यात उसाचा थंडगार रस पिण्याचे ठिकाण, जिव्हा
48) सतत, न थांबता एकसारखे
50) तलाव, जलाशय
54) टेहळणीची जागा, लहान बुरुज
56) संगमरवरी
57) नवीन, अलीकडचा
60) आराधना, तपश्चर्या
61) दूध, पाणी
62) क्षुल्लक, तेजोहीन
63) घर, निवासस्थान
65) बोलावणे, प्रारंभ
67) देवालयाच्या आतील भाग
69) एक राशी
73) फिकीर, पर्वा
75) चंद्राचा सोळावा भाग
77) सेवक, चाकर 78) सोबत, संगे
79) देवाजवळ मागितलेले मागणे

(उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# राशी-भविष्य

**मेष :** आर्थिक स्थितीत स्थिरता राहील. पैशाची कमतरता भासेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याशी वाद होण्याची शक्यता आहे.

**वृषभः** आर्थिक नुकसान होऊ शकते. आर्थिक बाबतीत तुम्हाला नुकसान सहन करावे लागू शकते. कोणालाही पैसे उधार देणे टाळा.

**मिथून :** तुम्ही आत्मविश्वासाने परिपूर्ण असाल, कुटुंबातील वातावरण सुसंवादी असेल. कुटुंबातील सदस्यांशी मतभेद दूर होतील. आरोग्य सुधारेल.

**कर्क :** वैवाहिक जीवनातही तणाव वाढेल. घटस्फोट इत्यादी बाबी सुरू असतील तर ते अंतिम निर्णयात बदलू शकते. महिलांचे कुटुंबातील वृद्ध महिलांशी मतभेद होतील.

**सिंह :** आत्मविश्वास वाढेल, आत्मविश्वास आणि शौर्य वाढेल. पद आणि प्रतिष्ठा वाढेल, आदर आणि कीर्ती मिळेल.

**कन्या :** कुटुंबातील वातावरण आनंददायी असेल. जास्त काम आणि धावपळ होणार नाही. मानसिक त्रास, अधिक चिंता आणि ताणतणाव असतील.

**तुळ :** तुम्हाला भौतिक सुखसोयी मिळू शकतात. तुम्हाला जमीन, मालमत्ता, वाहन, दागिने, नवीन कपडे इत्यादी मिळतील. तुम्हाला आदर मिळेल.

**वृश्चिक :** तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. मनात गोंधळ, शंका, भीती राहील. अशा परिस्थितीत कुटुंबातील अनुभवी आणि वृद्ध लोकांची मदत घ्या.

**धनु :** तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. अति रागाच्या भरात काहीही करू नका किंवा कोणाला वाईट बोलू नका.

**मकर :** कुटुंबात आणि कामाच्या ठिकाणी तुमचे महत्त्व वाढेल. तुम्हाला आदर मिळेल. काही महत्त्वाचे काम पूर्ण झाल्यानंतर तुम्हाला आराम वाटेल. महिला आनंदी राहतील.

**कुंभ :** कुटुंबातील सदस्यांशी असलेले मतभेद कमी होतील. तुम्ही मुलांसोबत वेळ घालवाल. व्यवसाय चांगला चालणार नाही, तुम्हाला नोकरीची ऑफर मिळेल.

**मीन :** तुम्हाला मित्रांकडून पाठिंबा मिळेल, नवीन नातेसंबंध निर्माण होतील. तुम्हाला मित्रांकडून पाठिंबा मिळेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### पत्रकार प्रबोध देशपांडे यांना राज्य शासनाचा लोकनायक बापूजी अणे पुरस्कार



**अकोला :** राज्य शासनाचा अमरावती विभागीय लोकनायक बापूजी अणे पुरस्कार २०२० पत्रकार प्रबोध देशपांडे यांना जाहीर करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे पुरस्कार घोषित केला. पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी राज्य शासनाच्यावतीने दरवर्षी विविध पुरस्कार देऊन पत्रकारांना सन्मानित केले जाते. २०१९ ते २०२३ पर्यंतचे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मंगळवारी राज्य शासनाने जाहीर केले. यामध्ये अमरावती विभागीय लोकनायक बापूजी अणे पुरस्कार २०२० साठी अकोल्यातील पत्रकार प्रबोध देशपांडे यांची निवड झाली. ५१ हजार रुपये, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. गेल्या २० वर्षांपासून प्रबोध देशपांडे हे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. विविध विषयांवर शोध पत्रकारिता करून अभ्यासपूर्ण लिखाण करण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या प्रभावी वृतांची विविध पातळीवर दखल घेतल्या गेली. अकोला श्रमिक पत्रकार संघाचे ते अध्यक्ष आहेत. सामर्थ्य फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष असून या संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सुद्धा ते सक्रिय आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयाच्या अभ्यागत मंडळावर सदस्य म्हणून प्रबोध देशपांडे यांनी आरोग्य क्षेत्रात देखील आपल्या कार्याची छाप सोडली. या अगोदर त्यांना पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी अनेक पुरस्काराने सन्मानित केले आहे.

### संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात' स्थनदा माता विद्यार्थिनी प्रस्ताव मंजूर

**अमरावती:** हल्लीच्या काळात मुलीचा शिक्षणाबाबतचा टक्का दिवसेंदिवस वाढतच आहे. विवाहानंतर देखिल मुली, स्त्रिया शिक्षण अविरतपणे सुरू ठेवतात. परंतू गरोदरपणा नंतर, बाळ जन्मल्यानंतर मात्र त्यांना अनेक मर्यादा येतात. दरम्यानच्या कालावधीत त्यांना शैक्षणिक अर्हता वाढविण्याकरीता विद्यापीठाच्या अनेक परिक्षा द्यावयाच्या असतात .परंतु अनेक स्थनदा मातांचे बाळ लहान असल्यामुळे त्यांना विविध अभ्यासक्रमाचे पेपर सोडविण्याकरीता मोठा अडचणीचा सामना करावा लागत असे. त्यांना आपला पाल्य २/३ वर्षाचा होईस्तोवर वाटच बघावी लागायची .त्यामूळे या लग्न झालेल्या मुलींच्या शिक्षणात २/३ वर्षांचा खंड पडत होता. यावर ठोस पर्याय निघायला हवं असं युवा सिनेट सदस्य अमोल देशमुख यांनी ठरविलं व तसा ठराव तयार करून त्यांनी सिनेट सभागृहा समोर ठेवला. सभागृहाने देखील त्यांच्या या प्रस्तावाला सहमती दर्शवून पुढील मंजुरी करीता परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे पाठविला. परीक्षा मंडळाने समिती स्थापित करून त्यांच्या अहवालानुसार प्रस्तावाची रचना केली. त्यानूसार मा.कुलगुरू महोदय यांनी डायरेक्शन काढून आता पुढे अशा '' स्थनदा माता विद्यार्थिनी यांना '' या पुढील शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या परीक्षे दरम्यान येणारे सर्व शाखांचे पेपर सोडविण्याकरीता ज्यादाचा २० मिनिटे अवधी तसेच स्थनपान करीता स्थनदा माता/विद्यार्थिनी यांना '' स्वतंत्र कक्षाची व्यवस्था/ हिरकणी कक्ष '' स्थापन करण्यात येईल . विद्यापीठाच्या या निर्णयाचा भविष्यात हजारो विद्यार्थिनींना त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत फार मोठा फायदा फायदा होणार आहे. करीता संवेदनशील असा सदर प्रस्ताव मांडणारे विद्यापीठाचे अधीसभा सदस्य श्री.अमोल देशमुख यांचा अनेक विद्यार्थिनी,महीला , महीला संघटना यांच्या द्वारे सन्मान करण्यात आला.

### कृषीदिनानिमित्त प्रगतीशील शेतकऱ्यांचा गौरव होणार

**अकोला :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दि. १ जुलै कृषीदिन साजरा करण्यात येणार आहे. यादिवशी सकाळी ११ वा. जि. प. कर्मचारीभवन परिसरातील संविधानभवनात प्रगतीशील शेतक-यांचा गौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.प्रत्येक तालुक्यातून दोन याप्रमाणे प्रगतीशील शेतकरी व जिल्हास्तरीय पीक स्पर्धेतील विजेते यांचा सत्कार करण्यात येईल. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शनही यावेळी होईल. अधिकाधिक शेतकरी बांधवांनी व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी केले.

# बांधकाम कामगारांची फसवणूक करणाऱ्या दलालांवर कठोर कारवाई

## कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या निर्देशानुसार दक्षता पथकांची स्थापना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि.२६ :** राज्यातील बांधकाम कामगारांची बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करून त्यांच्याकडून आर्थिक फसवणूक करणाऱ्या दलालांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील विविध भागातून लोकप्रतिनिधी व बांधकाम कामगारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नोंदणी, कीट वाटप व अन्य बाबतीत गैरप्रकार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून



आता राज्यभरात जिल्हास्तरावर दक्षता पथके स्थापन करून प्रभावी तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. प्रत्येक विभागात, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा कार्यालय प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र जिल्हास्तरीय दक्षता पथक गठीत करण्यात येणार आहे.

या पथकांचे कार्यक्षेत्र मात्र त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्याऐवजी दुसऱ्या जिल्ह्यावर असेल, जेणेकरून कारवाई अधिक निष्पक्ष आणि प्रभावी राहील. दक्षता पथकांना नेमून दिलेल्या जिल्ह्यांमध्ये बनावट कागदपत्रांद्वारे होणारी नोंदणी, नोंदणीसाठी पैसे मागण्याचे प्रकार तसेच खोटी दाखले सादर करून मिळवले जाणारे लाभ या बाबींवर लक्ष केंद्रित करून तपासणी मोहीम राबवण्यात येणार असून संबंधित दलालांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल. या मोहिमेसाठी क्षेत्रीय कार्यालयांना वाहन भाडेतत्वावर घेण्याची परवानगी देण्यात आली असून, तपासणीसाठी आवश्यक इतर खर्चही प्रशासकीय निधीतून नियमानुसार करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय दक्षता पथक प्रमुखांनी त्यांच्या कारवाईचा सविस्तर अहवाल विभागीय प्रमुखांना सादर करावयाचा आहे. विभागीय प्रमुख सर्व जिल्ह्यांचे अहवाल एकत्र करून आपल्या अभिप्रायासह मंडळ मुख्यालयास सादर करतील.

### दक्षता पथकाला तपासणीचे टार्गेट

ही विशेष तपासणी मोहीम प्रथम टप्प्यात १० जुलै २०२५ अखेरपर्यंत राबवली जाणार आहे. या तपासणी दरम्यान ज्यांना काही तक्रारी असतील त्यांना त्या दक्षता पथकाकडे देता येतील. प्रत्येक पथकाने दरमहा किमान एक तपासणी करणे बंधनकारक असून, त्या तपासण्यांचे संकलित अहवाल मंडळास दरमहा सादर करणे आवश्यक राहील. या निर्णयामुळे राज्यातील बांधकाम कामगारांची फसवणूक करणाऱ्या दलालांवर प्रभावी आळा बसेल, अशी अपेक्षा कामगारमंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी व्यक्त केली आहे.

# धावत्या रेल्वेतून मोबाईल चोरी; हेमंत गावंडे हत्याकांडाची पुनरावृत्ती टळली!

## नाशिक ते बडनेरा प्रवासादरम्यान रेल्वेत चोरीची घटना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला ,दि.२६ :** नाशिक ते बडनेरा दरम्यान धावत्या रेल्वेत प्रवास करत असलेल्या युवकाच्या मोबाईलची चोरी झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे काही वर्षांपूर्वी चर्चेत आलेल्या हेमंत गावंडे यांच्या हत्याकांडाची आठवण ताजी झाली आहे. यावेळी मात्र मोठी दुर्घटना टळली असून प्रवाशांनी धाडस दाखवत चोरट्याचा पाठलागही केला.

फिर्यादी अजय मनोज केशोया (२२), रा. बेलोरा , ता. पातूर) हे दिनांक २२ जून २०२५ रोजी रात्री ९.१५ वा. नाशिकहून बडनेराकडे रेल्वे (गाडी क्र. ०१२१२ मेमू एक्सप्रेस)ने प्रवास करत होते. गाडी नाशिक स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर उभी असताना ते आपल्या सीटवर झोपले होते. त्या दरम्यान एका अज्ञात इसमाने त्यांच्या १३ हजार ७००/- रुपये किमतीचा रेडमी १२५ मॉडेलचा मोबाईल त्यांच्या खिशातून चोरी केला.

घटना घडली त्यावेळी फिर्यादीसोबत त्यांचा मावस भाऊ आलोक प्रदीप झुनझुनवाला उपस्थित होता. चोरी लक्षात येताच आलोक यांनी धावत्या गाडीतून उडी मारून संशयिताचा पाठलाग केला, परंतु चोरटे अंधारात निघून गेला. या घटनेमुळे रेल्वे पोलीस दलाच्या कार्यप्रणालीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रेल्वेतील प्रवासी सुरक्षिततेबाबत रेल्वे पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याची टीका प्रवाशांकडून केली जात आहे.

अखेर फिर्यादीने २३ जून रोजी सकाळी ७ वाजता अकोला रेल्वे पोलीस ठाण्यात हजर होऊन तक्रार दाखल केली. या प्रकरणी गु.र.नं. १४८/२०२५, कलम ३०५() भा.दं.सं. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# देशात सामाजिक क्रांतीचे पर्व सुरू करणारे छत्रपती राजश्री शाहू महाराज -विष्णुदास मोंडोकार

## तिक्ष्णगत मल्टीर्पपज वेलफेअर सोसायटीच्या कार्यालयात राजर्षी शाहु महाराज जयंती उत्साहात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला ,दि.२६ :** राजा आणि संस्थानिक असलेल्या राजर्षी शाहू महाराज यांच्या दरबारात कोणताही जातीयवाद पाळला जात नव्हता. देशात सामाजिक क्रांतीचे पर्व सुरू करणारे छत्रपती राजश्री शाहू महाराज असल्याचे मत तिक्ष्णगत मल्टी पर्पज वेलफेयर सोसायटी चे सचिव विष्णुदास मोंडोकार यांनी आज तिक्ष्णगत मल्टीर्पपज वेलफेअर सोसायटी च्या कार्यालयात शाहू महाराज जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

आज २६ जून रोजी साजरी करतात त्यानिमित्ताने अकोला येथील तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फ ेअर सोसायटी च्या कार्यालयात




प्रसिद्ध उद्योजक, समाजसेवक व संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांच्या सूचनेनुसार छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना हारार्पण करण्यात आला व त्यांना अभिवादन करण्यात आले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपलं संपूर्ण आयुष्य सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार, मागासवर्गीयांचे सक्षमीकरण यासाठी समर्पित केले त्यांच्या कार्याला आणि विचारांना उजाळा याप्रसंगी संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार व संस्थेचे जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांनी दिला. यावेळी ॲड. संजय सेंगर श्रीकांत पिंजरकर अश्विन शिरसाट, ॲड. दिनेश कवडे,प्राध्यापक डॉ. प्रदीप अवचार, दिनेश कवडे, विशाल शिंदे, बॉबी पळसपगार, अंकुश शिरसाट, तसेच संस्थेचे सदस्य उमेश शिरसाट , श्वेता शिरसाट , सुचिता घोगरे, करण पळसपगार,सपना म्हात्रे,यश साळवे, रश्मी घुगे, भीमा शिरसाट तसेच दैनिक अजिंक्य भारतचे नरेंद्र गारोळे, पत्रकार सिद्धार्थ तायडे, योगेश हिरळकर , प्रतीक गोळे, पत्रकार रवी देशमुख, पत्रकार शरद शेगोकार,पत्रकार श्रीकांत पाचकवडे,योगेश लबडे, अकोलखेड प्रतिनिधी धन्नू बायवार संजय मेटांगे,दिपाली बाहेकर,चंचल देशमुख, आकांक्षा गोमासे उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉंग्रेसने मूर्तिजापूर नगरपालिकेमध्ये टाकला कचरा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २६ :** शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस तर्फे मूर्तिजापूर नगर परिषदमध्ये कचरा टाकला गेल्यामुळे सर्वत्र ठिकाणी या आंदोलनाची चर्चा होत आहे.

मूर्तिजापूर शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी कचरा गाड्या जात नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात शहरातील ठीक ठिकाणी कचरा व घाण निर्माण झालेली आहे. बाहेर पडलेला कचरा महिनाभर ट्रॅक्टर द्वारा उचलला जात नसल्याने अनेक ठिकाणी दुर्गंध आणि आरोग्याला धोका निर्माण करणारे जंतू निर्माण



झालेले आहे. पावसाळ्याचे दिवस सुरू असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य सुद्धा धोक्यात आलेले आहे. अशा वेळी अनेकदा संबंधित ठेकेदारांना या विषयावर शहरातील ठिकठिकाणी असलेला कचरा नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असल्याने उचलावे तरी नगर परिषद यासंदर्भात कोणताच पुढाकार घेत नसून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करत आहे तर बरेच ठिकाणी कचरा गाड्यांचे भोंगेसुद्धा बंद आहेत. स्वच्छता मोहिमेसाठी देशाचे पंतप्रधान यांनी वेगळे स्वप्न दाखवले होते; परंतु त्या स्वप्नाचा भंग संबंधित ठेकेदार व अधिकारी करत आहे. डम्पिंग ग्राउंड येथे कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी लाखो रुपये खर्च करण्यात येत आहेत; पण याचा कुठेतरी दुरुपयोग होताना दिसत आहे. या संदर्भात बरेच नागरिक आक्रमक झाले असून, त्यांनी शेवटी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या युवक कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष संदीप जळमकर यांनी शेवटी मूर्तिजापूर नगर परिषदमध्ये कचरा आणून टाकला. यावेळी निजाम इंजिनियर, सुरेंद्र वरोकार विशाल शिरभाते, आनंद पवार, रवी माडकर, आकाश सोनटक्के, वैभव टिपरे, सवईकर दुरतकर, आष्टीकर उपस्थित होते.

### नगर परिषदमध्ये कायमस्वरूपी मुख्याधिकारी द्या

मूर्तिजापूर नगर परिषदमध्ये कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्यामुळे मागील तीन महिन्यापासून तीन मुख्याधिकारी प्रभारी बदलून गेले. मूर्तिजापूर शहरातील विविध समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. कचरा, घाण व इतर समस्यासुद्धा नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत; तरी मूर्तिजापूर नगर परिषदमध्ये कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्यामुळे नागरिकांना ना त्रास सहन करावा लागत आहे, अशा परिस्थितीत मूर्तिजापूर नगरपालिकामध्ये मुख्यालयी राहणारा व कायमस्वरूपी मुख्याधिकारीची नियुक्ती त्वरित करण्यात यावी

**संदीप जळमकर**
राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेश उपाध्यक्ष

# जिल्ह्यात बरसला जोमदार पाऊस; शेतकरी सुखावला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**टाकळी बु , दि. २६ :** टाकळी बु. परिसरासह जिल्ह्यात पावसाने मे महिन्यात धिंगाणा घातला होता व जून महिन्यात जास्त. दिवस उघड दिल्याने शेतकरी वर्ग चिंतातुर झाला होता; पण मंगळवारपासून जोरदार पावसाने परिसरात सुरुवात केली तर जिल्ह्यात बुधवारी आणि गुरुवारी जोमदार बरसल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जवळपास टाकळी परिसरात ८० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. तर उर्वरित जिल्ह्यात पेरणीयोग्य पाऊस बरसल्याने पेरणी करण्याच्या कामांना वेग आला



आहे. जून महिन्याच्या प्रारंभी आणि मध्यात पाहिजे असा पाऊस नसल्याने शेतकरी वर्ग चिंतातूर झाला होता. पण आता पावसाने दमदार हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला आहे. यावर्षी कपाशी, सोयाबीन व तूर या पिकांना सर्वात जास्त पसंती असून, कपाशी व सोयाबीन पेरणीत घट झाली. तसेच उडीद आणि मुगाचे पीक नामशेष झाले आहे. यावर्षी सोयाबीन व तूर या पिकाला भाव नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. मागील वर्षी सोयाबीनने शेतकऱ्यांना अक्षरशः मेटाकुटीस आणले होते. सतत पाऊस सुरू असल्याने सोयाबीन पीक हे एफएक्यू दर्जाचे न राहता डिस्कलर झाल्याने शेतकऱ्यांना मातीमोल विकावे लागले. त्यातच तुरीने पण शेतकऱ्यांच्या हाती 'तुरी' दिल्याने शेतकऱ्यांचे फार आर्थिक नुकसान झाले आहे. यावर्षी तरी चांगले पीक येईल व भावसुद्धा चांगले राहतील, या आशेवर शेतकरी आहेत. परिसरात पावसाने दमदार हजेरी लावल्याने शेतकरी वर्ग आनंदात आहे.

# राज्य अजिंक्य मुष्टियुद्ध स्पर्धेत अकोल्याला ९ पदके

## साक्षी गायधनी व कांचन सुरांसेला सुवर्णपदक ४ सुवर्ण, १ रौप्य व ४ कांस्यपदकांचा समावेश






दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** वरिष्ठ राज्यस्तरीय महिला मुष्टियुद्ध स्पर्धेत अकोला क्रीडा प्रबोधिनी व अकोला शहर संघाच्या खेळाडूंनी तब्बल ९ पदके पटकावत राज्यात पहिला क्रमांक मिळवला. साक्षी गायधनी, कांचन सुरांसे यांनी सुवर्णपदक मिळवले असून, अकोल्याच्या मुष्टियोद्ध्यांचा राष्ट्रीय स्पर्धेत प्रवेश निश्चित झाला आहे. वरोरा येथे नुकतीच राज्यस्तरीय महिला मुष्टियुद्ध स्पर्धा झाली. त्यात क्रीडापीठ संघातून ८० कि. वजनगटात साक्षी गायधनी व ८० किलोवरील गटात कु. कांचन सुरांसे यांनी, ७५ कि. वजनगटात विधी रावळ व ५७ कि. वजनगटात कु. सपना चव्हाण यांनी सुवर्णपदक मिळवले. रूणाली डोंगरे यांनी ४८ कि. वजनगटात रौप्यपदक मिळवले. पूनम कैथवास यांनी ६० कि. वजनगटात व गौरी मुरूमकार यांनी ७० कि. गटात कांस्यपदक प्राप्त केले. अकोला शहर संघामधुन ६५ कि. गटात सिमरन गवई व ८०+ गटात प्रियंका खंडारे यांनी कांस्यपदक प्राप्त केले.

### जिल्हाधिकाऱ्यांनी केले खेळाडूंचे कौतुक

जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी गुणवंतांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षक सतीशचंद्र भट यांच्या मार्गदर्शनानुसार खेळाडू प्रशिक्षण घेत आहेत. क्रीडा प्रशिक्षक म्हणून योगेश निषाद व स्नेहा वणवे यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा विभाग सहायक संचालक सुधीर मोरे, क्रीडापीठ प्रमुख सुहास पाटील, उपसंचालक संजय सबनीस, शेखर पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email adderss-tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी / म.स./कावि- ४५५/२०२५
दिनांक २३/०६/२०२५

### जाहिरनामा

अर्जदार :- वल्लभ उत्तम राऊत रा. धावंडा ता. मानोरा जि. वाशिम ...विरूध्द...
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, धावंडा ता. मानोरा जि. वाशिम बनाम :- सर्व नागरिक
याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार वल्लभ उत्तम राऊत रा. धावंडा ता. मानोरा जि. वाशिम येथील रहिवासी यांनी स्वतःचे पणजोबाचे नावाने मृत्यु नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, धावंडा ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराचे पणजोबा नामे परशराम गणपत राऊत यांचा मृत्यु दिनांक ०७/०५/१९८२ रोजी अर्जदाराचे वडिलाचे राहते घरी मौजा धावंडा ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, धावंडा येथे गेले असता अर्जदाराचे स्वतःच्या पणजोबाचा मृत्यू नोंदीचा अभिलेख आढळला नाही. अर्जदाराकडून मृत्यु नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, धावंडा यांचे कडून मृत्यु नोंद नसल्याचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.
प्रकरणात अर्जदारानी आधार कार्ड, सचिव, ग्राम पंचायत, धावंडा यांचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र, सरपंच/पो.पाटील यांचा रहिवासी प्रमाणपत्र, वंशावळ, मतदान कार्ड, शिधापत्रिका, कोतवाल बुक नक्क्ल या सोबत जोडलेले आहे. तरी वरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, धावंडा येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये मृत्यु नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.
करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे पणजोबाचा मृत्यु मौजा धावंडा ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/ अभिलेख उपलब्ध नसल्याने मृत्यु नोंद ग्राम पंचायत कार्यालय, धावंडा ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे पणजोबाचे मृत्यु नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.
आज दिनांक २३/०६/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

**(डॉ. संतोष येवलीकर)**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email adderss-tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- ४६७/२०२५
दिनांक २५/०६/२०२५

### जाहिरनामा

अर्जदार :- सुखदेव विठ्ठल शिंदे रा. आमकिन्ही ता. मानोरा जि. वाशिम ..विरूध्द..
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, आमकिन्ही ता. मानोरा जि. वाशिम बनाम :- सर्व नागरिक
याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार सुखदेव विठ्ठल शिंदे रा. आमकिन्ही ता. मानोरा जि. वाशिम येथील रहिवासी यांनी स्वतः चे मुलीवमुलांचे नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, आमकिन्ही ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराचे मुली व मुलांचे नामे (१) पुनम सुखदेव शिंदे हिचा जन्म दिनांक १३/०६/२००५ (२) शंकर सुखदेव शिंदे यांचा जन्म दिनांक ११/०८/२००७ (३) सरस्वती सुखदेव शिंदे हिचा जन्म दिनांक ११/०२/२००९ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा आमकिन्ही ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, आमकिन्ही येथे गेले असता अर्जदाराचे स्वतःच्या मुली व मुलांचा जन्म नोंदीचा अभिलेख आढळला नाही. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, आमकिन्ही यांचे कडून जन्म नोंद नसल्याचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. प्रकरणात अर्जदारानी आधार कार्ड, सचिव, ग्राम पंचायत, आमकिन्ही यांचा जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र, सरपंच/पो. पाटील यांचा रहिवासी प्रमाणपत्र, वंशावळ, मतदान कार्ड, शिधापत्रिका या सोबत जोडलेले आहे. तरी वरिल शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व बोनाफाईड प्रमाणपत्र यावरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, आमकिन्ही येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे. करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वत:चे मुला / मुलीचे जन्म मौजा आमकिन्ही ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/ अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, आमकिन्ही ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वत:चे मुला व मुलीचा जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.
आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

**(डॉ. संतोष येवलीकर)**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email adderss-tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- ४३७/२०२५
दिनांक १८/०६/२०२५

### जाहिरनामा

अर्जदार :- गजानन नारायण पानबुडे रा. फुलउमरी ता. मानोरा जि. वाशिम ..विरूध्द...
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, फुलउमरी ता. मानोरा जि. वाशिम बनाम :- सर्व नागरिक
याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार गजानन नारायण पानबुडे रा. फ ुलउमरी ता. मानोरा जि. वाशिम येथील रहिवासी यांनी स्वतःचे मुलांचे नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, फुलउमरी ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराचे मुलांचे नामे विक्की गजानन पानबुडे यांचा जन्म दिनांक १४/०४/२००२ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा फुलउमरी ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, फुलउमरी येथे गेले असता अर्जदाराचे स्वतःच्या मुलांचा जन्म नोंदीचा अभिलेख आढळला नाही. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, फुलउमरी यांचे कडून जन्म नोंद नसल्याचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.
प्रकरणात अर्जदारानी आधार कार्ड, सचिव, ग्राम पंचायत, फुलउमरी यांचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र, सरपंच/पो.पाटील पांचा रहिवासी प्रमाणपत्र, वंशावळ, मतदान कार्ड, शिधापत्रिका, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अंगणवाडी सेविका यांचे प्रमाणपत्र या सोबत जोडलेले आहे. तरी शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रा वरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, फुलउमरी येथे जन्म- मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.
करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे मुलांचे जन्म मौजा फुलउमरी ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/ अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, फुलउमरी ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे मुलांचे जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.
आज दिनांक १८/०६/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

**(डॉ. संतोष येवलीकर)**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा**

# मायदेशात धूळधाण; परदेशात शरणागती!

## टीम इंडियाच्या मागील ९ कसोटी सामन्यांची आकडेवारी धक्कादायक

**नवी दिल्ली: दि. २६** प्रतिनिधी

कसोटी फॉरमॅटमध्ये सध्या केवळ स्थित्यंतराच्याच नव्हे, तर गंभीर संकटाच्या काळातूनही जात आहे. संघाच्या पराभवाची मालिका अशी सुरू झाली आहे की, ती थांबण्याचे नावच घेत नाहीये. सलग पराभवांमुळे संघाची स्थिती इतकी खालावली आहे की, विजय मिळवणे ही एक दूरची गोष्ट वाटू लागली आहे.

आकडेवारीवर नजर टाकल्यास, भारतीय संघाने आपल्या मागील ९ कसोटी सामन्यांपैकी केवळ एकच सामना जिंकला आहे. या निराशाजनक कामगिरीमुळे जगातील इतर संघ भारताच्या खूप पुढे निघून गेले आहेत, इतकेच नव्हे तर पाकिस्ताननेही या कालावधीत भारतापेक्षा जास्त सामने जिंकले आहेत.भारतीय संघाच्या पराभवाची ही मालिका अलीकडची नाही. याची सुरुवात न्यूझीलंडच्या भारत दौऱ्यापासून झाली होती. न्यूझीलंडचा संघ



भारतात येऊन तीन सामन्यांच्या मालिकेत भारताचा ३-० असा सपशेल पराभव करेल, अशी कोणीही कल्पना केली नव्हती. मात्र, तसे घडले आणि त्यानंतर भारतीय संघ अद्याप विजयाच्या मार्गावर परतलेला नाही.न्यूझीलंड मालिकेनंतर भारतीय संघ पाच सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेला. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये खेळल्या गेलेल्या या मालिकेतील पहिला सामना जिंकून भारताने दमदार सुरुवात केली होती. यामुळे केवळ मालिका जिंकण्याच्या आशा पल्लवित झाल्या नाहीत, तर भारतीय संघ पुन्हा एकदा जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचा () अंतिम सामना खेळेल, असे चित्र निर्माण झाले होते. परंतु, घडले मात्र याच्या अगदी उलट. पहिला सामना जिंकल्यानंतर भारतीय संघाला जणू दृष्ट लागली आणि त्यानंतर मालिकेत एकही सामना जिंकता आला नाही. एक सामना अनिर्णित राखण्यात यश आले, पण विजय संघापासून दूरच राहिला.जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या नव्या पर्वात तरी भारतीय संघ विजयाने सुरुवात करेल, अशी अपेक्षा होती, पण येथेही पराभवच पदरी पडला. याचाच अर्थ, मागील ९ कसोटी सामन्यांत भारतीय संघ केवळ एकच सामना जिंकू शकला आहे. अशी दयनीय अवस्था इतर कोणत्याही प्रमुख संघाची नाही. पाकिस्ताननेदेखील भारतीय संघापेक्षा जास्त सामने जिंकले आहेत.या कालावधीतील कामगिरीचा विचार केल्यास, दक्षिण आफ्रिकेचा संघ अव्वल स्थानी आहे. त्यांनी आपल्या मागील ९ कसोटी सामन्यांपैकी आठ सामन्यांमध्ये विजय नोंदवला आहे. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांनीही समाधानकारक कामगिरी केली आहे. पाकिस्तान संघाची स्थितीही फारशी चांगली नसली तरी, त्यांनी मागील ९ कसोटी सामन्यांपैकी तीन सामने जिंकण्यात यश मिळवले आहे. याउलट, भारतीय संघाची कामगिरी अत्यंत निराशाजनक राहिली आहे.

## सूर्यकुमार यादवने अचानक हॉस्पिटलमधून शेअर केला फोटो



**नवी दिल्ली: दि. २६** प्रतिनिधी

सध्या भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर असून ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळत आहे. दरम्यान कसोटी संघाचा भाग नसलेले खेळाडू आपल्या कुटुंबाबरोबर वेळ घालवत आहेत. त्याचप्रमाणे भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादवदेखील पत्नी देविशासह पॅरिस आणि लंडनमध्ये फिरताना दिसला. पण त्यानंतर अचानक त्याने सर्जरी झाल्याचा फोटो शेअर केला आहे.आयपीएल २०२५ नंतर सूर्यकुमार यादव आणि त्याची पत्नी देविशा शेट्टी पॅरिसला फिरायला गेल्याचे फोटो त्यांनी शेअर केले आहेत. त्यानंतर दोघेही लंडनमध्ये फिरताना दिसले. सूर्याची पत्नी देविशा हिने तिचं युट्युब चॅनेल नुकतंच ओपन केलं असून त्यावर तिने या सहलीचे दोन शॉर्ट व्हीडिओ शेअर केले आहेत. यानंतर सूर्यकुमारने अचानक जर्मनीमध्ये शस्त्रक्रिया झाल्याचा फोटो शेअर केला.सूर्यकुमार यादवच्या दुखापतीवर जर्मनीच्या म्यूनिच येथे शस्त्रक्रिया पार पडली. त्याला स्पोर्ट्स हर्नियाचा त्रास होत होता. सूर्याने रुग्णालयाच्या बेडवरून त्याचा फोटो शेअर केला आणि शस्त्रक्रियेबाबत अपडेट दिले. त्यांने सांगितलं की त्याच्यावर स्पोर्ट्स हर्नियाची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. देविशा शेट्टीने देखील सूर्याचा हॉस्पिटमधील फोटो शेअर करत तो ठिक असल्याची माहिति दिली आहे.सूर्याने कॅप्शनमध्ये लिहिलंय, ''लाईफ अपडेट: ओटीपोटाच्या उजव्या भागाच्या येथील स्पोर्ट्स हर्नियाची शस्त्रक्रिया करण्यात झाली. या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर मी आता रिकव्हरीच्या मार्गावर आहे. मैदानावर परण्यासाठी उत्सुक आहे.''सूर्यकुमार यादवच्या दुखापतीवर यापूर्वीही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. याआधीही त्याच्या दुखापतींवर यशस्वी शस्त्रक्रिया झाली आहे आणि प्रत्येक वेळी तो त्याच ताकदीने मैदानात परतला आहे. सूर्यकुमार यादव हा भारताच्या टी-२० संघाचा एक महत्त्वाचा भाग आहे. पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने त्याने लवकर पुनरागमन करणं ही संघासाठी महत्त्वाची गोष्ट असेल. शस्त्रक्रियेपूर्वी, सूर्या शेवटचा आयपीएल २०२५ आणि मुंबई टी लीगमध्ये खेळला होता.

## कायरन पोलार्डचा वर्ल्ड रेकॉर्ड

**नवी दिल्ली: दि. २६** प्रतिनिधी

वेस्ट इंडिजचा माजी खेळाडू कायरन पोलार्ड आपल्या विस्फोटक फटकेबाजीसाठी ओळखला जातो. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर कायरन पोलार्ड जगभरातील विविध लीगमध्ये खेळताना दिसत आहे. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून अनेक कमालीचे सामने खेळल्यानंतर आता तो संघाच्या सपोर्ट स्टाफचा भाग आहे. सध्या तो मेजर क्रिकेट लीगमध्ये खेळत असून त्याने एक वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे.

२३ जूनला सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्स विरुद्धच्या मेजर लीग क्रिकेट सामन्यात एमआय न्यू यॉर्ककडून मैदानात उतरताना कायरन पोलार्डने इतिहास रचला. त्याने टी-२० क्रिकेटच्या इतिहासात आपले नाव पहिल्या स्थानी नोंदवलं आहे. टी-२० क्रिकेटमध्ये अनेक विक्रम आपल्या नावे केलेला पोलार्ड अमेरिकेतील टी-२० लीगमध्ये निकोलस पूरनच्या नेतृत्वाखाली खेळत आहेएमआय न्यू यॉर्क ही मुंबई इंडियन्स (एमआय) ची या स्पर्धेतील फ्रँचायझी आहे, जी २००८ मध्ये आयपीएलच्या सुरूवातीपासन आयपीएलचा भाग आहे. पोलार्ड २०१० ते २०२२ पर्यंत एमआयकडून खेळला. आयपीएल २०२३ पूर्वी त्याने इंडियन प्रीमियर लीगमधून निवृत्ती घेतली.पोलार्डने एमआय न्यू यॉर्ककडून खेळताना एक विश्वविक्रम रचला आणि ७०० टी-२० खेळणारा तो जगातील पहिला खेळाडू ठरला आहे. टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक सामने खेळलेला पोलार्ड ७०० सामन्यांच्या टप्प्यापासून फक्त एक सामना मागे होता. या स्टार अष्टपैलू खेळाडूच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये १३६६८ धावा आणि ३२८ विकेट आहेत.पोलार्डनंतर सर्वाधिक टी-२० सामने खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ड्वेन ब्राव्हो आहे. ज्याने ५८२ टी-२० सामने खेळले आहेत. शोएब मलिक तिसऱ्या स्थानावर आहे. त्याच्या नावे ५५७ टी-२० सामने आहेत. आंद्रे रसेल ५५६ आणि सुनील नरेन ५५१ सामन्यांसह अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या स्थानावर आहेत.वेस्ट इंडिजकडून खेळताना कायरन पोलार्डने १०१ टी-२० सामने खेळले. यादरम्यान १५६९ धावा आणि ४२ विकेट्स घेतले होते. वेस्ट इंडिजचे नेतृत्त्व करणाऱ्या पोलार्डने २०२२ मध्ये निवृत्ती जाहीर केली. टी-२० व्यतिरिक्त त्याने १२३ एकदिवसीय सामने देखील खेळले. पोलार्डने २००७ ते २०१५ दरम्यान फक्त २७ प्रथम श्रेणी सामने खेळले.



## भारताविरूद्ध दुसऱ्या कसोटीसाठी इंग्लंड संघाची घोषणा



**नवी दिल्ली: दि. २६** प्रतिनिधी

भारत विरूद्ध इंग्लंड यांच्यातील ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत इंग्लिश संघ आघाडीवर आहे. इंग्लंडने पहिल्या कसोटीत भारताचा पराभव केला. यानंतर आता संघ दुसऱ्या कसोटीसाठी सज्ज झाला आहे. दुसऱ्या कसोटीसाठी इंग्लंडने आपल्या संघाची घोषणा केली आहे. यादरम्यान संघाचा वेगवान गोलंदाज ४ वर्षांनी कसोटी संघात परतला आहे.

## रिंकू सिंहला मिळणार सरकारी नोकरी, युपी सरकारकडून मिळाले मोटे गिफ्ट

**नवी दिल्ली: दि. २६** प्रतिनिधी

भारताचा टी-२० मधील विस्फोटक फलंदाज रिंकू सिंहचा नुकताच साखरपुडा पार पडला. समाजवादी पक्षाची खासदार प्रिया सरोज आणि रिंकू लवकरच लग्नबंधनात अडकणार आहेत. यादरम्यान रिंकू सिंहसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे.

रिंकूला यूपी सरकारकडून मोठी भेट मिळाली आहे. रिंकू आता यूपी सरकारमध्ये अधिकारी म्हणून त्याची नवीन इनिंग सुरू करणार आहे. रिंकू सिंगला क्रीडा कोट्यातून थेट सरकारी अधिकारी बनवले जात आहे. क्रीडा जगतात त्याच्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल, त्याला थेट भरती नियम २०२२ अंतर्गत मूलभूत शिक्षण अधिकारी पदावर नियुक्त करण्यात येणार आहे. या संदर्भात मूलभूत शिक्षण संचालकांनी एक पत्रही जारी केले आहे.राज्य सरकारच्या धोरणानुसार रिंकू सिंहला शिक्षण संचालक म्हणून नियुक्ती देण्यात येत आहे, ज्या अंतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उंचावणाऱ्या खेळाडूंना सरकारी सेवांमध्ये सन्माननीय स्थान दिले जाते. रिंकूला त्याचे सर्व आवश्यक कागदपत्रे शक्य तितक्या लवकर संबंधित पोर्टलवर अपलोड करण्यास सांगण्यात आले



आहे. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर, त्याला तात्पुरती नियुक्ती दिली जाईल.अलिकडेच, भारतीय क्रिकेटपटूने समाजवादी पक्षाच्या खासदार प्रिया सरोजशी साखरपुडा केलं आहे. यादरम्यान देशातील अनेक प्रसिद्ध व्यक्ती या समारंभात सहभागी झाल्या होत्या. १८ नोव्हेंबर रोजी ते एकमेकांशी लग्न करतील अशी चर्चा होती, पण आता त्यांच्या लग्नाची तारीख बदलली आहे.रिंकू सिंहच्या क्रिकेट कारकिर्दीत त्याने आतापर्यंत भारताकडून दोन एकदिवसीय आणि ३३ टी-२० सामने खेळले आहेत. दरम्यान, त्याने दोन एकदिवसीय डावांमध्ये २७.५ च्या सरासरीने ५५ धावा आणि २४ टी-२० डावांमध्ये ४२ च्या सरासरीने ५४६ धावा केल्या आहेत.

## 'जिओ'ची सुरुवात हे आयुष्यातील सर्वात मोठे धाडस – अंबानी



**नवी दिल्ली :** रिलायन्स जिओच्या माध्यमातून २०१६ मध्ये दूरसंचार उद्योगात पुन्हा परतणे, ही आयुष्यातील सर्वात मोठी जोखीम आणि धाडस होते, असे मत रिलायन्स इंडस्ट्रीजचे संस्थापक मुकेश अंबानी यांनी एका मुलाखतीत बुधवारी व्यक्त केले.रिलायन्स इंडस्ट्रीजने ४जी मोबाइल नेटवर्क स्थापण्यासाठी स्वतःचे अब्जावधी डॉलर गुंतविले. मात्र हे पाऊल आर्थिकदृष्ट्या यशस्वी होणार नाही, कारण भारत सध्या डिजिटल तंत्रज्ञानासाठी तयार नाही, असे त्यावेळी काही विश्लेषकांना वाटत होते. बाजारपेठ तयार नसताना त्यावेळी अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानातील केलेली ही गुंतवणूक फळली नाही, तरी रिलायन्सने परोपकार भावनेने केलेले ते दानकर्म होते असे मानूया.भारताच्या डिजिटलीकरणाच्या घडणीत आणि या बदलाची पायाभरणी करण्यात आपली भूमिका राहिली हे कायम लक्षात ठेवले जाईल, अशी आपण त्यासमयी संचालक मंडळापुढे भूमिका मांडल्याचे अंबानी यांनी सांगितले.वर्ष २०१६ मध्ये दूरसंचार सेवा सुरू केल्यापासून, जिओने मोफत व्हॉइस कॉल आणि अत्यंत कमी किमतीत डेटा (इंटरनेट) सेवा प्रस्तुत करून भारतीय दूरसंचार क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे, ज्यामुळे स्पर्धकांना किंमती कमी करण्यास भाग पाडले गेले आहे आणि देशभरात डिजिटल वापराचा वेग वाढला. जिओच्या आगमनापूर्वी, भारतात मोबाइल इंटरनेट तुलनेने महाग होते आणि मोठी लोकसंख्या या सेवांपासून वंचित होती, असे अंबानी यांनी अधोरेखित केले.आम्ही नेहमीच मोठे धोके स्वीकारले आहेत. जिओ ही आतापर्यंत घेतलेली सर्वात मोठी जोखीम होती.

# भारत मुळीच 'टेरिफ किंग' नाही- अर्थमंत्री

**नवी दिल्ली: दि. २६** प्रतिनिधी

भारताचे आयात शुल्क सर्वसाधारण प्रमाणापेक्षा जास्त आहे. भारत या शुल्काच्या माध्यमातून अयोग्य व्यापार पद्धत अवलंबित असा अपप्रचार अमेरिकेत केला जात आहे. मात्र वस्तुस्थिती यापेक्षा उलटी आहे. भारताचे आयात शुल्क माफक आहे. भारत संतुलित पद्धतीने व्यापार करण्यासाठी प्रयत्न करीत आहे, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केले आहे.

सितारामन यांनी असेही सांगितले की, इतर देशाप्रमाणे भारतामध्ये आयात निर्यात शुल्क अचानक कमी- जास्त केले जात नाही. तर भारतात अशा शुल्का संदर्भातील निर्णय वर्षातून एकदा अर्थसंकल्पात घेतला जातो. संसदेने परवानगी दिल्यानंतरच या शुल्काची अंमलबजावणी केली जाते. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात आयात शुल्काचे टप्पे कमी करून केवळ आठ इतके करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात लावले जात असलेले आयात शुल्क कितीतरी कमी आहे. अमेरिकेमध्ये संसदेची परवानगी न घेता आयात शुल्क ठरविले जाते.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वेळोवेळी



भारत आयात शुल्क जास्त लावत असल्याचा आरोप करून भारताला त्यांनी असे अनेक वेळा 'टेरिफ किंग' संबोधले आहे. मात्र सितारामन यांनी ट्रम्प यांच्या वक्तव्याचा थेट उल्लेख केला नाही. भारतात मॅन्युफॅक्चरिंग वाढावे यासाठी केंद्र सरकार आवश्यक उपाययोजना जागतिक नियमाप्रमाणे करत आहे. त्यानुसार २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात आयात शुल्काचे टप्पे कमी करून आठ इतके करण्यात आले आहेत. त्यामुळे भारताचा सर्वसाधारण आयात शुल्काचा दर केवळ १०.६६% इतका आहे. दक्षिण आशियातील इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत तो समान पातळीवर असल्याचे सितारामन म्हणाल्या.

इंडिया एक्झिम बँकेने आयोजित केलेल्या व्यापार मेळयाचे उद्घाटन करताना सितारामन म्हणाल्या की, २०२३-२४ चा अर्थसंकल्पात आयात शुल्काचे सात टप्पे कमी करण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा फेब्रुवारीमध्ये सादर करण्याला आलेल्या अर्थसंकल्पात आणखी सात टप्पे कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे आता शून्य टप्प्यासह भारतामध्ये आयात शुल्काचे केवळ आठ टप्पे शिल्लक राहिले आहेत. या सुधारणा भारताने संतुलित पद्धतीने केल्या आहेत.

क्के दराने मार्गक्रमण केले आहे.

## यूपीआय युजर्ससाठी आनंदाची बातमी; ट्रान्झॅक्शन फेल झाले तरी मिळणार रिफंड

**नवी दिल्ली: दि. २६** प्रतिनिधी

देशातील कोट्यावधी यूपीआय युजर्ससाठी एक दिलासाजनक बातमी आहे. जर तुमचे यूपीआय ट्रान्झॅक्शन फेल झाले किंवा पैसे चुकूनही चुकीच्या यूपीआय आयडीवर ट्रान्सफर झाले तर तुम्हाला जास्त वेळ वाट पाहावी लागणार नाही. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन द्वारे १५ जुलै २०२५ पासून एक नवीन नियम करण्यात येणार आहे. या नव्या नियमानुसार, जर एखाद्या यूपीआय अकाउंटमधून पैसे कापले गेले, पण पेमेंट झाले नाही तर युजरला तात्काळ रिफंड मिळेल.नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन () च्या नव्या नियमानुसार, जर यूपीआय ट्रान्झॅक्शनदरम्यान तुमच्या अकाउंटमधून



पैसे कापले गेले परंतु पेमेंट झाले नाही, तर ते पैसे ताबडतोब तुमच्या अकाउंटमध्ये परत केले जातील. तसेच जर तुम्ही चुकून चुकीच्या यूपीआय नंबरवर पैसे पाठवले असतील, तर आता तुम्ही तुमच्या बँकेकडून पैसै परत मागू शकता. बँका आता एनपीसीआयच्या पूर्व परवानगीशिवाय काही डिक्लाईन चार्जबॅक प्रकरणे स्वतःहून निकाली काढू शकतील.नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन () च्या नव्या नियमानुसार, जर यूपीआय ट्रान्झॅक्शनदरम्यान तुमच्या अकाउंटमधून पैसे कापले गेले परंतु पेमेंट झाले नाही, तर ते पैसे ताबडतोब तुमच्या अकाउंटमध्ये परत केले जातील. तसेच जर तुम्ही चुकून चुकीच्या यूपीआय नंबरवर पैसे पाठवले असतील, तर आता तुम्ही तुमच्या बँकेकडून पैसै परत मागू शकता. बँका आता एनपीसीआयच्या पूर्व परवानगीशिवाय काही डिक्लाईन चार्जबॅक प्रकरणे स्वतःहून निकाली काढू शकतील. सध्याच्या प्रणालीनुसार, जर एखाद्या बँकेने चार्जबॅक विनंती नाकारली, तर प्रणाली आपोआप पुढील प्रक्रिया थांबवते. यासाठी बँकेला केस ''व्हाइटलिस्ट'' करण्यासाठी ला मॅन्युअली याचिका करावी लागते. ही प्रक्रिया खूप संथ आणि गुंतागुंतीची होती, ज्यामुळे ग्राहकांना पैसे रिफंड मिळण्यासाठी बराच वेळ वाट पहावी लागत होती. पण, आता या नवीन चार्जबॅक प्रणालीमुळे ही प्रक्रिया खूपच जलद आणि सोपी होईल.

## अदानी - अंबानी इंधन विक्रीसाठी एकत्र

**नवी दिल्ली: दि. २६** प्रतिनिधी

रिलायन्स इंडस्ट्रीजचे प्रमुख मुकेश अंबानी आणि अदानी उद्योग समूहाचे प्रमुख गौतम अदानी इंधनपुरवठा क्षेत्रात सहकार्य करणार आहेत.

प्राप्त माहितीनुसार अंबानी यांच्या जिओ बीपी या पेट्रोल आणि डिझेल पंपावरून अदानी यांच्या सीएनजी गॅसचे वितरण केले जाणार आहेत. तर अदानी यांच्या सीएनजी गॅस केंद्रावरून जिओ बीपीच्या पेट्रोल आणि डिझेलचे वितरण केले जाणार आहे.

जिओ बीपीकडे देशभरात १,९७२ पेट्रोल पंप आहेत. तर अदानीी यांची ६५० सीएनजी स्टेशन आहेत. या नेटवर्कचा दोन्ही कंपन्यांना लाभ व्हावा म्हणून हे सहकार्य करण्यात येत आहे. दरम्यान जीओ सुरु करण्याच्या निर्णयाला मुकेश अंबानी यांनी त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी जाखीम म्हटले आहे. एका मुलाखतीत, मुकेश अंबानींनी सांगितले की, जेव्हा रिलायन्स इंडस्ट्रीजने ४ जी मोबाईल नेटवर्क लाँच करण्यासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली, तेव्हा अनेक तज्ञांनी हे आर्थिक अपयश ठरू शकते, अशी भीती व्यक्त केली होती. त्यांच्या मते, भारत इतक्या प्रगत डिजिटल तंत्रज्ञानासाठी तयार नव्हता.

पैसे बिमारी ठीक होने के बाद
उम्र की अधिकता और
बीपी शुगर से आई कमजोरी,
टायमिंग में कमी,
शुक्राणु की कमी,
निःसंतान, आदी सभी
रोगों का विशेष
आयुर्वेदिक पद्धती से इलाज. मनचाहा पॉवर
सफलता से प्राप्त करने हेतु संपर्क करें



धन्वंतरी आयुर्वेदिक
भारती कॉम्प्लेक्स नं.२ उद्योग भवन समोर,
दारव्हा रोड, यवतमाळ
8767418343

# डिझेल बसेस मोडीत निघणार

## दोन वर्षांत ८५० ई-बसेस येणार सेवेत, परिवहन विभागाच्या खर्चात कपात होणार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर , दि. २६ : शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी शहर बस सेवेील डिझेल बसेसच्या ऐवजी आता ई-बसेस रस्त्यावर धावणार आहेत. डिसेंबर अखेरपर्यंत सध्या डिझेलवर चालणाऱ्या बसेस सेवेतून काढून टाकण्यात येणार आहेत. येत्या दोन वर्षांत नागपूर महानगरपालिकेच्या ताफ्यात एकूण ८५० ई-बसेस रुजू होणार असून, शहरातील प्रदूषणात घट होणार आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्च २०२३ रोजी शहरासाठी ई-बसेसच्या देण्याची घोषणा केली होती. सार्वजनिक वाहतुकीसाठी असलेल्या डिझेलच्या बसेस काढून पर्यावरणपूरक व वातानुकुलित बसेस देण्याची योजना आखण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या पाठपुरावामुळे राज्य सरकारकडून १३७ कोटी रुपयांचा निधी नागपूर महानगरपालिकेला मंजूर झाला आहे. २००९ मध्ये जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान अभियानअंतर्गत (जेएनएनयूआरएम) २४० डिझेल बसेस मिळाल्या होत्या. त्यांच्या खरेदीला १५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे या बसेसचे निर्लेखन करण्यास सुरुवात झाली आहे.सध्या डिझेलवरील ७६ बसेस सेवेत आहेत. या बसेसचे येत्या डिसेंबर महिन्यापर्यंत निर्लेखन केले जाईल, अशी माहिती परिवहन व्यवस्थापक विनोद जाधव यांनी दिली. ई-बसेस सेवेत आल्यानंतर परिवहन विभागाच्या खर्चात कपात होणार आहे. बस चालविण्यासाठी येत असलेली तूट ४० टक्क्यांपर्यंत कमी होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

**नवे मार्ग...**

**ई-बसेसची संख्या वाढत असल्याने शहरात शहर बस वाहतुकीसाठी नवे मार्ग निश्चित केले जाणार आहे. तसेच सध्याच्या मार्गावर आवश्यकता असेल तेथे बसची अधिक वेळा सेवा पुरविण्यात येणार आहे. सध्या नागपुरात दररोज १ लाख ४० नागरिक बसने प्रवास करतात. यात वाढ करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे जाधव यांनी सांगितले.**

### वाठोडा,खापरी येथे डेपो

राज्य शासनाकडून प्राप्त निधीतून पहिल्या टप्प्यात नागपूर महानगरपालिकेला ३० ई-बसेस प्राप्त झाल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण पार पडले. या बसेसचे नवे मार्ग निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया येत्या काही दिवसात पूर्ण झाल्यानंतर येत्या १ जुलैपासून प्रवाशांच्या सेवेत रुजू होणार आहेत. सध्या ४४५ बसेस सेवेत आहेत. यात ई-बसेसची संख्या २१४ आहे. या बसेससाठी वाठोडा व खापरी येथे आगर (डेपो) बांधले जाणार आहे. या योजनेअंतर्गत उर्वरित ई-बसेस विविध टप्प्यांमध्ये दाखल होणार आहे. यात ९ मीटर लांबीच्या २३० ई-बसेस, १२ मीटर लांबीच्या २५० ई-बसेस मिळणार आहे. प्रवाशांसाठी नागपूर महानगरपालिकेच्या ताफ्यात पुढील दोन वर्षांत जवळपास ८५० ई-बसेस उपलब्ध होणार आहेत. या बससेच्या चार्जिंगसाठी लकडगंज भागात 'मातृशक्ती ई-डेपो' उभारण्यात येणार आहे. पीएम श्री योजनामधून सुद्धा १५० बसेस नागपूरसाठी प्राप्त होणार आहे.

### विमानतळावरून बससेवा

विमानतळावर जाणाऱ्या किंवा विमानाने येणाऱ्या प्रवाशांना शहरात आणण्यासाठी ई-बस सेवा सुरू करण्यात येईल, असे परिवहन व्यवस्थापक विनोद जाधव यांनी सांगितले. विमानांची ये-जा करण्याच्या वेळा लक्षात घेऊन ई-बसेसची व्यवस्था प्रवाशांसाठी केली आहे. यासाठी मार्ग निश्चित केला जात आहे.



## राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन

**नागपूर , दि. २६ :** आरक्षणाचे जनक, सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते थोर समाजसुधारक, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आयोजित कार्यक्रमात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपाच्या उपायुक्त विजया बनकर,साप्रविचे अधीक्षक राजकुमार मेश्राम, कार्यकारी अभियंता कमलेश चव्हाण, जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे, नरेंद्र रामटेके शैलेश जांभूळकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात

### कन्टेनरने दिली धडक, एक ठार

**सावनेर :** कन्टेनरने दुचाकीला धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला ही दुर्घटना मंगळवारी सायंकाळी सहा वाजता मौजा धापेवाडा येथे घडली.
फिर्यादी दिलीप रामरावजी भगत आणि ज्ञानेश्वर गंगाधर पाणपते हे दोघे धापेवाडा बाजारात खरेदीसाठी दुचाकीने जात होते. त्याचवेळी सावनेरकडून कळमेश्वरकडे येणाऱ्या एचआर-५५/ एएफ ६७७० क्रमांकाच्या कंटेनर ट्रक चालकाने दुचाकीला मागून धडक दिली. यावेळी दोघेही रस्त्याच्या बाजूला पडले. अपघातात ज्ञानेश्वर गंगाधर पाणपते यांच्या डोक्याला गंभीर जखमा झाल्याने मेडिकल कॉलेज नागपूर येथे दाखल वैद्यकीय अधिकाऱ्यांना तपासून त्यांना मृत घोषित केले. आरोपी चालक आरोपी जितूराम सुंदरलाल याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१) सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

### दारू विक्रेत्यांवर कारवाई

**नागपूर:** नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यांतर्गत जलालखेडा, नरखेड, देवलापार, पारशिवनी, कळमेश्वर, सावनेर आणि खापरखेडा पोलिसांनी अवैध दारू बाळगून विक्री करणाऱ्यांवर धाडी टाकल्या.
जलालखेडा पोलिसांनी सुधीर मोतीरामजी फाटे याच्यावर कारवाई केली
नरखेड पोलिसांनी राजकुमार रामदास तायडे, बेला पोलिसांनी विलास शंकर जोगे याच्याविरुद्ध तर देवलापार पोलिसांनी मुलचंद तुमडाम आणि भय्यालाल चौकलाल गोंडगे याच्यावर कारवाई केली.
याशिवाय पारशिवनी पोलिसांनी किसना बळवंता मेश्राम आणि प्रज्ञाशील मंगेश मेश्रामवर दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाई केली कळमेश्वर येथे रणजीत अजय राजपूत तसेच खापरखेडा पोलिसांनी शैलेंद्र दौलत खडसे याच्यावर कारवाई केली सावनेर पोलिसांनी दोन महिला आरोपींवर दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्ह्यांची नोंद केली. यात देशी दारू, मोहफुलाची दारू, मोहफूल सडवा आणि विदेशी दारू असा एकूण १९,५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचे समुपदेशन

**बुटीबोरी :** सनराईज हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज येथे एमआयडीसी बुटीबोरी पोलिसांनी नशामुक्त भारत अभियानांतर्गत कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले. हा उपक्रम मंगळवारी राबविण्यात आला. प्रभारी अधिकारी पोलिस ठाणे एमआयडीसी बुटीबोरी पोलिस निरीक्षक सतीशसिंग राजपूत यांनी विद्यार्थ्यांना जागतिक अंमली पदार्थविरोधी दिनानिमित्त जनजागृतीपर मार्गदर्शन केले. शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनाच्या आहारी जाऊ नये, असे आवाहन केले.

# पाचपावली अग्निशमन केंद्र नव्याने!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी







**नागपूर , दि. २६ :** नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाच्यावतीने पाचपावली येथे नवनिर्मित व अत्याधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण अग्निशमन केंद्र नागरिकांच्या सेवेत सज्ज झाले आहे. यामुळे उत्तर नागपुरातील अग्निशमन सेवाला आणखी बळ मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते रविवारी केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. पाचपावली अग्निशमन केंद्र तयार झाल्याने बुध्दनगर, बारसेनगर, लष्करीबाग, वैशालीनगर, बाळाभाऊ पेठ, नवा नकाशा, ठक्करग्राम, कांजी हाऊस, यादवनगर, टेका नाका, टिमकी, मेंहदी बाग कॉलोनी, किदवाई ग्राउंड, बांग्लादेश नाईक तलाव, कडबी चौक, मेकोसाबाग, मोमीनपुरा, धोबीनगर परिसराला अग्निशमन सेवेचा लाभ मिळणार आहे.मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते यांच्या नेतृत्वात मनपा निधीतून पाचपावली अग्निशमन केंद्र तयार केले आहे. २०११ पाचपावली येथील इमारत मोडकळीस आली होती. त्यामुळे केंद्र सुगतनगर येथे हलविण्यात आले होते. उत्तर नागपुरातील विविध भागात सुगतनगर केंद्रातूनसेवा पुरविली जात होती. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मनपाला नवीन अग्निशमन केंद्राची गरज वाटू लागली. त्यानुसार पाचपावलीत अग्निशमन केंद्र तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र आणि वसाहतीचे भूमिपूजन ५ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले होते. अग्निशमन केंद्रात एकाच ठिकाणी दोन फायर टेंडर आणि दोन मिनी वॉटर टेंडर गाड्या उभ्या राहू शकतात लोकार्पण होताच सुविधा देण्यास सुरुवात झाल्याची माहिती पाचपावली अग्निशमन केंद्र अधिकारी सुनील डोकरे यांनी दिली. नवीन इमारत तळमजला+५ मजली असून, दोन विंग तयार केल्या आहेत. दोन्ही इमारतीत टूबीएचके अशी सुविधा उपलब्ध आहे.

## वेश्याव्यवसाय प्रतिबंधक कारवाई

**नागपूर , दि. २६ :** नागपूर शहरातील 'आर्यन स्पा' येथे सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी छापा टाकून दोघांना अटक केली असून, दोन पीडित मुलींची सुटका केली आहे. बुधवारी त्रिमूर्तीनगर चौकातील मुस्कान वर्षा अपार्टमेंटमध्ये ही कारवाई करण्यात आली. तौसीफ करीम शेख आणि पार्वती उर्फ पिंकी थापा यांना याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. आरोपी आर्थिक फायद्यासाठी पीडित मुलींकडून देह व्यवसाय करवून घेत होते. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गजानन गुल्हाणे यांच्या पथकाने ही कारवाई केली. आरोपींकडून ३७,५९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# राजर्षी शाहू महाराजांना महावितरणचे अभिवादन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर , दि. २६ :** सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून देणारे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त महावितरणच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. राजर्षी शाहू महाराज यांसनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित, अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम करताना जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देण्यास प्राधान्य दिले. महावितरणच्या काटोल मार्गवरील विद्युत भवन येथे आयोजित कार्यक्रमात महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण केले. महानिर्मितीचे उपमुख्य अभियंता अंकुर जोशी, अधीक्षक अभियंता किशोर सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता सतीश भामसे, महावितरणचे अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता विजय तिवारी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रवीण काटोले, उपमुख्य जनसंपर्क धिकारी योगेश विटणकर यांच्यासह महावितरण व महानिर्मितीचे अधिकारी व कर्मचारी यांनीही शाहू महाराजांना अभिवादन केले.

## CAPTION दमदार पावसात कोसळली झाडे...



**नागपूर : यंदा मृग नक्षत्र सुरू झाल्यापासून पहिल्यांदाचबुधवारी सायंकाळी आणि रात्रीच्या सुमारास नागपुरात दमदार पाऊस कोसळला शहराच्या विविध भागात झाडे कोसळली यात काही वाहनांचेही नुकसान झाले नंदनवन, माऊंट रोड सदर,स्किन वार्ड, मंगलमुर्ती चौक रिंग रोड अशा ठिकाणी झाडे रस्त्यांवर तुटून पडली संबंधित अग्निशमन केंद्रांच्या कर्मचाऱ्यांनी अगदी पहाटेच्या सुमारास ही झाडे कापून रस्ता मोकळा केला...**

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नागपूर , दि. २६ :** अखिल खेडुला कुणबी समाजातर्फे नागपूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समाजातील पहिले आयएएस अधिकारी ठरलेले रजत पत्रे यांचा विशेष गौरव करण्यात आला.

दहावी, बारावी आणि स्पर्धा परीक्षांतील गुणवंतांना यावेळी सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाला प्रभाकर पिलारे, ॲड. अनिल ठाकरे, अभिविलास नखाते, विवेक तोंडरे, आयएएस रजत पत्रे, अनंत भारसाकळे, बाळाभाऊ शिंगणे उपस्थित होते. अभिविलास नखाते, विवेक तोंडरे आणि रजत पत्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन नंदकिशोर अलोणे यांनी केले तर आभार मुरलीधर भर्रे यांनी मानले.

# कुटुंब कल्याण केंद्रात स्तन कर्करोग तपासणी शिबीर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी





**नागपूर , दि. २६ :** सीआरपीएफ नागपूर येथील कुटुंब कल्याण केंद्रात मौखिक आणि स्तन कर्करोग तपासणी आणि जनजागृतीसाठी विशेष वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. क्षेत्रीय कावा (आरसीडब्ल्यूए) अध्यक्ष पूनम गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले. शिबिरामध्ये शहीद शालिग्राम जगताप (४५ बटालियन, पीपीएमजी सन्मानित) यांच्या कन्या डॉ. वैष्णवी शालिग्राम जगताप, रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट डॉ. अभिनव पुप्पलवार यांनी सहकाऱ्यांसह तपासणीत सहभाग घेतला. डॉ. वैष्णवी आणि डॉ. अभिनव यांनी जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना मौखिक आणि स्तनाच्या कर्करोगाची प्रारंभिक लक्षणे, जोखीम घटक, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि उपलब्ध उपचार पर्यायांबद्दल सविस्तर माहिती दिली. शिबिरात एकूण ४५ जवान आणि त्यांच्या कुटुंबियांची मोफत तपासणी करण्यात आली. उपस्थित सर्व लाभार्थ्यांना प्रारंभिक तपासणीच्या आधारावर आवश्यक सल्ला देण्यात आला. सदर शिबीर केवळ आरोग्य तपासणीचे माध्यमच ठरले नाही, तर कर्करोगासारख्या गंभीर आजाराविषयी समाजात जागरूकता पसरवण्याच्या दिशेने एक कौतुकास्पद पाऊलही ठरले.

# महिला सबलीकरणाचे वाहताहेत वारे

## गडचिरोलीत महिला सबलीकरणाला गती; कोनसरीच्या १९ महिला घेणार वाहन चालकाचे प्रशिक्षण

**नागपूर , दि. २६ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्यापासून जिल्ह्यात महिला सबलीकरणाचे वारे वाहू लागले आहे. एलएमईएल अर्थात लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या वतीने कोनसरी गावातील महिलांना हलके वाहन चालवण्याच्यादृष्टीने प्रशिक्षण देण्यात येत आहे.**





एलएमईएलने कोनसरी गावातील १९ महिलांना मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील अशोक लेलँडच्या वतीने हलके मोटार वाहन (एलएमव्ही) चालक म्हणून ४५ दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

कोनसरीचे सरपंच श्रीकांत पावडे आणि एलएमईएल तसेच एलआयसीएलचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निवासी प्रशिक्षणासाठी छिंदवाडा येथे जाणाऱ्या बस वाहनाला हिरवी झेंडी दाखवली. सरपंच पावडे यांनी गावातील महिलांसाठी कौशल्य विकासाचा एक नवीन मार्ग उघडल्याबद्दल लॉयड्स मेटल्सचे आभार मानले. महिलांना त्यांच्या सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण संधीचा फायदा घेण्याचे आवाहन केले.

**गडचिरोली आणि मुख्यमंत्री**

**पालकमंत्री असल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांचे गडचिरोली जिल्ह्यावर विशेष लक्ष असते. गडचिरोली लवकरच राज्यातील शेवटचा नाही, तर पहिला जिल्हा बनेल, असा आशावाद अनेकदा व्यक्त करत त्यांनी मार्च २०२६ पर्यंत गडचिरोलीला पूर्णत: नक्षलवादमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. याशिवाय त्यांचा गडचिरोली दौरा हा नेहमीच विकासाला चालना देण्यासाठी आणि नक्षलवादाविरोधी लढा अधिक तीव्र करण्यासाठी महत्त्वाचा असतो.**

एलएमईएल मानव संसाधन अधिकारी म्हणाले, की लॉयड्स मेटल्स स्थानिक समुदायांच्या कौशल्य विकासावर आणि महिलांना सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांनी स्थानिक सर्वांगीण विकासासाठी स्थानिक समुदायांना विकास प्रक्रियेत समाविष्ट करून घेत अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. तत्पूर्वी सरपंच पावडे आणि एलएमईएल, एलआयसीएल कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते कोनसरी येथील लॉयड्स कौशल्य विकास आणि प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थी महिलांचा सत्कार करण्यात आला.

# महाराष्ट्र नाट्य परिषदेचे बालनाट्य, नृत्य शिबीर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर , दि. २६ :** महाराष्ट्र नाट्य परिषदेतर्फे आयोजित बालनाट्य अभिनय आणि नृत्य प्रशिक्षण शिबिराचा नुकताच समारोप झाला. ५ ते २० जून दरम्यान झालेल्या या शिबिरातील मुला-मुलींनी समारोप कार्यक्रमात विविध कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गुरुदेव सेवा मंडळ येथे झालेल्या या शिबिरात ९० मुला-मुलींनी सहभाग घेतला. समारोप कार्यक्रमात मुलांनी 'आशेचा अंत', 'विठ्ठल' यांसारखी नाटके, तसेच लावणी, पोवाडा, गरबा सादर करून मोठी दाद मिळवली. 'नाटक ही अविष्काराची कला असून, त्यातून व्यक्तिमत्व विकास होतो', असे मत अभिनेते संजय भाकरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला नाट्यकर्मी डॉक्टर नीलकंठ कुलसुंग, अशोक येवले, कुणाल गडेकर, अशोक ठाकरे उपस्थित होते. परिषदेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र टेकाडे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. आयोजिका डॉक्टर संगीता टेकाडे यांच्यासह अनेकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.




अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, शुक्रवार, दि. २७ जून २०२५




# अतिक्रमण काढण्यास महापालिकेची नकारघंटा

## कंत्राटदार नियुक्त करूनही कारवाया बंद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** शहराचे हृदयस्थान असलेले गांधी रोडवरील अतिक्रमण व शहराच्या विविध भागात झालेल्या अतिक्रमण हटाओ मोहिमेला महापालिका प्रशासनाची नकारघंटा कारणीभूत ठरत आहे. अतिक्रमणामुळे पायाभूत सुविधांवर ताण पडत असून, नागरिकांची गैरसोय होत असल्याची परिस्थिती आहे. ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास येऊनही काहीही केले जात नाही. यामुळे व्यवसाय बाधित होत असून, व्यापारी वर्ग मेटाकुटीस आला आहे.

अतिक्रमण शहराची मोठी समस्या झाली आहे. मुख्य रस्ते असो की चौक, अशी एकही जागा सुटलेली दिसत नाही जिथे अतिक्रमण नाही. शहराचे हृदयस्थान असलेल्या मुख्य बाजारात अतिक्रमणामुळे रस्ते अरुंद झाले असून, नागरिकांना चालणेही कठीण झाले आहे. नवीन कापड बाजार समोरील मार्गावर फळ विक्रेत्यांनी अक्षरशः गर्दी केली



असून, हातगाड्या थेट रस्त्यावर लावल्या आहेत. या मार्गावर रेडिमेड कापडाची मोठी दालने आहेत. त्यामुळे बाराही महिने येथे खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी असते. सकाळी ८ वाजेपासून फळ विक्रेते या मार्गावर दुतर्फा हातगाड्या लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करतात. महापालिका कार्यालयाच्या तीनशे मीटर अंतरावर हे अतिक्रमण असतानाही अधूनमधून थातूरमातूर कारवाई केली जाते. कायमस्वरूपी तोडगा मात्र काढला जात नाही. गांधी रोड, टिळक रोड, गांधी चौक ते ताजनापेठ पोलीस चौकी या मार्गावरही फळ विक्रेत्यांनी हातगाड्या लावून वाहतुकीस अडथळा निर्माण केला आहे. हा सर्व परिसर महापालिका कार्यालयाच्या एक ते दीड किमी परिसरात आहे. अतिक्रमण निर्मूलन करण्यासाठी महापालिकेने कंत्राटी कर्मचारी नियुक्त केले असून, या कर्मचाऱ्यांना विनाकाम वेतन अदा केले जात आहे.

हे कमी म्हणून की काय शहरातली मुख्य रस्ते व चौकसुद्धा अतिक्रमणाने वेढले गेले आहेत.

### दिखाऊ कारवाई

अतिक्रमण निर्मूलन पथकाने सुरुवातीला केवळ दिखाऊ कारवाई केली. यासाठी तत्कालीन आयुक्त कविता द्विवेदी यांनी कंत्राटदाराची नियुक्ती केली; मात्र काहीही साध्य झाले नाही. उलट अतिक्रमणाची समस्या भीषण झाली असून, महापालिका हात वर करून बसली आहे.

### ध्वनी प्रदूषण वाढले

न्यू क्लॉथ मार्केटसमोरील रस्त्यावर फळ विक्रेत्यांनी एक नवीन फंडा सुरू केला असून लाऊडस्पिकरवरून फळांचे भाव सांगण्याची स्पर्धा लावली आहे. ही घोषणाबाजी नॉन स्टॉप सुरू असते. शहरात प्रशासन अस्तित्वात आहे की नाही, अशी शंका येते. ध्वनी प्रदूषण करणारी लाऊड स्पिकरवरील ही घोषणाबाजी त्वरित बंद करण्याची मागणी होत आहे. पोलिसांच्या परवानगीशिवाय कोणालाही लाऊडस्पिकर वाजविता येत नाही, परवानगी विना हा प्रकार राजरोसपणे सुरू आहे.

# ३४ कोटींचा कर बुडविणाऱ्या कंपनीवर गुन्हा दाखल

## वस्तू व सेवा कर विभागाची मोहीम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** येथील ३४ कोटींपेक्षा अधिक वस्तू व सेवा कर (जीएसटी) बुडविणाऱ्या खासगी कंपनीविरोधात राज्य वस्तू व सेवा कर विभागाच्या तक्रारीवरून अकोला पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

बेग कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी ३४ कोटी ३५ लाख ७२ हजार ८२७ रु. रकमेची करचुकवेगिरी केल्याचे निदर्शनास आल्यावरून राज्यकर निरीक्षक प्रदीप आरव यांनी अकोला शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. ही कंपनी व संचालक इम्रान बेग, रशीद बेग यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कार्यवाहीसाठी अमरावती विभागाचे सहायक आयुक्त




संजय पोखरकर व अकोला कार्यालयाच्या उपायुक्त अर्चना चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. कर बुडविणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलली जातील. सर्व थकबाकीदार व्यापाऱ्यांनी त्वरित कर भरणा करावा, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा राज्यकर विभागाचे सहआयुक्त संजय पोखरकर यांनी दिला आहे.

# वृक्ष लागवड ‘फोटोसेशन’ पुरतेच

## महापालिकेची १० हजार रोपे कागदावरच

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ : पावसाचे पाणी रस्त्यावर तलावासारखे साचले, तरी महापालिकेच्या मनात हरित लागवडीचे बी अजूनही अंकुरलेले नाही. उष्णतेच्या झळा, धूळकणांचा मारा यामुळे शहर हिरव्या सावलीसाठी हंबरडा फोडत आहे; पण वृक्षलागवडीचे महापालिकेचे नियोजन अद्याप कागदोपत्रीच अडकून बसले आहे.**



> महापालिकेने मागील वर्षी ५,७५० रोपांची लागवड केली. त्यातील सुमारे ३,५०० रोपे जगली आहेत. सुमारे ६१ टक्के यश मिळाले. यंदा नागरिकांची मागणी लक्षात घेऊन १०,००० रोपे मागवली आहेत. यापैकी ५,००० तेलंगणातून आणि ५,००० सामाजिक वनीकरण विभागाकडून मिळणार आहेत. वृक्ष लागवड यशस्वी करण्यासाठी प्रत्येक वॉर्डात देखभाल समित्या स्थापन करणार आहोत. शहरातील उद्यानांपासून रस्त्यांपर्यंत रोपे लावू, पाण्याची व्यवस्था आणि संरक्षण जाळीची जबाबदारी स्थानिक रहिवासी संघटनांवर असेल. महापालिका सहकार्य करेल.
>
> **-अनिल बिडवे,**
> मनपा पर्यावरण अधिकारी

गेल्या वर्षी पाच हजारांहून अधिक रोपे लावली, असे ढोल वाजविण्यात आले. प्रत्यक्षात ५,७५० पैकी फक्त ३,५०० रोपे तग धरल्याचा (सुमारे ६१ टक्के यश) दावा पर्यावरण अधिकारी अनिल बिडवे करीत आहेत. कुठे लावली, कुणी पाणी दिले, किती जगले, याच्या अद्याप माहितीचा फलक तयार नाही. परिणामी, वृक्षारोपणाचा मोठा उपक्रम वर्षा ऋतू संपताच ‘फोटोसेशन’पुरताच ठरतो, असे आरोप पर्यावरणप्रेमींनी केले.यंदा ‘दहा हजार रोपे’ मागविल्याची घोषणा महापालिकेने केली आहे. त्यापैकी ५,००० रोपे तेलंगणातून, तर उर्वरित ५,००० सामाजिक वनीकरण विभागाकडून मिळणार असल्याची माहिती बिडवे यांनी दिली; मात्र आडमुठ्या नियोजनाविना एवढा जंगम ठेवा कुठे रोवणार, त्यांना पाणी कोण देणार, संरक्षण नेट कोण धरून ठेवणार याचे उत्तर प्रशासनाकडे नाही.शहरातील मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा, शाळा-कॉलेज कॅम्पस, उद्याने आणि सरकारी कार्यालयांच्या आवारात किमान पंधरा-वीस हजार झाडांची तातडीची गरज आहे, असा पर्यावरण तज्ज्ञांचा सूर आहे. रोपे लावून त्याची निगा राखल्या गेली तरच ती जगतात, असा सल्ला देत नागरिकांनी ‘झाड दत्तक’ उपक्रम राबवावा, अशी मागणी होत आहे; पण महापालिकेने संरक्षण जाळी आणि देखभाल समित्या स्थापन केल्या नाहीत, तर नवे रोपेही उन्हाच्या पहिल्याच झळीत कोमेजतील, असा इशारा वृक्षप्रेमींनी दिला.हरित क्षेत्र वाचविण्यासाठी महापालिकेने तत्काळ विभागनिहाय आराखडा तयार करून स्वयंसेवी संस्था, स्कूल-कॉलेज आणि निवासी संघटनांना भागीदार करणे गरजेचे आहे, अन्यथा ‘हरित अकोला २०३०’ हे स्वप्न हवेतच विरून जाईल.

# शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी पालकांच्या लुटीचे प्रकरण थेट शिक्षणमंत्र्यांकडे

## युवासेनेचे नेते राहुल कराळे यांनी रेटून धरला मुद्दा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अजिंक्य भारत इम्पॅक्ट

**अकोला, दि. २६ :** जिल्ह्यातील खासगी शाळा, कॉन्व्हेंटकडून पालकांना विशिष्ट दुकानदारांकडूनच गणवेश, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याचे प्रकरण युवासेनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य राहुल कराळे यांनी थेट राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे रेटून धरले. यासंदर्भात शिक्षणमंत्र्यांनी पालकांना अशा प्रकारची सक्ती करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याचे निर्देश सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना दिले असल्याची माहिती राहुल कराळे यांनी दिली.

वाढत्या महागाईच्या काळात जीवनावश्यक वस्तुंसह सर्वच गोष्टींची प्रचंड दरवाढ झाली आहे. या दरवाढीने सामान्य, गोरगरीब लोक आधीच मेटाकुटीस आले आहेत. अशा परिस्थितीत दरवर्षी होणारी शैक्षणिक साहित्याची दरवाढ आणि त्यातही विशिष्ट दुकानदारांकडून गणवेश, शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास खासगी शाळा, कॉन्व्हेंटकडून पालकांना भाग पाडल्या जात असल्याने पालकांची हजारो रुपयांची आर्थिक लुटीचे प्रकार सर्रास घडत असल्याचे वृत्त दैनिक अजिंक्य भारतने प्रकाशित केले होते. या प्रकरणात पालकांच्या आर्थिक लूट



संदर्भात युवासेनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा पश्चिम विदर्भ निरीक्षक राहुल कराळे शिक्षण उपसंचालकांनी पत्र दिले असता, त्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे आदेश जारी करून सुद्धा शिक्षणाधिकारी यांच्याकडून कुठलीच कारवाई करण्यात आली नाही. यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांना जाब विचारला असता माझ्याकडे कुठल्याच पालकांची तक्रार नाही, असे उडवा-उडवीचे उत्तरे देण्यात आल्याने युवासेनेचे नेते राहुल कराळे यांनी थेट मुंबई मंत्रालय गाठत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना खासगी शाळा, कॉन्व्हेंटकडून पालकांची सुरू असलेल्या आर्थिक लुटीसंदर्भात मुद्दा रेटून धरला. याला तातडीने निर्बंध लावण्याची मागणी केली.

त्यावर शिक्षणमंत्र्यांनी सर्व अधिकाऱ्यांनी शैक्षणिक साहित्य खरेदीसंदर्भात पालकांवर शाळांकडून होणारी सक्ती करणाऱ्या शाळांवर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले असल्याचे युवासेनेचे नेते राहुल कराळे यांनी सांगितले.

# दहा दिवसात प्रमाणपत्र सादर करा!

## सोमय्या यांनी घेतला मनपाच्या कार्यवाहीचा आढावा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** महापालिकेने नायब तहसीलदाराच्या आदेशाने वितरित केलेले जन्मदाखले रद्द केले आहेत. यापैकी ८२ दाखले परत घेतले असून, उर्वरित नागरिकांशी संपर्क साधण्याचे काम महापालिकेकडून सुरू आहे. यापुढे काय कार्यवाही करायची यासंदर्भात प्रशासनाला सूचना दिला असल्याचे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सांगितले. गुरुवारी किरीट सोमय्या यांनी महापालिकेत भेट देऊन आयुक्त यांच्या दालनात वरील कार्यवाहीचा आढावा घेतला. किरीट सोमय्या म्हणाले की, बनावट जन्म प्रमाणपत्रांच्या मदतीने मालेगावमधील अनेक नागरिकांनी पासपोर्ट बनवले आणि परदेशात गेले. अकोल्यातही असे प्रकार घडू शकतात, याची चौकशी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अकोला शहरात, नायब तहसीलदारांनी २२०० जन्म प्रमाणपत्र अर्ज दिले



होते, जे रद्द करण्यात आले आहेत. ते परत घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत ८२ नागरिकांकडून प्रमाणपत्रे परत घेण्यात आली आहेत. तर ११०९ जणांशी संपर्क साधण्यात आला आहे; परंतु अद्याप १ हजाराहून अधिक नागरिकांशी संपर्क न झाल्याने प्रमाणपत्रे परत घेण्याची प्रक्रिया लांबणीवर पडत आहे. त्यामुळे भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन पुढील १० दिवसांत प्रमाणपत्रे सादर करण्याची सूचना केली. यापूर्वी, महापालिकेच्या जन्म आणि मृत्यु नोंदणी विभागांतर्गत तहसील कार्यालयाच्या आदेशपत्रानुसार जन्म नोंद नसलेल्या नागरिकांना जन्म प्रमाणपत्रे देण्यात आली होती. तथापि, काही बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय नागरिकत्व मिळविण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केल्यानंतर, जिल्ह्यातील काही नागरिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. यानंतर, अकोला तहसील कार्यालयाने महापालिकेच्या जन्म आणि मृत्यु नोंदणी विभागाला पत्र लिहून बनावट कागदपत्रांच्या आधारे जारी केलेल्या जन्म प्रमाणपत्रांची चौकशी करण्यास सांगितले. अकोला महानगरपालिका प्रशासनाने तातडीने ही प्रक्रिया सुरू केली आणि ७,००० हून अधिक जन्म दाखल्यांची यादी तयार केली आणि त्यांची कसून तपासणी केली.

# चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्यास वीस वर्षे कारावास

## साठ हजाराचा ठोठाविला दंड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला ९ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार करून तिला जीवनातून उठविणाऱ्या,तिचे निरागस बालपण हिरावणाऱ्या आरोपी चंद्द्या कुकडेला २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ६० हजाराच्या दंडाची शिक्षा आज अकोटच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने सुनावली आहे.

अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील बहुचर्चित अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी चंदु कुकडेला न्यायालय काय शिक्षा देते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागलेले होते.या प्रकरणाचा आज निकाल लागला आहे.

गुरुवार,२६ रोजी अकोट येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश व विशेष न्यायाधीश बी.एम.पाटील यांनी तेल्हारा पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आलेल्या अपराध क्र. २२०/२०१९ भादंविचे कलम ३७६,३७६ (अ) (ब) ३, ४, ६ पोक्सोमधील आरोपी चंदु उर्फ चंद्रभान गोविंदराव कुकडे,(५०) वर्ष, रा. राणेगाव ता.तेल्हारा जि.अकोला याने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला तेल्हारा येथे एका ९ वर्षीय विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केल्याचे सिध्द झाल्याने आरोपीला २० वर्ष कठोर कारावासाची शिक्षा ६० हजार दंडासह ठोठावली आहे.आरोपीने दंड भरल्यास दंडाची रक्कम पीडितेला नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी तसेच दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीला अतिरिक्त ७ महिने कठोर कारावासाची शिक्षा भोगावी लागेल, असे आदेशामध्ये नमूद केले आहे.

या प्रकरणात अल्पवयीन पीडित मुलीनेदेखील साक्ष देताना आरोपीला ओळखले व न्यायालयासमक्ष सांगितले की, यानेच माझ्यावर लैंगिक अत्याचार केला आहे. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील अजित देशमुख यांनी प्रामुख्याने अल्पवयीन पीडिता तसेच डॉक्टर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे गेट वरील रखवालदार, पीडिताचे आई-वडील, तपास अधिकारी असे एकूण १७ साक्षीदारांच्या साक्षी न्यायालयामध्ये नोंदविल्या.

सरकारी वकील अजित देशमुख यांनी आज शिक्षेसंबंधी न्यायालयात युक्तीवाद केला की, आरोपी चंदु कुकडेनी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला एका अल्पवयीन ९ वर्षीय विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केल्याचे साक्षी पुराव्यावरून सिध्द झालेले आहे. आरोपीने केलेला अपराध हा अतिशय गंभीर स्वरूपाचा आहे. आज सगळीकडे अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते, त्यामुळे अशा गंभीर प्रकरणामध्ये आरोपीला कुठल्याही प्रकारची दया न दाखवता जास्तीत जास्त कठोर कारावासाची शिक्षा देण्यात यावी, जेणेकरून अशा अपराधीक प्रवृत्तींना आळा बसेल व कायद्याचा धाक राहील.

# विनामूल्य धान्य अवैधरीत्या विकल्यास शिधापत्रिका रद्द करणार

## जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांचा इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत विनामूल्य मिळणारे गहू, तांदूळ आदी धान्य अवैधरीत्या विकल्याचे आढळल्यास शिधापत्रिका रद्द करण्यात येईल, असा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी दिला आहे.

सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे रास्त भाव दुकानांतून पात्र शिधापत्रिकाधारकांना विनामूल्य धान्य दिले जाते. पावसाळ्यात निर्माण होणारी परिस्थिती



लक्षात घेऊन जून, जुलै व ऑगस्ट या तीन महिन्यांचे धान्य वाटप एकाचवेळी होत आहे. तथापि, शिधापत्रिकाधारकांकडून मिळालेले धान्य अवैधरीत्या खरेदी करून त्याचा साठा व वाहतूक होत असल्याबाबत तक्रारी होत आहेत. शासकीय धान्याची अवैध खरेदी-विक्री नियमबाह्य आहे. त्यामुळे कुणीही शिधापत्रिकाधारक व्यावसायिकांकडे विक्री करताना आढळून आल्यास त्यांचे लाभार्थी यादीतून नाव वगळण्यात येईल, तसेच शिधापत्रिका रद्द करण्यात येईल. त्याचप्रमाणे, शासकीय धान्याची अवैध साठवणूक करणाऱ्या व्यावसायिकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असाही इशारा यन्नावार यांनी दिला आहे.

# वटपौर्णिमा उत्सवानिमित्त महिलांसाठी उद्या खास कार्यक्रमांची मेजवानी

## स्पर्धेत बक्षिसांची लयलूट; तिक्षणगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी आणि दैनिक अजिंक्य भारततर्फे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :**महिलांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी तिक्षणगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी आणि दैनिक अजिंक्य भारततर्फे येथील खंडेलवाल भवन येथे शनिवार (ता.२८) दुपारी एक वाजता वटपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात महिलांसाठी वटपौर्णिमा विशेष स्पर्धा घेण्यात येणार असून, महिलांनी या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तिक्षणगत मल्टीपर्पज वेल्फ`अर सोसायटी आणि दैनिक अजिंक्य भारत तर्फे वटपौर्णिमा उत्सवानिमित्त विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रांगोळी स्पर्धा, मेहंदी




स्पर्धा, वटपौर्णिमेचे महत्त्व कथन स्पर्धा, थाळी सजावट स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत विजयी स्पर्धकांनी भरपूर बक्षिसांची लयलूट होणार असून, कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित प्रेक्षक महिलांनादेखील बक्षीस जिंकण्याची सुवर्णसंधी मिळणार असून, सांस्कृतिक रंग आणि आनंदाची पर्वणी मिळणार आहे. या कार्यक्रमास सर्व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### यांचा सहभाग

महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाचे खरोटे ज्वेलर्स, प्रीती फॅशन अँण्ड ब्युटी पार्लर, लाईट ऑफ सक्सेस ॲकॅडमी अकोला, युईव्ही इनोव्हेशन प्रायव्हेट लिमीटेड, कोठारी कन्स्ट्रक्शन कंपनी अकोला, डॉ. प्रवीण अग्रवाल स्कीन अँण्ड हेअर क्लिनिक, पूजा फॅशन वर्ल्ड बुटीक अँण्ड रेंटल हाऊस हे प्रायोजक आहेत.

# अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा

२

बुलडाणा, शुक्रवार दि.२७ जून २०२५ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात

### अंढेरा परिसरात दमदार पाऊस

**अंढेरा :** अंढेरासह परिसरातील सेवानगर,शिवणी आरमाळ, पाडळी शिंदे, मेंडगांव,बायंगाव,सावखेड नागरेसहयेथेगेल्या बर्याच दिवसांपासून दमदार पावसांच्या प्रतिक्षेत शेतकरी होता. दि.२६ जुनला दिवसभरदमदार पाऊसझाल्याने शेतकरी सुखावला असुन नुकत्याच झालेल्या पेरण्या आता मार्गी लागणार असल्याने बळीराजा सुखावला आहे. अंढेरासह परिसरात आतापर्यंत दम दार पाऊस झाला नसल्याने काहींनी अल्पशा पावसावर पेरणी केली होती. त्यांचे दुबार पेरणीचे संकट टळले असून पेरणीला सुध्दा पावसांची गरज असतानापाऊसझाल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. बियाणे खते जुळवाजुळव करताना शेतकरी मेटाकुटीला आल्याचे चित्र असून मागील वर्षी चा पीक विमा नुकसान ग्रस्त शेतकरी यांना अजुनही मिळाला नसुन अनेक शेतकरी मदती पासून आजही वंचित आहेत. एकुणच परिसरात झालेल्या दमदार पावसामुळे बळीराजा सुखावला असुन शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

### सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत ९ जुलै रोजी

**संग्रामपूर :** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमचे कलम ३० (४) (५) अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतूदीनुसार सन २०२५ ते २०३० दरम्यान संग्रामपुर तालुक्यातील सार्वत्रिक निवडणूकीव्दारे गठीत होणाऱ्या ५० ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती. नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गा अंतर्गत स्त्रीकरीता आरक्षण सोडत ९ जुलै २०२५ रोजी दुपारी १२ वाजता खेतान सभागृह संग्रामपुर येथे होणार आहे. सदर आरक्षण सोडतीकरीता संग्रामपुर तालुक्यातील सर्व लोकप्रतीनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी व नागरीकांनी जास्तीत-जास्त संख्येने सदर ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत तहसीलदार संग्रामपुर यांनी कळविले आहे.

### चिखली येथील मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश सुरु

**बुलडाणा :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलडाणा यांच्या अधिनस्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, चिखली येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. या प्रवेश प्रक्रियेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जमाती, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग तसेच अनाथ विद्यार्थ्यांना आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रवेशासाठी पात्रता आहे.प्रवेशासाठी नगर परिषद चिखली हद्दीतील शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांत प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रवेशासाठी अर्ज करू शकतात.
प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. विद्यार्थ्यांनी या पोर्टलवर जाऊन ऑनलाईन अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर त्याची हार्ड कॉपी वसतिगृहात जमा करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी वसतिगृह प्रभारी गृहपाल विनोद शिंदे यांच्याशी क्रमांक: ९८५०४६४३६४ वर संपर्क साधावा.

### मजूर मिळत नसल्याने बहुतांश ठिकाणी तन नाशक फवारणी

**शेंदुर्जन :** दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या समस्या कमी न होता वाढतच असताना दिसत आहे. कधी वेळेवर पाऊस नाही, तर कधी जास्त पाऊस, यामुळे शेतकऱ्याला दुबारा पेरणी करण्याची वेळ येते. थोडे कामकाज सुरळीत सुरू झाल्यास रोही, हरण, माकड, रान डुकरे या वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर त्रास होत असल्याने, हाकलून देण्याकरिता रात्रंदिवस शेतातच पहारा करावा लागत आहे. तरुण पिढीला शेतीमध्ये काम करण्याची इच्छा नसल्यामुळे मजुराची टंचाई मोठ्या प्रमाणावर भासत आहे. मजूर वर्ग पाहिजे तेवढा उपलब्ध नसल्यामुळे मजुरी ही मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तन नाशक फवारणी करण्याला सर्वात मोठी पसंती दिली आहे या तणनाशक फवारणीमुळे मजुराची मोठ्या प्रमाणावर बचत होते. यामुळे सर्वच शेतकरी पेरणी झाल्याबरोबर ४८ तासाच्या आत फवारणी करताना दिसत आहे. या फवारणीमुळे शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळत आहे. तन नाशक फवारणी का करतात याबाबत मुलाखत देताना दिलीप शिगणे हे शेतकरी म्हणाले , खुरपणीची वेळ असताना सर्वच शेतकऱ्यांना खुरपणी करिता मजुराची आवश्यकता असते तसेच शेतकऱ्यांचा कपाशी वेचण्याची वेळ सुद्धा असते त्यामुळे मजूर बाहेर गावावरून आणावे लागते. त्यांचा भाड्याचा व मजुरीचा खर्च न परवडणारा असतो.

# 'रेशन - धान्याचा' काळाबाजार, संशयास्पद गोदाम केले 'सील'

## २५० क्विंटल रेशनचा तांदूळ जप्त

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**नांदुरा दि.२६**




सार्वजनिक वितरण व्यवस्थेत काम करणारे काही रेशन तस्कर गरीब जनतेच्या धान्यावर डल्ला मारत असून काल बुधवारी बुलडाणा जिल्ह्यातील नांदुरा येथील एका गोदामात मोठ्या प्रमाणात रेशनचा धान्य साठवून ठेवण्यात आल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर नांदुरा पोलीस व पुरवठा विभागाने संयुक्त कारवाई करत एका गोदामावर धाड टाकली.त्याा ठिकाणी जवळपास २५० क्विंटल सार्वजनिक वितरण प्रणालीचा तांदूळ मिळून आला आहे. या गोदामाला प्रशासनाने सील केल्याची माहिती आहे.

तीन महिन्याचा रेशन धान्य एकाच वेळी देण्याची घोषणा शासनाने केली असली तरी ३ महिन्याच धान्य एकाच वेळी उतरवण्याची व्यवस्था प्रशासनाकडे नाही. त्यासाठी मोठी साठवणूक क्षमता असलेले गोदाम जिल्ह्यात उपलब्ध नाही हे विशेष. ज्या महिन्याच धान्य रेशन दुकानदारांना उपलब्ध होत आहे ते धान्य दुकानावर अगोदर पोहोचलेल्या कार्डधारकांना ३ महिन्याच धान्य वाटप केला जात आहे. दुकानात धान्य संपल्यानंतर पुन्हा त्या दुकानाच्या क्षमते प्रमाणे धान्य पुरविल जाते. या प्रमाणे चक्राकार पद्धतीने ३ महिन्याचे धान्य पुरविण्याचे नियोजन आहे.मात्र रेशन दुकान सोडून इतर ठिकाणी विनापरवानगी भाड्याने गोदाम घेऊन माल ठेवण्याची तरतूद नाही. काही दिवसा अगोदर देखील एका ठिकाणी रेशनच धान्य साठवून ठेवलेल होतं, ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील अपेक्षित कारवाई झाली नसल्याची चर्चा संपूर्ण तालुक्यात होती. आता नांदुऱ्यात हे दुसऱ्यांदा रेशनचा साठा पकडण्यात आला आहे. या ''सिल्वर'' वाहतूक कंत्राटदाराशी संबंधित असलेल्या रेशन तस्करावर प्रशासनाकडून काय कारवाई केली जाते? याकडे सगळ्यांचे लक्ष लागलेले आहे.

**नियमानुसार कारवाईचे आदेश दिले**

नांदुरा येथील एका गोडाऊन वर पोलिस व पुरवठा विभागाने संयुक्त कारवाई करत जवळपास २५० क्विंटल रेशनचा तांदूळ जप्त केला आहे. नांदुरा तहसिलदार तसेच निरीक्षण अधिकारी यांना चौकशी करून योग्य कारवाईचे आदेश देण्यात आले आहे. अशी माहिती बुलढाणा जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे यांनी दिली.

**सिल्वर रोडलाईन्सची भूमिका संशयास्पद**

बुलढाणा जिल्ह्यातील घाटा खालच्या भागात मोठ्या प्रमाणात रेशन धान्याचा काळा बाजार सुरू आहे.नांदुरा येथे ओम राठी या रेशन दुकानदाराच्या एका गोडाऊनवर प्रशासनाने काल धाड टाकली.त्याात जवळपास २५० क्विंटल रेशनचा तांदूळ जप्त करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्यात रेशन धान्य वाहतुकीचा कंत्राट सिल्वर रोडलाईन्स यांच्याकडे आहे.नांदुरा येथील रेशन दुकानदार ओम राठी हे स्वतः सिल्वर रोडलाईन्स या वाहतूक कंत्राटदाराकडे नांदुरा तालुक्यात द्वारपोच योजनेचा काम करतात. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यासाठी कार्यरत सिल्वर रोडलाईन्स या वाहतूक कंत्राटदाराची चौकशी सुद्धा अपेक्षित आहे.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक न्यायाचे अग्रदूत-सानंदा

## छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.२६**



महाराष्ट्राच्या इतिहासात दुरदृष्टी ठेवणारे राजे म्हणुन लोककल्याणकारी राजा म्हणून छत्रपती शाहु महाराजांचा नावलौकीक होता. राजष छत्रपती शाहु महाराजांनी रयतेचे राज्य सत्यात उतरविण्यासाठी समाजाची सुधारणा हीच देशसेवा हे ब्रिद वाक्य समोर ठेवुन शिक्षण, कला,क्रिडा,नाटय,साहित्या, उद्योग,शेती व्यवसाय, सामाजिक विषमता निर्मुलन या सर्वच क्षेत्रामध्ये महान कार्य केले. राजष छत्रपती शाहु महाराज हे खऱ्या अथनि सामाजिक न्यायाचे अग्रदुत होते असे प्रतिपादन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले.गुरुवार दि.२६ जून २०२५ रोजी जनसंपर्क कार्यालय येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राजश्री छत्रपती शाहु महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली त्याप्रसंगी बोलतांना त्यांनी उपरोक्त प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलाचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष देवेंद्रदादा देशमुख, सुभाष पेसोडे,विलाससिंग इंगळे, पंजाबरावदादा देशमुख, सरस्वतीताई खासने,मनोज वानखडे, रोहित राजपुत, पांडुरंग जानोकार, संजुभाऊ शर्मा आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी राजश्री छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रतिमेला माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी सुध्दा शाहु महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली.

याप्रसंगी राजष शाहु महाराज की जय, हम सब एक है अश्या घोषणा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला केशव कापले,प्रताप कदम, अश्वीन जाधव, गजानन खोंदील, देवेंद्र सुडोकार, केशव खंडारे, आकाश खरपाडे, श्रीकांत देशमुख, जामुवंतराव देशमुख,पुरुषोत्तम शेजोळे, रामराव ठाकरे, रामेश्वर क्षिरसागर, योगेश जाधव,परसराव ठाकरे, शिवशंकर ठाकरे,बाबाराव वानखडे, शेख अलीम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पावसामुळे घर कोसळले; लाखोंचे नुकसान

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मेहकर दि.२६**



तालुक्यातील राजगड येथे सतत दोन दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे स्थानिक रहिवासी गजानन मांगीलाल चव्हाण यांचे धरणालगत असलेले घर पूर्णतः कोसळले आहे.

या दुर्घटनेत घरातील सोयाबीन, गहू, अन्नधान्य व काही मौल्यवान वस्तू पावसाच्या पाण्यात वाहून गेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. गजानन चव्हाण यांच्या कुटुंबावर अचानक कोसळलेल्या या आपत्तीमुळे आर्थिक दृष्ट्या मोठा आघात बसला असून अंदाजे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. पावसामुळे जमिनीची धूप होऊन घराचे पाया कमजोर झाले होते, त्यामुळे हे घर कोसळल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, इतकं मोठं नुकसान होऊनही मेहकर तालुक्यातील तहसील कार्यालयाकडून अद्याप कोणताही पंचनामा करण्यात आलेला नाही.

प्रशासनाची उदासीनता आणि दिरंगाईमुळे स्थानिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनाम्याची मागणी केली असून नुकसानग्रस्त कुटुंबाला मदतीसाठी योग्य ती भरपाई देण्यात यावी अशी मागणीही होत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तत्काळ कार्यवाही करणे गरजेचे आहे, अन्यथा जनतेचा संयम सुटण्याची शक्यता आहे.

# खून प्रकरणी 'त्या' आरोपींना पुन्हा एक दिवसांची पोलीस कोठडी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**अंढेरा दि.२६**

अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणारे तसेच चिखली तालुक्यातील मेरा खुर्द फाट्यावरील चौफुलीवर पैशाच्या वादातून भरत विरशीद (वय ३२, रा. नांद्राकोळी, ता. बुलढाणा) याची ज्ञानेश्वर निकाळजे सोबत मनोज इच्चे या दोघांनी धारधार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. ही घटना २३ जून रोजी दुपारी सुमारे २ वाजता घडली.

या प्रकरणी अंढेरा पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले होते. दि.२६ जुन २०२५ रोजी दोन्ही आरोपींना पुन्हा चिखली येथील न्यायालयात हजर केले असता एक दिवसांची २७ जुन २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. यापुर्वी आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. घटनास्थळावरून पसार झालेल्या आरोपींकडून अजुन भरत विरशिंदची हत्या करण्यात आलेले शस्त्र तसेच कपडे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपींना न्यायालयात हजर करताना अंढेरा ठाणेदार रुपेश शक्करगे, सिध्दार्थ सोनकांबळे, नितीन पुसे यांनी काम पाहिले.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना प्रकल्प आराखडा संदर्भात ग्रामसभा संपन्न

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**डोणगाव दि.२६**



डोणगाव ग्रामपंचायत कार्यालय मध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना २.० साठी कृती आराखडा तयार करणे संदर्भात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.

या सभेत कृषी सहाय्यक डीपी शिंदे यांनी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या विविध वैयक्तिक शेतकरी , शेतकरी गट ,महिला महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्या याकरिता मिळणाऱ्या विविध योजनाची माहिती देऊन ग्रामसभेतील सर्व सदस्यांच्या सहमतीने योजनेचा आराखडा तयार केला.

या ग्रामसभेचे अध्यक्ष सरपंच शिवचरण आखाडे, उपसरपंच श्याम प्रल्हाद इंगळे, ग्रामविकास अधिकारी दीपक तुकाराम तांबारे, कृषी सहाय्यक डीपी शिंदे, मेरत सर, माजी सरपंच संजय प्रल्हाद आखाडे, प्रकाश बाजड, कैलास बाजड, संदीप पांडव, गजानन सं आखाडे, विजय पळसकर, बबनराव बोरकर सर, सुनील आखाडे, पंकज पळसकर, गोपाल आखाडे, गजानन पळसकर, भारत विढोळे, सुरज बाजड , सुरेश परमाळे ,विजय बाजड, विवेक बाजड, समिती सहाय्यक आशिष आंबेकर तसेच गावकरी व शेतकरी मंडळी हजर होते.

**ग्रामसभा परत घेण्याची गरज**

डोणगाव येथे २६ जून ला सकाळी १० वाजता नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना २.० प्रकल्प आराखडा ग्रामसभा घेण्यात आला पण डोणगाव मध्ये संततधार सुरू असलेल्या पावसाने शेतकरी सदर ग्रामसभेला येऊ शकले नाहीत डोणगाव येथे जवळपास दोन हजार च्या वर शेतकरी आहेत पण ग्रामसभेला मोजकेच ग्रामपंचायत सभागृहात बसतील एवढेच २० ते २५ शेतकरी उपस्थित राहील्याने सदर ग्रामसभा परत घेऊन दंवडी देऊन प्रकल्प आराखडा तयार करावा अशी चर्चा शेतकरी वर्गोत ऐकायला मिळत होती.

# जगविख्यात लोणार सरोवरासाठी वॉटर एरोड्रोम सेवा

## मेहकर जवळील कोराडी प्रकल्पाला पसंती!

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.२६**



उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर जागतिक पर्यटनाचे केंद्र आहे. देशासह जगभरातून पर्यटन या ठिकाणी येत असतात. लोणार सारख्या इतर आठ ठिकाणी जलविमान उड्डाण सेवा अर्थात सी प्लेन सेवा सुरू करण्याचा विचार सध्या शासन दरबारी सुरू आहे. केंद्र सरकारच्या उडान योजनेअंतर्गत राज्यात आठ ठिकाणी सी प्लस सेवा सुरू केली जाणार आहे. त्याामध्ये लोणारचा समावेश आहे. याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र विमानतळ कंपनीने, नागरी विमान वाहतूक मंत्रालयास सादर केला आहे. मेहकर नजीक असणाऱ्या कोराडी प्रकल्पाची सी प्लेन साठी निवड केली जात असल्याची माहिती आहे.

याबाबत शासन स्तरावर अंतिम टप्प्यात चर्चा सुरू असून, मेहकर सह राज्यातील आठ ठिकाणावरुन सदर सेवा एकाच वेळी सुरु केली जाणार असल्याची माहिती आहे.

पर्यटन विभागाच्या अहवालानुसार, लोणार सरोवर हे जगातील एकमेव क्षारयुक्त सरोवर असून, दरवर्षी देश-विदेशातून हजारो पर्यटक येथे भेट देतात. या सरोवरामुळेच बुलडाणा जिलहयाची जागतिक पातळीवर ओळख आहे. मात्र, प्रवासाच्या सुविधांचा अभाव असल्याने अपेक्षित प्रमाणात पर्यटन वृद्धिंगत होत नाही. महाराष्ट्रातील पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्यातील आठ ठिकाणावरील जलावरून सी-प्लेन उड्डाण सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तलाव याचा देखील समावेश करण्यात आला आहे. पर्यटन, नागरी उड्डाण व जलवाहतूक या विभागांच्या संयुक्त विद्यमाने या प्रकल्पाची अंमलबजावणी होणार आहे. मेहकर तालुक्यातील तलावातून थेट सी-प्लेनद्वारे लोणार परिसरात पोहचण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे वेळ वाचणार असून, पर्यटकांचा ओढा वाढेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

लोणार जागतिक वारसा

लोणार सरोवराचा समावेश 'युनेस्को जागतिक वारसा' स्थळांमध्ये झाल्यानंतर या परिसराचे महत्व वाढले आहे. त्याामुळे सरकारकडून रस्ते, निवास, माहिती केंद्र, आणि पर्यावरणपूरक पर्यटनासाठी विविध पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.

**जिल्ह्यासाठी ऐतिहासिक पाऊल**

जिल्ह्याला पर्यटन, रोजगार, आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने नवे दालन या मुळे खुले होणार आहे. लोणार सरोवर परिसरात पर्यटन वाढीसाठी पायाभूत सुविधा उभारण्याचे काम प्रगतिपथावर आहे. रस्ते, सुलभ निवास व्यवस्था, माहिती केंद्र, स्वच्छता मोहिमा तसेच पर्यावरणपूरक पर्यटनासाठी विविध योजना राबविल्या जाणार आहेत.राज्यातीलआठ ठिकाणी ही सेवा विचाराधीन आहे. त्यात मुंबई - गेटवे ऑफ इंडिया,नाशिक - गंगापूर धरण, औरंगाबाद - जायकवाडी धरण, नागपूर - अंबाझरी तलाव ,पुणे - खडकवासला धरण,कोल्हापूर - राधानगरी धरण,चंद्रपूर - इरई धरण,बुलढाणा - मेहकर येथील कोराडी धरणाचा समावेश आहे.

# रस्त्यावरील काटेरी झुडूपे काढण्यास सुरुवात

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**संग्रामपूर दि.२६**



तालुक्यातील संग्रामपूर ते बोडखा काकोडा कवठळ रस्त्यालगत ठिकठिकाणी काटेरी झुडपे उगवली होती या झुडपांमुळे समोरून येणारे वाहन दिसत नव्हते तसेच काटेरी फांद्याचा फटका वाहनधारकांना बसत होता त्यामुळे ही काटेरी झुडपे तोडण्यात यावीत यासाठी किसान सेना तालुकाप्रमुख अमोल ठाकरे यांनी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांच्याकडे भ्रमणध्वनीद्वारे द्वारे बोलुन पाठपुरावा केला होता याची दखल घेऊन २६ जून रोजी संग्रामपूर ते कवठळ रस्त्याावरील काटेरी झुडपे काढण्यास एम एस आय डी सी मार्फत जेसीबी द्वारे या रस्त्यावरील काटेरी झुडुपे काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

तालुक्यातील बोडखा हे गाव संग्रामपूर तालुक्यापासून चार किलोमीटर अंतरावर आहे या गावांमधून काकोडा, कवठळ मार्गे खामगाव व शेगाव सुद्धा जाता येते त्यामुळे या रस्त्यावरून मोठ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते तसेच बोडखा ,काकोडा, भिलखेड या गावातील चौथी पाचवी ते महाविद्यालयीन विद्यार्थी सुद्धा तालुक्याच्या मुख्यालयी संग्रामपूर वरवट बकाल येथे शिक्षण घेत असल्यामुळे या रस्त्याावरून विद्यार्थी सुद्धा सायकलने दररोज येजा करत असतात. या काटेरी झुळपांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे या रस्त्यावर दररोज अपघात होत होते. त्यामुळे या गंभीर बाबीची दखल घेऊन शिवसेना किसान सेना तालुकाप्रमुख अमोल ठाकरे यांनी एम एस आय डी सी च्या अधिकाऱ्यांसोबत या रस्त्यावरील काटेरी झुडपे काढण्याबाबत पाठपुरावा केला होता. त्यामुळे तात्काळ या रस्त्यावरील काटेरी झुडपे काढून रस्ता मोकळा करण्यात येत असल्यामुळे हा रस्ता आता मोकळा होत आहे. यावेळी रस्त्याावरील काटेरी झुडपे जेसीबीच्या साहाय्याने काढत असताना उपस्थित शिवसेना किसान सेना तालुकाप्रमुख अमोल ठाकरे , वैभव ठाकरे , भीमराव उमाळे, एम एस आय डी सी चे अभियंता वैभव इंगळे, बोडखा ग्राप सचिव जाधव,पंकज वानखडे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### अभ्यासक्रमांतील प्रवेशासाठी लागणाऱ्या दाखल्यांसाठी विद्यार्थ्यांची गर्दी

**मंगरूळपीर :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग सुरु झाल्यानंतर विविध अभ्यासक्रमांतील प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची आणि पालकांची मोठी धावपळ सुरू झाली आहे. त्यामुळे महा ई-सेवा (सेतू) केंद्रात गर्दी वाढल्याचे चित्र मंगरूळपीर शहरात बुधवारी पाहावयास मिळाले. व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी नॉन-क्रिमिलियर प्रमाणपत्र वेळेत मिळविणे, हे विद्यार्थ्यांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली इंजिनिअरिंग, फार्मसी, वास्तुशास्त्र, टेक्नॉलॉजी, एम.ई., एम.टेक, एम. फार्म, आर्किटेक्चर, एमबीए, एमएमएस, एमसीए अशा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी केंद्रिय्रभूत प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. या प्रक्रियेदरम्यान जातीचा दाखला, नॉन-क्रिमिलियर प्रमाणपत्र, डोमिसाइल, राष्ट्रीयत्वाचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, आदी आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांना सादर करावी लागतात. यामुळे विद्यार्थ्यांना लवकरात लवकर कागदपत्रे मिळावीत, अशी पालकांमधून मागणी होत आहे.

### लाचखोरांविरोधात प्रभावी जनजागृती

वाशिम : केंद्र सरकारच्या कोणत्याही खात्यातील अधिकारी किंवा कर्मचारी लाच मागत असल्यास त्याविरोधात तक्रार करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) नागपूरमार्फत युद्धपातळीवर जनजागृती करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, सध्या मोबाइलवर कॉल केल्यानंतर सुरू होणाऱ्या टोनमध्येही यासंदर्भातील संदेश ऐकवण्यात येत असून, एसएमएसद्वारेही नागरिकांना जागरूक करण्यात येत आहे. संदेशात स्पष्टपणे नमूद आहे की, जर केंद्र सरकारच्या कोणत्याही विभागातील किंवा उपक्रमातील अधिकारी अथवा कर्मचारी तुम्हाला लाच मागत असेल, तर सीबीआय, नागपूरकडे तक्रार करा. हा जनजागृती संदेश भारतीय रेल्वे, आयकर विभाग, कस्टम्स, बीएसएनएल, पोस्ट, बँका, केंद्रीय शैक्षणिक संस्था, डब्ल्यूसीएल, एमओआयएल, एफसीआय यांसारख्या संस्थांशी संबंधित लोकांपर्यंत पोहोचविण्याचा जोरदार प्रयत्न सुरू आहे.

### ग्रामपंचायतीच्या जागेवर अतिक्रमण; ग्रामसेवकाने बजावली नोटीस!

**अनसिंग :** येथील ग्रामपंचायतीच्या ताब्यातील शॉपिंग कॉम्प्लेक्समधील एका दुकानदाराने अतिक्रमण करत ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर अनधिकृत कब्जा केला. संबंधितने कॉम्प्लेक्सचा काही भाग तोडून जागा वाढविली. त्यामुळे शासकीय मालमत्तेचे नुकसान झाले. याची दखल घेत ग्रामसेवकाने संबंधित दुकानदाराला नोटीस बजावली आहे. शासकीय जागेवरील बेकायदेशीर अतिक्रमण ही संपूर्ण गावाच्या हिताला बाधा आणणारी बाब आहे. त्यामुळे प्रशासनाने संबंधितावर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघातात एक जण जखमी

**कारंजा :** भरधाव वाहनामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना २५ जून रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, कारंजा येथे घडली. जय अशोक चवात (२१, रा. जवळगाव, ता. दारव्हा) असे जखमी युवकाचे नाव आहे. तो (एमएच २९ सीबी ६५७५) क्रमांकाच्या वाहनाने अमरावतीहून नेरकडे जात होता. दरम्यान, समोरून भरधाव वेगात वाहन येत असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले व गाडी रस्त्यावर पलटी झाली. या अपघातात जय चवात जखमी झाला असून, त्याच्यावर कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले.

### चोरी गेलेले मोबाइल मूळ मालकांच्या स्वाधीन

**मानोरा :** पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील चोरीला गेलेले व गहाळ झाल्याची तक्रार दाखल असलेले दोन मोबाईल फोन स्थानिक पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे शोधून काढ २५ जूनला मूळ मालकांच्या स्वाधीन केले आहेत. शेंदोना येथील कुणाल रामसिंग राठोड तसेच भुली येथील अण्णा इरभान पुंसाडे यांचा मोबाईल चोरीला गेला होता. यासंदर्भात दोन्ही व्यक्तींनी मानोरा पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यानुसार, पोलीस उपनिरीक्षक अभिजित बारे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने

# वाशिम जिल्ह्यात दमदार पाऊस

## नदी नाल्यांना पूर, अनेक प्रवासी एसटी बसमध्ये अडकले






जिल्ह्यात मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला आहे. दरम्यान, एंडा (ता. मालेगाव) येथील लेंढी नदीला पूर आला. एंडा जवळील पुलावरून पुराचे पाणी वाहत असल्यामुळे या पुलाच्या दोन्ही बाजूने वाहनांची रांग लागली होती. शेतात गेलेल्या महिला या पुलाच्या एका बाजूला अडकल्या होत्या. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर सायंकाळी वाहतूक पूर्ववत झाली. या पुरामुळे सायंकाळपर्यंत वाशिम ते किन्हीराजा या मार्गावरील वाहतूक प्रभावित झाली होती.



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २६ :** वाशिम जिल्ह्यात २५ जूनच्या रात्री सात वाजेपासून संततधार मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. या मुसळधार पावसाने अनेक नदी-नाल्यांना पूर आला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले होते. या पावसामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. काही भागातील पेरण्या झाल्यामुळे त्या भागातील शेतातील सुकत असलेल्या पिकांना जीवनदान मिळाले आहे.

जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील मुंगळा परिसरात पंचवीस वर्ष जुन्या पाझर तलावाचा सांडवा फुटल्याने आठ ते दहा शेतकऱ्यांचे नुकसान झाले. संभाजीनगर ते नागपूर महामार्गावर पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली होती. ११ जूननंतर पावसाने दडी मारल्यामुळे सोयाबीन, कपाशी, तूर पिकांना फटका बसला होता, मात्र आता पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

बुधवारी रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने मोठ्या प्रमाणात नदी व नाल्यांना पूर आला असून, जोरदार पडलेल्या या पावसामुळे काही गावातील शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. अनेक शेतात साचलेल्या पाण्यावरून व शेतातून पाण्याचा लोंढा वाहून गेल्याचे समोर येत आहे. बुधवार रात्रीपासून पडलेल्या जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील नदी, नाले व ओढ्यांना चांगलाच पूर आला आहे. पुरामुळे जिल्ह्यातील छत्रपती संभाजी नगर -नागपूर मार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक काही तासांसाठी प्रभावित झाली होती. आगामी काळात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला असून नदी, नालेकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## खारूल काच नदीला पूर; आरोग्य अधिकाऱ्यांचा दौरा

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २६ :** आज केनवड परिसरातील पिंपरी सरहद येथे खारूल काच नदीला आलेल्या पुरामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर आदरणीय जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रेमकुमार ठोंबरे व जिल्हा साथरोग नियंत्रण अधिकारी डॉ. मोबिन खान यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले.

अधिकाऱ्यांनी स्थानिक आरोग्य केंद्राशी समन्वय साधून बाधित भागात पाणीजन्य आजारांचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश दिले. नागरिकांनी उघड्या पाण्याचा वापर टाळावा, उकळून थंड केलेले पाणीच पिण्याचे आवाहन त्यांनी केले. आरोग्य विभागामार्फत आवश्यक औषधे, प्राथमिक उपचार साधनसामग्री व आरोग्य पथक तैनात करण्यात आले असून, परिस्थिती नियंत्रणात असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. पूरस्थितीचा आढावा घेत, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सर्व यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

## जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २६ :** खेळाविषयी मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार तसेच विकासाकरिता तसेच ऑलिम्पिक स्पर्धेबाबत जनजागृती करण्याकरिता क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद वाशिम व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम द्वारा जागतिक ऑलिम्पिक दिवस २३ जून रोजी साजरा करण्यात आला आहे.

या दिनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल वाशिम येथे क्रीडाविषयक प्रसार व प्रचार करण्याच्या उद्देशाने खेळाची जनजागृती व्हावी, याकरिता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, तसेच कबड्डी, खो-खो, फुटबॉल, कराटे, आर्चरी, किक बॉक्सिंग, बॉक्सिंग, इत्यादी खेळाचे प्रेक्षणिय सामने आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता उत्साहाने जिल्हा क्रीडा संकुल येथील विविध खेळाचे खेळाडू, विविध खेळाचे मार्गदर्शक अनिल थडकर, रणजित कथडे, सुनील देशमुख, अजय अंभोरे, शारीरिक शिक्षक लहाने, खेलो इंडिया मार्गदर्शक शेख अब्दुल, विविध संघटनेचे पदाधिकारी, माजी नामांकित खेळाडू, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच कार्यालयातील अधिकारी किशोर बोंडे (जिल्हा क्रीडा अधिकारी), मारोती सोनकांबळे (क्रीडा अधिकारी), संतोषकुमार फुपाटे (क्रीडा अधिकारी), अक्षय टेंभुर्णीकर (राज्य क्रीडा मार्गदर्शक, बॉक्सिंग), पूजा भटकर(राज्य क्रीडा मार्गदर्शक, कबड्डी), विजय बोदडे (वरिष्ठ लिपिक), सुशांत कलढोणे, प्रकाश मोरे, विकास तिडके आदी कर्मचारी उपस्थित होते.

## म्हसणी रस्त्यावरील पुलाजवळ वाहनधारकांची कसरत

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**इंझोरी, दि. २६ :** गावाजवळ असलेल्या म्हसणी रोड नाल्यावरील पुलाचे काम संबंधित ठेकेदाराने वेळेच्या आत न केल्याने आलेल्या पावसाच्या पाण्याने चिखल पसरला. या चिखलातून वाहनधारकांना चालताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे अनेक दुचाकी वाहन घसरून पडल्याने जखमी झाल्याच्या घटना घडल्या.

जानेवारी २०२५ ला गावाजवळ आल्यावर मोठ्या पुलाचे बांधकाम केले. जून महिना संपत असतानाही या नाल्यावरील पुलाचे काम झाले नसून, २५ जून रोजी आलेल्या पावसाच्या पाण्याने पुलाच्या दोन्ही कडेला चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. या चिखलामधून वाहनधारकांना आपले वाहन काढताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अशामध्ये कित्येक वाहन या ठिकाणी घसरून पडल्याने अनेक नागरिक व महिला जखमी झाले आहे. कासवगतीने सुरू असलेल्या कामाला संबंधित ठेकेदार जबाबदार असून, जखमी झालेल्या नागरिकांना रुग्णालयांचा खर्च मिळेल काय, असा संतप्त सवाल नागरिक करीत आहेत. उर्वरित काम संबंधित ठेकेदारांनी तात्काळ पूर्ण करून या रोडवर चालणाऱ्या वाहनधारकांची कसरत थांबवावी व अशा ठेकेदारावर गुन्हा नोंदवावा, अशी मागणी जामदरा, तोरणाळा, म्हसणीसह इंझोरीच्या नागरिकांनी केली आहे.

## रिसोड तालुक्यात नदी-नाल्याला पूर



**रिसोड :** रिसोड तालुक्यासह अन्य परिसरात २५ जून रोजी संध्याकाळपासून पावसाची रिपरिप सुरू आहे. कुठे मध्यम तर कुठे मुसळधार तर कुठे हलक्या सरींचा पाऊस सुरू आहे. लागोपाठ रात्र आणि २६ जून रोजी दुपारी १ वाजेपर्यंत पाऊस सुरू असल्याने जिकडे तिकडे पाणीच पाणी आहे. यामुळे आता शेतकरी राजा सुखावला असून, सदर बाब शेतकऱ्यांसाठी आनंदाची ठरत आहे. शेतकऱ्यांची पिके वाचली असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले असून; मात्र रिसोड तालुक्यातून वाहणारी काच नदी व उत्तावळी नदीला भला मोठा पूर आल्याने काही गावांचा संपर्क तुटला असून, मेहकर-मालेगाव हा राज्यमार्ग महामार्गसुद्धा बंद झालेला आहे. या ठिकाणी दोन्हीकडे वाहनाच्या रांगा लागल्या असून, पूर आला असल्याने पूर पाहण्यासाठी ग्रामस्थांची या ठिकाणी गर्दी दिसून येत आहे. पाण्याचा जोर वाढत चाललेला असून, राज्य महामार्ग केव्हा खुला होईल, याचा अंदाज मात्र सांगता येत नाही. सद्यस्थितीत रात्रभर सुरू असलेल्या पावसाने चोहीकडे पाऊसच पाऊस असून काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतात सुद्धा पाणी घुसले असल्याची माहिती मिळत आहेत. गेली तीन आठवड्याभरापासून पावसाने पाठ फिरवली होती. काही तुरळ ठिकाणी वगळता जून महिना पूर्ण कोरडा गेला असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र २५ जून रोजी संध्याकाळपासून सुरू झालेला हा पाऊस २६ जून दुपारपर्यंत सुरू असल्याने सद्यस्थितीत वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून, बाजारपेठेमध्ये सन्नाटा दिसून येत आहे. नागरिक सकाळपासूनच घराच्या बाहेर पडले नसल्याचे दिसून आले.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताकदीने लढणार – इम्तियाज जलील

## कारंजामध्ये एआयएमआयएमचा जलसा-ए-आम उत्साहात संपन्न

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी




**कारंजा (लाड), दि. २६ :** आम्ही लवकरच पक्ष सदस्य मोहीम राबवणार असून फक्त नगरपालिकाच नाही तर सर्व निवडणुका आम्ही पूर्ण ताकदीने लढवणार असल्याची माहिती एआयएमआयएमचे प्रदेशाध्यक्ष तसेच माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी कारंजा येथे आयोजित जलसा-ए-आम या कार्यक्रमात दिली.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाचा प्रचार, प्रसार आणि संघटनात्मक दुवे निर्माण करण्यासाठी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) ने २४ जून रोजी प्रदेशाध्यक्ष मा. खासदार सय्यद इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली वाशिम आणि यवतमाळ येथे जनसंवाद दौरा आयोजित केला होता. दरम्यान, कारंजा येथील पुंजानी कॉम्प्लेक्समधील दारूस सलाम येथे जलसा-ए-आमचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार आणि प्रदेशाध्यक्ष सय्यद इम्तियाज जलील हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थिती मध्ये प्रदेश कार्याध्यक्ष हाजी फारूखभाई शाब्दी, प्रदेश उपाध्यक्ष हाजी मोहम्मद युसूफ पुंजानी, सरचिटणीस समीर साजिद बिल्डर, सरचिटणीस अतिक अहमद खान, सचिव सैफ पठाण, सहसचिव शफिउल्लाह काझी व इतर मान्यवर मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना इम्तियाज जलील म्हणाले की, कितीही खोटे गुन्हे दाखल करा मी घाबरणार नाही, थांबणार नाही. सत्ताधारी नेत्यांचे घोटाळे बाहेर काढल्यामुळे माझ्यावर खोटे आरोप लाऊन गुन्हे दाखल करण्यात येत आहे. तसेच माझ्या विरोधात पैसे देऊन तुम्ही मोर्चा काढला, आता बघा मी तुमची कशी वाट लावतो, असा गर्भित इशारा पालकमंत्री संजय शिरसाट यांना दिला. आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने अकोला,वाशिम यवतमाळ, अमरावती या चार जिल्ह्याची धुरा प्रदेश उपाध्यक्ष मो. युसुफ पुंजानींनी सोपवून अन्य समविचारी पक्षासोबत युती व आघाडी करण्याची सूचना करण्याचा तसेच उमेदवारी वाटप करण्याचे पूर्ण अधिकार दिले असल्याची माहिती दिली. दरम्यान, उपस्थितांना पक्षाच्या विचारधारेबाबत सविस्तर माहिती देऊन पक्षाला बळकट करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाला अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती या जिल्ह्यातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हमीद शेख यांनी केले तर आभार ॲड. फिरोज शेकुवाले यांनी मानले.

## निवारणदिनी तीन तक्रारींचा निपटारा

**मानोरा :** तालुकास्तरीय तक्रार निवारणदिनी, बुधवारी तीन तक्रारींचा निपटारा करण्यात आला. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या निर्देशानुसार तालुक्यातील शेतरस्त्यांशी संबंधित तक्रारींवर तत्काळ कारवाईसाठी अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तक्रार निवारण सभा घेण्यात आली. चार पैकी तीन तक्रारींचे निराकरण तत्काळ करण्यात आले. शेतरस्त्यांशी संबंधित तक्रार असल्यास, संबंधित नागरिकांनी प्रत्येक सोमवारी दुपारी १२ ते १ या वेळेत तक्रार अर्जासह तहसील कार्यालय, मानोरा येथे उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. संतोष येवलीकर यांनी केले.

## पाटील विद्यालयात शाहू महाराज जयंती साजरी



**मानोरा :** कार्ली येथील माधवराव पाटील विद्यालयात राजश्री शाहू महाराज यांची जयंती २६ जून रोजी साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्याध्यापक उपेंद्र पाटील, शिक्षक माणिक डेरे, योगेश गहुले, किशोर जाधव, पवन पाटील, निरंजन उपाध्ये, निखील गावंडे, सुनील अगलदरे, संतोष गावंडे, रवी पाटील, रघु भगत, अजय लवटे व विद्यार्थी उपस्थित होते.

## थोडक्यात

### दहीहांडा गावात ग्राहक सेवा केंद्र सुरु




**दहीहांडा:** गावात ग्राहक सेवा केंद्र सुरू झाले आहे. दहीहांडा ग्राहक सेवाकेंदाचा शुभारंभ १५ जून २०२५ रोजी झाला आहे. ग्राहक सेवा केंद्राचे संचालक अंकुर राजेंद्र अग्रवाल यांनी केंद्र उघडल्याने स्टेट बँक ऑफ इंडियाचा आता ग्राहकांना होणार फायदा आहे. या केंद्रात बँक खाते उघडणे अटल पेंशन योजना. प्रधानमंत्री जीवन विमा योजना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना बँक विड्रॉल, पैसे टाकणे, फंड ट्रान्सफर, तत्काळ मनी रेमिटेन्स, (आय.एम.पी. एस.) मिनी स्टेटमेंट, एटीएम, एन.ई.एफ. टी, डिपॉझिट ट्रान्सफर विड्रॉल, डेबिट कार्ड ब्लॉक करणे, रुपे डेबिट कार्ड सुरू करणे चेक बुकचे व्यवहार रोखने, चेक बुक देणे, पासबुक प्रिंटिंग, आदी सुविधा उपलब्ध होणार आहेत. यावेळी भाजप जिलाध्यक्ष संतोष शिवरकर, संतोष अग्रवाल, अंकुर अग्रवाल. मनोज अग्रवाल, अनुप अग्रवाल, सुभाष भांडे, रोनक अग्रवाल, रोशन ढोकण, गोविंदा गोयनका, सुशील सहगल, संतोष वाकोडे व गावकरी उपस्थित होते.

### बोरगावात अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅली व पथनाट्य




**बोरगाव मंजू :** परशुराम नाईक विद्यालय व पोलीस स्टेशन बोरगाव मंजूच्या विद्यमाने जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त रॅली काढून पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. परशुराम नाईक विद्यालयातून रॅलीला सुरुवात झाली. रॅलीला ठाणेदार अनिल गोपाळ, शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य मनोज आगरकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर लांडे यांनी हिरवी झेंडी दिली. रॅलीमध्ये एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी व प्रा. वासुदेव डांगे यांनी जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त पथनाट्य सादर करून जनजागृती केली. यावेळी पथनाट्याचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.रमेश भड यांनी केले. ठराविक ठिकाणी झालेल्या पथनाट्याच्या प्रयोगावेळी गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. या पथनाट्यात शाळेतील बहुसंख्य विद्यार्थी, शिक्षक, भगिनी व पोलीस स्टेशनचे कर्मचारी सहभागी झाले होते. रॅली व पथनाट्यासाठी उपमुख्याध्यापक गजानन पोहनकर, पर्यवेक्षक शंकर भदे, प्राचार्य प्रणाली अंबरते यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक गजानन कंकाळ, प्राध्यापक आशिष बोरोडे, विक्रमसिंह पवार, पंकज किडे, वैशाली राय, संदीप मनवर, प्रा. शिवानी बारस्कर, प्रा.रेश्मा कुरेकर, श्रीकृष्ण बागडे, कैलास गोवर्धने, सय्यद उमेर सय्यद नाजीम, विकी बागडे व पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी सहकार्य केले.

### पिंजर पोलिसांकडून विविध विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**पिंजर :** पिंजर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या ज्ञानप्रकाश विद्यालय , व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूल, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पिंजरचे ठाणेदार गंगाधर दराडे यांनी मार्गदर्शन केले आहे. सर्व विद्यार्थ्यांना अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घेण्यात आली, यासंबंधीचे प्रतिज्ञापत्र देऊन स्वाक्षरी घेण्यात आल्यात, त्यामध्ये अमली पदार्थाचे दुष्परिणाम याबाबत ठाणेदार गंगाधर दराडे यांनी मिशन उडान अंतर्गत विविध विषयांवर गुरुवारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे, अमली पदार्थापासून नुकसान काय आणि फायदे काय? त्याचे दुष्परिणाम काय होतात? याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यांनी पिंजर येथील विविध विद्यालयाला भेटी दिल्यात, यावेळी ठाणेदार गंगाधर दराडे व त्यांचे समवेत सर्व पोलीस स्टाफ उपस्थित होता.

# पावसामुळे पातूर तालुक्यातील झरंडी गावाचा संपर्क तुटला





झारंडी येथील पुलावरून अद्यापही पाणी सुरू असून अनि कट वरून जाऊन गावामध्ये झालेल्या नुकसानीची पाहणी केली. त्यानुसार : तीन घरात पाणी घुसले होते शाळेची भिंत पडली आहे व शाळेची खिचडी शिजवण्याची रूम वाहून गेली आहे. सध्या गावात तलाठी, मंडळ अधिकारी आणि आपत्ती व्यवस्थापन पथक परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहे अशी माहिती तहसीलदार डॉ राहुल वानखडे यांनी दै अजिंक्य भारत ला दिली.

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पातूर, दि. २६ :** अकोला जिल्ह्यात आज सकाळपासूनच पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक भागात गेल्या काही तासापासून पाऊस बरसत आहे. या संततधार पावसामुळे जिल्ह्यातील पातूर तालुक्यातल्या झरंडी गावाचा संपर्क तुटल्याची माहिती आहे.

छोट्याश्या गावाला पुराने पाण्याने वेढा घातला असुन अनेक गावकऱ्यांच्या घरात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. जिल्ह्यात मे महिन्यात कडक ऊन तापणे अपेक्षित असताना मात्र आवकाळी पावसाने कहर करीत मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. त्यानंतर जून महिन्यात मृग नक्षत्रात पाऊस येणे अपेक्षित असताना मात्र शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा करावी लागली. संपूर्ण जून महिना कोरडा गेल्याने शेतकरी आभाळाकडे नजरा लावून बसले होते.मात्र जून च्या शेवटच्या टप्प्यात मंगळवारी २४ जून पासून टप्प्या टप्प्यात जिल्ह्यात पाऊस कोसळत होता. आज मात्र सकाळपासूनच सगळीकडे जोरदार पाऊस कोसळत होता. जिल्ह्यातील अनेक भागात गेल्या काही तासापासून पाऊस बरसत आहे. या संततधार पावसामुळे जिल्ह्यातील पातूर तालुक्यातल्या झरंडी गावाचा संपर्क तुटल्याची माहिती आहे. छोट्याश्या गावाला पुराने पाण्याने वेढा घातला असुन अनेक गावकऱ्यांच्या घरात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असल्याबाबतची माहिती आहे. सरपंचाच्या घरी गावातील लोकांच्या व्यवस्था करण्यात आली असून गावात आपत्ती व्यवस्थापन पथक सज्ज झाले आहे. दरम्यान सध्या स्थितीत कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नसल्याची माहिती समोर आली असून एकंदरीत झरंडी गावाला पूर्ण वेढा घातलेला आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाला प्रतिसाद

**दानापूर (वा):** महसूल विभागाच्या पुढाकाराने आयोजित ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'' अभियानाला तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जनतेच्या विविध तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी आणि महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने हे शिबिर जिल्हा परिषद शाळा, मालेगाव बाजार येथे आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. शिबिरात एकूण १२७ दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सीमा अढाऊ होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच सलीम खान शब्बीर खान, पोलीस पाटील रितेश ठाकूर, संतोष माकोडे (दानापूर), वैद्यकीय अधिकारी डॉ. वाकोडे, मंडळ अधिकारी ओमप्रकाश वेरूळकर, ग्राम महसूल अधिकारी वारूळकर , पत्रकार, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. महसूल विभागामार्फत वेरूळकर यांनी मार्गदर्शन केले.

**विविध विभागांमार्फत सेवा व माहिती:**

**महसूल विभाग:** जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत वारस नोंद अद्ययावत करणे, सातबारा/आठ गाव नमुना सहा वाटप. **पुरवठा विभाग:** शिधापत्रिका वाटप, घरकुलधारकांना ५ ब्रास मोफत रेती यासंदर्भात माहिती. **आरोग्य विभाग:** गोल्डन कार्ड वितरण. **महिला व बालविकास विभाग:** विविध उपक्रमांची माहिती व 'बालसंगोपन' विषयावर मार्गदर्शन. **कृषी विभाग:** महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत केळी लागवड. अल्पभूधारक व बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना. महाडीबीटी योजनांची माहिती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रा. मह. अधिकारी श्री. अंकुश मानकर यांनी केले.

### बाळापूर तालुक्यात मिशन उडान मोहीम अंतर्गत मोटारसायकल रॅली

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २६ :** पोलीस स्टेशन बाळापूर अंतर्गत जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचे संकल्पनेतून '' मिशन उडान ''या मोहिमेंतर्गत शहारात व तालुक्यात मोटारसायकल रॅली काढण्यात आली.

उपविभागीय दंडाधिकारी अरविंद बक्षी, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघम , तहसीलदार वैभव फरतारे बाळापूर , तसेच इतर शासकीय अधिकारी व पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि अंमलदार यांच्या उपस्थितीत जागतिक अमली पदार्थ विरोधी दिवस २६ जून २०२५ म्हणून या अनुषंगाने सकाळी ११.३० वा बाळापूर शहर परिसरात मोटरसायकल रॅली काढण्यात आली आहे. तसेच बाळापूर पोस्टेचे सहायक पोलीस निरीक्षक पंकज कांबळे यांनी धनाबाई विद्यालय बाळापूर आयटीआय कॉलेज बाळापूर, जागेश्वर विद्यालय वाडेगाव, एल. एन. कला महाविद्यालय वाडेगाव , संत गजानन स्कूल पारस येथे विद्यार्थ्यांना तसेच ग्रामस्थांना शपथ देउन मार्गदर्शन केले आणि स्वाक्षरी घेण्यात आली व पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली तसेच अमली पदार्थाच्या सेवनामुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती / मार्गदर्शन करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना व नागरिकांना अमली पदार्थाचे दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी गावातून व शहरातून मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते .

### आठवडी बाजाराच्या पुलावरून पाणी



**पिंजर:**येथे आज गुरुवारी आठवडी बाजार भरत असतो, गुरुवारी पावसाने जबरदस्त हजेरी लावली, त्यामुळे पिंजर येथील आठवडी बाजाराच्या पुलावरून पाणी वाहू लागल्याने लोकांची फार मोठी पंचाईत झाली होती, बाजारकरू आणि व्यापाऱ्यांना जाण्यासाठी दुसरा मार्ग आहे; परंतु त्याही रस्त्याने पाणी वाहत असल्यामुळे दोन्ही मार्ग बंद झाले होते, त्यामुळे लोकांनी पाऊस कमी झाल्यानंतर सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला आणि आपल्या घरचा रस्ता पकडला.

**छाया :दिलीप जाधव पिंजर**

## महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अडगाव बु, दि. २६ :** स्थानिक ग्रामसचिवालयात अडगाव बु. मंडळ अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात जनतेनी विविध दाखल्यांचा लाभ घेत उत्साहात संपन्न झाले. नायब तहसीलदार एस. पी. ढगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात सरपंच शोभा



रमेश खंडारे, मंडळ अधिकारी सुधाकर सोनोने, माजी सरपंच अशोक घाटे, गटनेते संजय राजनकर, पोलीस पाटील हितेश हागे, माजी पं. स. सदस्य गुलाब डाबेराव, ग्राम विकास अधिकारी अनिल खुमकर, तलाठी प्रवीण वाकपंजार, सुनिता मंगळे, जांभुळकर, तालुका कृषी अधिकारी गौरव राऊत, कृषी सहायक बिहाडे, सारभूकन, देशमुख,अंगणवाडी पर्यवेक्षिका वैशाली बोदडे,आशा समन्वयक सविता भागवतकर, सेतू संचालक शेख नासिर उल्ला, अमोल खंडारे, शशी नवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा पूजनानंतर शिबिराला सुरुवात झाली. यावेळी महसूल, कृषी, ग्रामविकास व आरोग्य विभागातील अधिकारी यांनी संजय गांधी , श्रावणबाळ योजना, रेशनकार्ड, सातबारा, आठ अ, केवायसी, कृषी विभागाच्या विविध योजना, विमा योजना, पी. एम .किसान अश्या विविध बाबींची व योजनांची उपस्थित जनतेला माहिती दिली. त्यानंतर विविध प्रकारचे २५० पेक्षा जास्त दाखले नागरिकांना वितरीत करण्यात आले, तसेच बरेच लाभार्थ्यांना लाभमंजुरी आदेश सुद्धा देण्यात आले. याप्रसंगी आरोग्य विभागातर्फे बहुसंख्येने नागरिकांनी आरोग्य तपासणी करून औषधाचा लाभसुद्धा घेतला.

# मोखा येथील जि.प. शाळेत प्रवेशोत्सव

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नव विद्यार्थ्यांचे केले पुष्पहार घालून स्वागत, माजी तहसीलदार श्रीकृष्ण तायडे यांची प्रमुख उपस्थिती**

**जानोरी मेळ , दि. २६ :** निंबा अंदुरा सर्कलमधील मोखा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत हार व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी तहसीलदार श्रीकृष्ण तायडे, शाळा शिक्षण समितीचे अध्यक्ष जगन्नाथ गावंडे, पत्रकार देवराव परघरमोर, विठ्ठल कुरवाडे, प्रकाश वानखडे, बाळकृष्ण शेगोकार, रवींद्र शेगोकार, विश्वनाथ गावंडे, उमेश अमझरे, अनंता तायडे इत्यादींची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना हार, पुष्पगुच्छ, पुस्तके, ड्रेस, खाऊ इत्यादींचे वाटप करण्यात आले. मोखा जि.प. शाळेमध्ये स्वरूपखेळ, वझेगाव, जानोरीमेळ , हिंगणा इत्यादी गावातील विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाला अंगणवाडीच्या उंबरकार तसेच मुख्याध्यापक श्रीकांत गाठे, सहायक शिक्षक मुंडे,



कुलकर्णी उपस्थित होते.

सर्व शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. गावातून प्रभात फेरी काढण्यात आली व जिल्हा परिषद शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी गावातील नागरिकांना आवाहन करण्यात आले व जिल्हा परिषद शाळेमध्ये खूप काही सुविधा उपलब्ध आहेत. आत्ताच्या काळामध्ये सर्व पालक वर्ग शिकवणी वर्गाकडे व कॉन्व्हेंटकडे वळलेला आहे, तो आपल्या जिल्हा परिषद शाळेकडे वळणार, ही आस ठेवून सर्व शिक्षक वर्गाने गावातून प्रभात फेरी काढली .

### दानापूर येथे राजर्षी शाहु महाराज जयंती उत्सव संपन्न

**दानापूर (वा):** तेल्हारा तालुक्यातील क्रमांक एकची असलेली ग्राम पंचायत दानापूर येथे आज राजर्षी शाहु महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रा.पं. सरपंच सपना धम्मपाल वाकोडे या होत्या.यावेळी राजर्षी शाहु महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रा.पं.लिपिक अशोक राहाणे यांनी केले. त्यानंतर आपल्या अध्यक्षीय मनोगतातून छत्रपती शाहु महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला.या जयंती सोहळ्याचे सूत्रसंचलन अशोक रहाणे यांनी केले तर आभार अविनाश जामोदकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता पांडुरंग मानकर, गणेश खडसान,अविनाश जामोदकर यांनी परिश्रम घेतले,यावेळी अतुल राऊत,रामदास ढगे,घायल, पत्रकार व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री संत तुकाराम महाराज महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ.गजेंद्र वासनिक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २६ :** डॉ. गजेंद्र वासनिक यांची अकोट तालुक्यातील किनखेड पूर्णा येथील श्री संत तुकाराम महाराज महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर सोमवार, २३ जून रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. गजेंद्र वासनिक यांची शिक्षण क्षेत्रात चांगली पकड आहे.

डॉ. गजेंद्र वासनिक यांची प्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. महाविद्यालयातील कामकाजाची माहिती घेऊन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी संस्थेचे सचिव प्रा. देवानंद गावंडे व समन्वयक प्रा. निळकंठ सुरंसे व इतर प्राद्यापक वर्ग यांनी त्यांचे अभिनंदन आणि स्वागत केले. डॉ. गजेंद्र वासनिक पूर्वी सुधाकरराव



नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय या ठिकाणी वाणिज्य शाखा विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. गेल्या ऑक्टोबर महिन्यामध्ये ते या ठिकाणाहून नियत नियमानुसार निवृत्त झालेत आणि आता एका महाविद्यालयामध्ये एका नव्या कार्यकाळेला त्यांनी इथून सुरुवात केली आहे. पूर्वी कार्यरत असणाऱ्या महाविद्यालयामधील सर्व प्राध्यापक वृंद यांनीही त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा



बुलडाणा, शुक्रवार २७ जून २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### बुलडाण्यातील ६६ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत

**खामगाव :** ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दि. १३ व १६ जून २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांच्या दि. १७ जून २०२५ रोजीच्या सुधारित अधिसूचनेनुसार बुलडाणा तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींतील सरपंच पदांचे आरक्षण सोडत ८ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा निवडणूक इमारत, तहसील कार्यालयाजवळ, चिखली रोड, बुलडाणा येथे काढण्यात येणार आहे. या सभेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग यांसाठी सरपंच पदांचे आरक्षण सोडत काढली जाणार आहे. यासोबतच अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, मागास प्रवर्ग महिला व खुल्या प्रवर्ग महिला यांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत काढण्यात येणार आहे.

### सुनेने सासुच्या चेहऱ्यावर गरम तेल टाकले ; गुन्हा दाखल

**शेगाव :** घरात झालेल्या कौटुंबिक वादातून सख्या सुनेने रागाच्या भरात घरामध्ये गाढ झोपेत असलेल्या सासूच्या चेह-यावर खाण्याचे गरम तेल टाकुन जखमी केल्याची घटना २२ जून रोजी मध्यरात्री सुमारास नागझरी गावात घडली. याबाबत सासरे गुलाबराव सदाशिव लढे ५५ रा. नागझरी ता शेगाव यांनी पोलिसात फिर्याद दिली की मझी सुन नामे ऐश्वर्या शिवाजी लढे रा नागझरी हीने माझी पती सौ सिंधुबाई ही घरामध्ये झोपलेली असतांना तिचे चेह-यावर खाण्याचे गरम तेल टाकुन जखमी केले. याप्रकरणी शेगाव पोलिसांनी आरोपी सौ. ऐश्वर्या शिवाजी लढे रा. नागझरी यांचे विरुद्ध अप नं ३६२/२५ कलम ११८(१), भारतीय न्याय साहिता नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॉ सुनिल सुसर करीत आहेत.

### नारायण वाळके यांचे अल्पशा आजाराने निधन



**जानेफळ :** येथील प्रगतशील कास्तकार नारायण पुंजाजी वाळके यांचे अल्पशा आजाराने बुधवार दि.२५ जुन २०२५ रोजी निधन झाले आहे मृत्यू समयी ते ९०वर्षाचे होते. स्थानिक स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यासंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती, १मुलगा, १मुलगी नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५४२ - २४०० |
| गहू | २३०० - २४६० |
| तुर | ५४०० - ६९०० |
| हरभरा | ५२०० - ५७०० |
| सोयाबीन | ३६५० - ४४५० |
| भुईमुग | ३८७५ - ५८२५ |
| उडीद | ६३२५ - ६३२५ |
| मक्का | १७५० - १७५० |
| मूंग | ४५०० - ४९०० |
| बाजरी | १८०० - १८०० |

# आदर्श ज्ञानपीठ संचालकांचा भ्रष्टाचारी गुन्हा साध्याभोळ्या पालकांनाही लावतात चुना !

## खामगाव शहरातील अवैध आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कुलच्या संचालकांना अधिकाऱ्यांकडून अभय,कारवाई केव्हा होणार?

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**खामगाव दि. २६**

आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कूल संचालक भ्रष्टाचारात लोथपोट झालेली असून त्यांच्यावर निश्चितच फौजदारी गुन्हा दाखल होणार आहे. शिक्षण विभागाचे अधिकारी आणि महसूल विभागाच्या अधिकारी यांनी कसून चौकशी केल्यास सर्व संचालक यामध्ये निश्चित दोषी आढळतील. शासनाची फसवणूक संचालकांनी केलीच आहे, त्यासोबतच शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची फसवणूक सुध्दा संचालक करीत असल्याचे दिसून येत आहे.

लहान मुलांना घडविण्याकरीता जेवढे शिक्षणाचे महत्व आहे तेवढेच महत्व शारीरिक शिक्षणालाही आहे. मैदानी खेळांसोबत त्यांच्या अंगातील कला गुणांना वाव मिळावी यासाठी पालक आग्रही असतात. आदर्श इंग्लिश स्कूलमध्ये शिकत असलेल्या मुलांना शारीरिक शिक्षणाचा अभाव असल्याचे दिसत आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांना मैदानी खेळ खेळण्यासाठी मैदानच नाही. नियमानुसार प्रत्येक शाळेला मैदान असणे आवश्यक आहे. परंतु आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कुल केवळ दोन गुंठा जागेत बांधलेल्या बंदिस्त खोल्यांमध्ये सुरू आहे. दर्जावाढ मिळवितांना अध्यक्ष व संचालकांनी घाटपुरी शिवारातील ५५/२ गटांमधील शेत हे मैदानासाठी असल्याचे दाखविले आहे. जे की प्रत्यक्षात शाळेपासून तीन ते चार किलोमीटर दूर आहे.




किमान ६- ७ वर्षे जिल्ह्यात कार्यरत असलेले शिक्षणाधिकारी यांना खामगाव येथील आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कुलला एक गुंठा जागेवर पूर्वप्राथमिक, वर्ग १ ते ५ आणि वर्ग ६ ते १२ ह्या तीन मान्यता कश्या दिल्या ? याचा खुलासा होणे गरजेचे आहे. अवैध शाळेमुळे त्रस्त असलेल्या तक्रारकर्त्यांनी स्वतःच माहितीच्या अधिकारात कागदपत्रे मिळवून झालेल्या घोटाळ्याचे बिंग फोडले आहे. त्यामुळे आता चौकशी करण्याऐवजी थेट शासनाची फसववूक केल्याबद्दल संचालक मंडळविरुद्ध फौजदारी कारवाई करून आपला अधिकारीपणा सिद्ध करणे आवश्यक आहे.
शाळेला दर्जावाढ मान्यता किंव्हा मान्यता घेताना शाळेचा महसुली पुरावा आवश्यक आहे. शाळेचा एकही महसुली पुरावा नाही, म्हणून संचालक जागेचा दुहेरी लाभ घेण्यास प्रोत्साहन मिळत आहे दोन वर्षापासून तक्रार होत असून कार्यवाही न करण्यासाठी अधिकाऱ्यांना लाभ मिळत असावे.

आणि त्या ठिकाणीही कुठले प्रकारचे मैदान अस्तित्वात नाही उलट त्या जागेवर शेती केली जात आहे. आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कूलच्या अध्यक्ष यांनी शासनाची दिशाभूल करून या ठिकाणी मैदान दाखविले त्या ठिकाणी शेतीची उत्पन्न घेतले जाते. शेती उत्पन्ना सोबतच शासनाच्याकडून पिक विमा नुकसान भरपाई आदी लाभ घेतला जातो. शाळेच्या प्रवेश घेते वेळी पालकांना त्यांच्या मुलांना सर्व प्रकारचे मैदानी खेळ, आउटडोर, इनडोर गेम यामध्ये प्रशिक्षण दिल्या जाईल असे आश्वासन दिले जाते. मात्र प्रत्यक्षात शाळेची प्रार्थना सुद्धा एक बंद खोलीत केली जाते. १५ ऑगस्ट २६ जानेवारी सारखे राष्ट्रीय उत्सव एका बंद खोलीमध्ये साजरे केले जातात. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी कुठल्या प्रकारचे मैदान या ठिकाणी अस्तित्वात नाही. आता पालकांकडून संचालकांना प्रश्न विचारला जात आहे की शाळेचे मैदान आहे तरी कुठे? ध्वजारोहण करण्याकरीता सर्व मुलांना बंद खोलीतच उभे करून केवळ संचालक मुख्याध्यापक हे एकट्यामध्ये ध्वजारोहण करतात अशाप्रकारे तक्रारही पालकांकडून प्राप्त होत आहेत. त्यामुळे या संचालकांकडून पालकांची दिशाभूल करण्यात येत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांना सर्व प्रकारात प्रावीण्य प्राप्त असणे आवश्यक आहे. एखादा मुलगा अभ्यासात हुशार असतो तर एखादा मैदानी खेळात तर काही मुलांमध्ये कलागुणात ठासून भरलेले असतात त्यामुळे त्यांच्या कलागुणांना त्यांच्या योग्य प्रशिक्षण आणि वाव मिळण्यासाठी शाळांमध्ये सर्व सुविधा आवश्यक असतात. शासनाकडून यासाठी योग्य ते पाऊल उचलले जातात. सरकारी शाळांना सुद्धा प्रशस्त असे मैदान उपलब्ध करून दिले जाते. एखाद्या शाळेला मान्यता देतेवेळी मैदान असावे अशी अट शिक्षणविभागाकडून घातली जाते. दर्जावाढ मिळवण्यासाठी ज्यावेळेस प्रस्ताव सादर केला त्यावेळेस संचालकांनी ५५/२ गटातील मैदान




असल्याचे दाखविले आहे. त्यामुळे या जागेत मैदान निर्माण करणे आवश्यक होते. मात्र संचालकांनी दिशाभूल करून ५५/२ मध्ये मैदान असल्याचे दाखविले परंतु प्रत्यक्षात तिथे शेती केल्या जात असल्याचे दिसून येत आहे. आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कूलचे संचालक या जागेचा दुहेरी फायदा घेत असून शासनाची फसवणूक करीत आहेत. त्यामुळे आदर्श ज्ञानपीठ शाळेचे अध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापक यांच्यावर तहसीलदार आणि शिक्षणाधिकारी यांनी दखल घेऊन फौजदारी गुन्हे दाखल करावे अशी मागणी होत आहे.

# डोणगाव येथे पावसाचे तांडव; अर्धोभाग पाण्याखाली

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**डोणगाव दि.२६**

येथे दि. २६ जून ला सुरू झालेल्या पावसाने डोणगावात काच नदीचे पाणी घुसून पाणी विठ्ठल मंदिराच्या पायरीला लागून गावात घुसले यामध्ये अनेकांच्या घरात पाणी घुसल्याने अन्नधान्य पेरणीसाठी आणलेले बियाणे खते तसेच घरातील भांडे व अनेकांच्या गोठ्यातील पाईप ड्रिप वाहून गेल्याने डोणगावात पावसाने नुकसान केले.

तर राज्य महामार्गोवर असणाऱ्या पुलावर पाणी आल्याने सकाळी ११वाजतापासून मेहकर ते मालेगाव महामार्गावर असणारी वाहतूक बंद झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्या अनेक किलोमीटर अंतरावर पाहायला मिळत होत्या तर सकाळी आपल्या गोठयावर गेलेले गोविंद परमाळे व अनिल परमाळे राहुल परमाळे अकाश परमाळे व कावले हे पुराचे पाणी वाढल्याने झाडावर चढून जीव वाचविला. त्यांना वाचविण्यासाठी सायंकाळी ६वाजता बचाव पथक व तलाठी अमोल राठोड अनुप नरोटे तसेच डोणगाव ठाणेदार नदीच्या पलीकडे पोहोचले होते. पण वृत लिहीपर्यंत सदर लोक झाडावर अडकलेले होते.




शासनाने डोणगाव येथे घुसलेल्या पाण्यामुळे नागरीकांचे अतोनात नुकसान झाले अनेकांचे संसार वाऱ्यावर आले त्यामुळे कोणत्याही पंचनामा न करता सर्व डोणगाव वासियांना सरकट शासनाने मदत द्यावी.
**शैलेश सावजी**
**जिल्हा उपाध्यक्ष काँग्रेस बुलढाणा**

# शेंदुर्जन व परिसरात दमदार पावसाची हजेरी : शेतकरी राजा आनंदित!

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**शेंदुर्जन दि.२६**

शेंदुर्जन व सिंदखेडराजा तालुक्यात २५ जून रोजी संध्याकाळी चार वाजेपासून पावसाने हजेरी लावलेली असून हा पाऊस कमी जास्त वेगाने आज २६ जून पर्यंत दिवसभर सुरूच असल्याने, शेतकऱ्याचे समाधान झाले असून शेतकरी वर्ग हा आनंदित दिसून येत आहे. पेरणी झाल्यापासून पाऊस पडत नसल्याने , शेतकरी वर्ग हा सारखी पावसाची वाट पाहत होता.

दुबारा पेरणीची वेळ शेतकऱ्यावर येते की काय अशी परिस्थिती तयार झाली होती. हा पाऊस पडल्याने शेतकऱ्याला पैशाचा पाऊस पडल्यासारखी झाले आहे. या पावसाने नदी नाले तुटुंब भरून वाहू लागले.




शेतामध्ये जिकडे पाहावे तिकडे पाणीच पाणी दिसत आहे. हा पाऊस रात्रभर मुरवणी व व २६ जूनला दिवसभर धडाकेबाज पडल्यामुळे गावातील घाण किरकचरा सर्व वाहून गेले आहे. धडाकेबाज पावसामुळे गाव परिसर स्वच्छ झाला आहे. ''गावांमधील विद्युत पुरवठा खंडित''या पावसामुळे २५ जून रोजीच्या रात्रीपासून विद्युत पुरवठा खंडित झालेला आहे. अति पावसामुळे गावाजवळील असलेल्या शेतातील विद्युत पोल पडल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झालेला आहे. हा विद्युत पुरवठा कधी सुरळीत होईल हे सांगता येत नाही. ,''जिओ नेटवर्क विस्कळीत''विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे जिओ या कंपनीचे नेटवर्क सकाळपासून बंद आहे त्याामुळे ग्राहकांमध्ये कमालीची नाराजी दिसून येत आहे. यामुळे ग्रामस्थांचे बाहेर गावाशी संपर्क तुटले आहे.

झालेल्या त्रासामुळे जिओ कंपनीवर ग्राहकांनी मोठ्या प्रमणावर नाराजी दर्शवली आहे. ,''शाळकरी मुलांचे हाल ही हाल''शेंदुर्जन येथून पहिल्या वर्गापासून ते बारावी पर्यंत शिक्षण घेण्याकरिता सुलतानपूर येथील डॉ. आ.एन. लाहोटी. सी बी एस सी या शाळेमध्ये स्कूल बसणे येणे जाणे करतात, परंतु ह्या पावसामुळे नद्यांना पूर आल्यामुळे चिमुकल्या व इतर विद्यार्थ्यांना सहा ते सात घंटे थंडीचे ताटकळत बसावे लागले. काही पालकांनी इतर मार्गाने जाऊन आपल्या चिमुकल्यांना घरी परत आणावे लागले. तरी व्यवस्थापनाने प्रसंगावधान राहून, व समय सुचकता बाळगून इतर मार्गाने विद्यार्थ्यांना घरी पोहोचण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी पालक वर्गाची मगणी होत आहे.

# मेहकरमध्ये संततधार पावसामुळे पूरस्थिती

## आ. सिद्धार्थ खरात यांनी केली पाहणी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**मेहकर दि.२६**

मेहकर व लोणार तालुक्यात झालेल्या संततधार पावसामुळे संपूर्ण परिसरात जनजीवन विस्कळीत झाले आहे. मेहकरच्या अनेक भागांमध्ये पूरस्थिती उद्भवली आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज पूरग्रस्त भागात जाऊन पाहणी केली. शहरात ठिकठिकाणी पाणी साचले असून तिथेही आमदार सिद्धार्थ खरात यांनी भेट दिली.

मेहकर शहरात नाल्यांची साफसफाई न झाल्याने रस्त्यांवर व घरांमध्ये पाणी साचले असून नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मेहकर-लोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज सकाळपासून शहराच्या विविध भागांमध्ये भर पावसात पाहणी केली. मुख्य रस्ते, बाजारपेठा, गल्लीबोळ, इमामवाडा चौक, रामनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, माळीपुरा, सावजी गल्ली या भागांतील पाणी साचलेले रस्ते, तुडुंब भरलेल्या नाल्या व नागरिकांची हालअपेष्टा त्यांनी जवळून पाहिल्या. मेहकर शहरातील एकमेव मुख्य रस्त्यावर दवाखाने, शाळा, मंदिर व कापड दुकाने असल्याने नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. मात्र रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याने पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांच्या घरात पाणी घुसल्यामुळे घरगुती वस्तूंचे नुकसान झाले असून, आरोग्य धोक्यात आले आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. यासोबतच दुर्गंधीमुळे परिसरात अस्वच्छतेचं वातावरण पसरलं आहे. संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेत आमदार सिद्धार्थ खरात यांनी मुख्याधिकारी रामराजे कापरे यांना तत्काळ बोलावून घेतले व नगरपालिकेला तातडीने पावसाचे साचलेले पाणी काढण्याचे तसेच गटारींची सफाई करण्याचे निर्देश दिले. त्यांनी स्थानिक प्रशासनाकडे नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्याची मागणी केली आहे.

या पाहणी दौऱ्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख किशोर गारोळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष निसारभाई अन्सारी, काँग्रेस सेवादलाचे उपाध्यक्ष शैलेश बावस्कर,ॲड. संदीप गवई, योगेश कंकाळ, सद्दाम कुरेशी, निलेश बावस्कर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



**साफसफाईचा अभाव**
पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई न झाल्याने ही परिस्थिती उद्भवली.यामधून प्रशासनाने योग्य धडा घ्यावा आणि तातडीने उपाययोजना करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

# सोमय्यांनी घेतली जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट

## बुलडाण्यातून भोंगा मुक्त महाराष्ट्र अभियान सुरू - किरीट सोमय्या

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**बुलडाणा दि.२६**

राज्यासह बुलढाणा जिल्ह्यात बांगलादेशी नागरिक वास्तव्यास असल्याचा संशय असल्याने भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आज बुलडाणा जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतली.बांगलादेशी घुसखोरांना हाकलण्यात यावे, भोंगा मुक्त मुंबई झाल्यानंतर आजपासून बुलढाण्यातून भोंगा मुक्त महाराष्ट्र अभियानाला सुरुवात केली आहे असे सोमय्या म्हणाले. मुंबई पोलिसांनी मज्जीद वरचे भोंगे उतरवले त्याच पद्धतीने बुलढाणा जिल्ह्यासह राज्यातील भोंगे उतरण्याची मोहीम करावी या संदर्भात पोलीस अधीक्षकांकडे त्यांनी मागणी केली आहे.



भाजप नेते किरीट सोमय्या आज बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे व कार्यकर्त्यांसह त्यांनी आज जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. बांगलादेशी, रोहिंग्या यांना बेकायदेशीर रित्याा दिलेले प्रमाणपत्र परत घ्यावे, बुलढाण्यात नायब तहसीलदारांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे ३०० प्रमाणपत्र दिले आहेत, ते रद्द करण्यासंदर्भात बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली.

यावेळी जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. मत्रालयाच्या आदेशानंतर देखील १३०० प्रमाणपत्र परत घेण्यात आले नाहीत. असा मुद्दा सोमय्या यांनी जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्यापुढे उपस्थित केला होता. जिल्हाधिकारी कार्यालय आणि त्यानंतर त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक तांबे यांच्याशी चर्चा केली.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

शुक्रवार, दि. २७ जून २०२५

## थोडक्यात

### दारूच्या नशेत शिवीगाळ; परस्परांविरोधी तक्रार

**चांदूर रेल्वे :** शहरातील राजीव गांधी नगर येथे दारूच्या नशेत एकाने कारण नसताना वृद्धाला शिवीगाळ करीत लोखंडी सळाखीने मारहाण करीत जखमी केले. याबाबत जखमी बायसन्या सनातन भोसले (६०) याने दिलेल्या तक्रारीवरून राहुल सुंभर भोसले (२६) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला, तर युवकाने दिलेल्या परस्पर विरोधी तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी बायसन्या सनातन भोसले, सुंबर सनातन भोसले (५५), ओमकार मल्हारी पवार (२०) व एक महिला यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. पोलिसांनी चौघांना अटक केली.

### जीवे मारण्याची धमकी देत एकाला मारहाण

**मोर्शी :** तालुक्यातील नशीरपूर येथे दारूच्या नशेत एक परिचित फिर्यादी, पुरुषोत्तम श्रीराम महाकाळे (५४) यांच्या पत्नीला शिवीगाळ करीत होता. त्याला त्याबाबत हटकले असता, त्याने काठीने फिर्यादीला मारहाण केली. शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. मोर्शी पोलिसांनी प्राप्त फिर्यादीवरून विनोद रामदास गावंडे (५०) याच्याविरुद्ध ११८(१), ३५२, ३५१(२) (३) अन्वये गुन्हा दाखल केला.

### एकावर चाकूने, तर दुसऱ्यावर विटेने हल्ला

**धामणगाव रेल्वे :** दहा वर्षीय पुतण्याला त्रास देणाऱ्या युवकाला हटकले. या कारणावरून दोघांनी ३० वर्षीय युवकावर चाकूने, तर त्याच्या नात्यातीलच एका भावावर विटेने हल्ला करीत जखमी केले. ही घटना मंगरुळ दस्तगीर येथील टोकरीपुरा चौकात घडली. याबाबत प्रेमदास दादाराव नवरंग (३०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी अंकुश किशोर राऊत (३०) व किशोर लक्ष्मण राऊत (६०) यांच्याविरुद्ध दुखापतीचा गुन्हा दाखल केला.

### शेतात जनावरे चारण्यावरून वाद; एकाला मारहाण

**खल्लार :** लागवडीने केलेल्या शेताची अपंग युवक रखवाली करीत होता. दरम्यान गावातीलच एकाने आपली जनावरे युवकाच्या शेतात चारण्यास सोडली. त्यावरून उद्भवलेल्या वादात चेतन सुधाकर नांदणे (२ (२८), सुधाकर भीमरावजी नांदणे (५५) व एक महिला तिघेही रा. वडुरा यांनी अपंग गोपाल हरीदास आमझरे याला मारहाण करीत जखमी केले. याबाबत राजकन्या हरीदास आमझरे (५६) यांनी खाल्लार पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी विविध कलमान्वये तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### सावनेर शिवारातून झटका बॅटरी लंपास

**नांदगाव खंडेश्वर :** सावनेर शिवारात असलेल्या एका शेतातून अज्ञाताने वन्य प्राण्यांपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी लावलेली झटका बॅटरी चोरून नेली. याबाबत हरीदास नामदेवरावजी राजगीरे (४७, रा. सावनेर) यांनी नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध ३०३(२) कलमान्वये गुन्हा नोंदवला.

### कपाटातून चोरून नेला सोन्याचा गोफ व लॉकेट

**तिवसा :** घरातील कपाटातून ६५ हजार ६४४ रुपये किंमतीचा सोन्याचा गोफव लॉकेट चोरीला गेले. ते परिचित असलेल्या वेदांत उर्फ भैय्या गजानन बाहे (३६, रा. धामंत्री) याने चोरून नेले असावा, असा संशय फिर्यादीने व्यक्त केला. याबाबत विजय सदाशिव करडे (५२, रा, तिवसा) यांनी तिवसा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी ३०५ (अ) अंतर्गत संशयाच्या आधारे युवकावर गुन्हा दाखल केला.

### चारित्र्यावर संशय घेत विवाहितेचा छळ

**तिवसा :** शहरातील ३२ वर्षीय युवतीचे अहमदाबाद, गुजरात येथील मुकेश दिगांबर दवाडे (४१) याच्याशी लग्न झाले. मात्र, तिच्या चारित्र्यावर संशय घेत पतीसह सासरची मंडळी तिला मारहाण करीत शारीरिक व मानसिक छळ करतात.

# भारताचे संविधान हेच सर्वोच्च -सरन्यायाधीश भूषण गवई

## अमरावती जिल्हा वकील संघातर्फे सरन्यायाधीश गवई यांचा सत्कार





अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान दिलं आणि त्या संविधानाचे जे मूल्य आहेत, त्या मूल्यानुसार कार्य करण्याचा प्रयत्न आजपर्यंत केला आहे. सर्वोच्च कोण, याबाबत नेहमी वाद होत असतो. काहीजण संसद सर्वोच्च आहे असे म्हणतात, पण खऱ्या अर्थाने कायदेमंडळ, न्यायपालिका, कार्यपालिका नव्हे तर केवळ भारताचे संविधान हेच सर्वोच्च आहे. असे मत देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केले. अमरावती जिल्हा वकील संघातर्फे पी.आर.पोटे पाटील एज्युकेशन ग्रुपच्या स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सांबरे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून माजी सरन्यायाधीश न्या.एन. व्ही.रमणा, न्या.अनिल किलोर, न्या. प्रवीण पाटील, अमरावती जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लागड्डा, डॉ.कमलताई गवई, डॉ.तेजस्विनी गवई उपस्थित होत्या. व्यासपीठावर ॲड.आशिष देशमुख, ॲड. पारीजात पांडे, ॲड.सुनील देशमुख, ॲड.अमोल भुरळ उपस्थित होते.

सरन्यायाधीश गवई पुढे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेला अभिप्रेत असलेल्या आर्थिक, सामाजिक न्यायाच्याप्रती या देशाची जी संविधानिक मूल्ये समता, समानता आणि बंधुत्व



याप्रती माझी बांधिलकी राहील. माझ्या हातून अमरावतीकरांना अभिमान वाटेल असेच कार्य होईल, असा आशीर्वाद द्या अशी विनंती सरन्यायाधीश गवई यांनी यावेळी केली. सर्वांचा मी ऋणी आहे, परंतु याप्रसंगी आपले आभार मानणार नाही. कारण आभार मानायचे कोणाचे? आभार दुसऱ्याचे मानायचे असतात, आपण तर आपलेच आहोत ह्याच मातीतले आहोत. आपण सगळे अंबानगरीचे पुत्र आहोत. अंबानगरीने आज जो प्रेमाचा वर्षाव केलेला आहे, त्या वर्षावात मी भिजून राहू इच्छितो आणि याप्रसंगी फक्त आपल्याकडून एक आशीर्वाद मागू इच्छितो, की यापुढे जो माझा कालखंड हा न्यायदानाचा राहील तोही कालखंड आतापर्यंत जो २२ वर्षाचा गेला त्याचप्रमाणे माझ्या हातून सेवा व्हावी असे सांगत त्यांनी आभाराचे भार कशाला, सत्काराचे हार कशाला, राहू द्या एकमेकांच्या मनात, त्या घरट्याला दार कशाला या कवितेच्या ओळींनी आपल्या भाषणाची सांगता केली. तत्पूर्वी आयोजकांतर्फे सरन्यायाधीश भूषण गवई यांची रक्ततुला करण्यात आली. त्यानंतर जिल्हा वकील संघातर्फे ॲड. सुनील देशमुख यांच्यासह कार्यकारिणीने सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, दादासाहेब गवई यांचा अर्धाकृती पुतळा, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार केला.

यावेळी त्यांच्या मातोश्री डॉ.कमलताई गवई व अर्धांगिनी डॉ.तेजस्विनी गवई यांचासुद्धा सन्मानचिन्ह व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. सुनील देशमुख संचालन ॲड. परीक्षित गणोरकर, ॲड.चिखले आभार ॲड.अमोल भूरळ यांनी मानले. कार्यक्रमाला माजी आमदार बी.टी.देशमुख, खासदार बळवंत वानखडे, आ.सुलभा खोडके, आ.संजय खोडके, आ.रवी राणा, माजीमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजीमंत्री हर्षवर्धन देशमुख, माजीमंत्री प्रवीण पोटे, माजी खासदार अनंत गुढे यांच्यासह राज्यभरातील न्यायिक अधिकारी तसेच प्रशासनातील सर्वच प्रमुख अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संविधानाचे पुरस्कर्ते – न्या.सांबरे

सत्कारमूर्ती सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कौटुंबिक सोहळ्यात अथांग जनसागर जमला आहे. त्यांना अनेकांनी संधीचं सोनं करून देण्यासाठी हातभार लावला आहे. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर सरन्यायाधीश प्रसिद्धीस आले आहेत. ते संविधानाचे पूर्णरूप पुरस्कर्ते आहेत. न्यायमूर्ती गवई हे पूर्णतः एक संस्था आहेत. त्यांनी जे न्यायनिवाडे दिले त्यामुळे सर्व न्यायाधीशांची हिम्मत द्विगुणित करणारी असल्याचे प्रतिपादन सत्कार समारंभाचे अध्यक्ष उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सांबरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.

# तांदूळ चोरी प्रकरणातील फरार आरोपीला अटक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** ट्रकचालकाला जबरदस्तीने अपहृत करून २७ टन तांदूळ लुटणाऱ्या टोळीतील फरार आरोपी अकील अहेमद जमिल अहेमद (३२, रा. भुरकापूर, अमरावती) याला गुन्हे शाखा युनिट क्रमांक-१ च्या पथकाने बुधवारी (दि. २५) अटक केली असून, त्यास नांदगाव पेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. रविवारी (दि. २२) ट्रक चालक निजामोद्दीन मोहम्मद सईद (५४, रा. जळगाव) हे एमएच-२०-ईजी-२६३९ क्रमांकाच्या ट्रकमधून २७ टन तांदूळ घेऊन गोंदिया येथे जात असताना, अमरावतीतील रिंगरोडवरील सेलीब्रेशन लॉनजवळ



चार अज्ञात व्यक्तींनी त्यांचा पाठलाग करून ट्रक थांबवला. त्यांना ट्रकबाहेर उतरवून जबरदस्तीने मारहाण करण्यात आली. त्यानंतर डोळ्यावर पट्टी बांधून दुसऱ्या वाहनात चार तास फिरवून, त्यांचा ट्रक व त्यातील तांदूळ दुसऱ्या ट्रकमध्ये भरून चोरून नेण्यात आला. चोरी गेलेल्या तांदळाची अंदाजे किंमत ७ लाख इतकी असून, ट्रकसह चालकाला निर्जनस्थळी सोडण्यात आले होते. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी अजमत खान करामत खान (रा. रहमत नगर) आणि शेख इमरान शेख रहमान (रा. हबीब नगर नं. २) यांना पोलिसांनी मंगळवारी (दि. २४) अटक करून त्यांच्याकडून ट्रक व संपूर्ण तांदूळ जप्त केला होता. गुरुवारी या गुन्ह्यातील तिसरा आरोपी अकील अहेमद जमिल अहेमद याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून; त्याला पुढील चौकशीसाठी नांदगाव पेठ पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

# डॉ. पंजाबराव देशमुख कॉलेज ऑफ लॉ येथे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार सोहळा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ. पंजाबराव देशमुख कॉलेज ऑफ लॉ येथे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा आज सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

खासदार बळवंत वानखडे, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विजय आचलिया, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यावेळी उपस्थित होते. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई म्हणाले, मी 'डॉ. पंजाबराव देशमुख कॉलेज ऑफ लॉ'चा विद्यार्थी आहे. न्यायिक शिक्षणाबाबत मला महाविद्यालय कडून बाळकडू मिळाले. मी या महाविद्यालयाच्या ऋणी आहे. येत्या काळातही माझ्या हातून संविधानाच्या चौकटीत राहून न्यायदानाचे कार्य सुरू राहील व




यातून देशाची सेवा करीत राहील. न्यायदानाचे कार्य करणाऱ्या प्रत्येकाने सदसद विवेक बुद्धीने न्यायदानाचे कार्य करावे. येथील विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यात वंचितांना न्याय मिळवून देण्याची आपल्या पदाचा उपयोग करावा. हा सत्कार सोहळा माझ्या महाविद्यालयात होत असल्यामुळे मला हा कौटुंबिक सोहळा वाटत असल्याचे ते यावेळी म्हणाले उच्च न्यायालयाचे न्या. श्री. आचलिया,तसेच संस्थेचे अध्यक्ष देशमुख यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेच्या वतीने सरन्यायाधीश न्या. गवई यांना सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्राचार्य वर्षा देशमुख यांनी तर आभार प्राची कडू यांनी मानले.



# प्रशासन व लोकप्रतिनिधीमध्ये रस्ता कामाबाबत कमालीची उदासीनता

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २६ –** शहरातील डॉ.पंजाबराव देशमुख कॉलनी परिसर व त्या सोबतच शिवर रोड धान्य बाजार मार्ग, डॉ.साबळे हॉस्पिटल मार्ग, डॉ.कट्टा हॉस्पिटल मार्ग, डॉ.म्हाला हॉस्पीटल मार्ग आणि कोकाटे कॉम्प्लेक्स मार्ग व ईतर सहरस्त्यांची प्रदीर्घ काळापासून अत्यंत दयनीय अवस्था निर्माण झाली आहे. या रस्त्याच्या अतिगंभीर बाबींकडे अद्यापही नगरपरिषद विभाग व लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक यांचे लक्ष वेधले गेले नसल्याने गेल्या वीस वर्षापासून या परिसरातील रस्त्यांच्या समस्या जैसे थेच आहेत. दोन महिन्यांपूर्वी सामाजिक कार्यकर्ते ओम राणे या युवकाने ठिक-ठिकाणच्या दुर्लक्षित रस्त्याबाबत निवेदने दिली होती त्याला दाद न मिळाल्याने अखेर ओम राणे याने मंगळवार (दि.२४) पासून हिंगणी रस्ता आदर्श शाळेच्या मागील गेट जवळ उपोषण मंडप उभारला असून आमरण उपोषणाला सुरु आहे. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी परिसरातील पुरुष व महिलांनी सुद्धा उपोषण स्थळी भेट देऊन लेखी स्वरूपात पाठिंबा दर्शवित आहे. तसेच आगामी निवडणुकीत आम्ही धडा शिकवणार असल्याचे मत व्यक्त करीत आहे.

# तुझ्याविना आम्ही जिवंत राहू शकत नाही...

## मृत आदर्श साहूच्या पत्नी ज्युलीनेही केली आत्महत्या

मसानगंज येथील रहिवासी आदर्श गुप्ता या युवकाची हत्या चार महिनेपूर्वी झाली होती. काल बुधवारच्या रात्री त्याची पत्नी ज्युली ऊर्फ ईशिका गुप्ता (वय २३) हिने घरात गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी तिने सुसाइड नोट लिहिली असून ती पोलिसांना मिळाली आहे. त्या चिठ्ठीत तिने लिहिले की, 'तुझ्याविना आम्ही जिवंत राहू शकत नाही, तुला विसरूही शकत नाही. आई-बाबा, माफ करा... त्याच्याविना जीवन अपूर्ण आहे.' ही चिठ्ठी वाचून कुटुंबातील सदस्य आणि वाचकांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. सध्या संपूर्ण कुटुंब दुःखात बुडाले आहे. या प्रकरणी आदर्शचे काका दिनेश कन्हैय्यालाल गुप्ता (वय ४६) यांनी आज गुरुवारी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांनी तक्रारीत म्हटले आहे की, चार महिनेपूर्वी भाची आदर्शची हत्या झाली होती, त्यानंतर ज्युली तीव्र नैराश्यात होती. ती कोणाशी बोलतही नव्हती. काल रात्री त्यांचा मुलगा संस्कार याचा फोन आला की ज्युली भाभीने आत्महत्या केली आहे. त्यांच्या भावजयी पिंकी राजेश गुप्ता यांनी सांगितले की, ज्युली घराच्या वरच्या मजल्यावरील बेडरुममध्ये गेली होती. खूप वेळ झाला तरी ती बाहेर आली नाही म्हणून त्यांनी आवाज दिला. पण प्रतिसाद न आल्यामुळे त्यांनी खिडकीतून पाहिले असता ज्युलीने सीलिंग फॅनला गळफास लावलेला होता. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.



**चार महिन्यांपूर्वी आदर्शची झाली होती हत्या**



### राजर्षी शाहू महाराजांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**अमरावती, दि. २६ :** छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणेज यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, अधिक्षक निलेश खटके यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# चाकू दाखवून १३.८ लाख रुपये लुटले

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**मोर्शी, दि. २६ :** एका फायनान्स कंपनीची रक्कम बँकेत भरायला जाणाऱ्या बँकेच्या दोन कर्मचाऱ्यांना दि.२५ ला दुपारी ३ वाजताचे दरम्यान चाकू दाखवून १३ लाख ८ हजार ७२० रुपये लुटून नेल्याची घटना शहरात घडली. लागोपाठ घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शहरातील कॉलनी परिसरात क्रेडिट ॲसेस मायक्रो ग्रामीण प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी असून यामध्ये ग्रामीण भागातील गटाचे पैसे वसूल करतात व त्यांचेकडे आलेली रक्कम मोर्शीच्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत जमा करतात. नेहमीप्रमाणे बँकेतील कर्मचारी शुभम गुणवंत म्हस्के वय २५ वर्ष व सुंदर शालीकराम धिकार वय २८ वर्ष हे दोघेजण एम एच २७ डी डी ५०४१ या दुचाकीने अंदाजे दुपारी ३ चे दरम्यान क्रेडिट एसेस मायक्रो ग्रामीण प्रायव्हेट लिमिटेड येथील १३ लाख ८ हजार ७२० रुपये मोर्शीच्या भारतीय स्टेट बँकमध्ये जमा करण्यासाठी नेत होते.

दरम्यान मुख्य रस्त्यावर असलेल्या सेन्ट्रल बँकेसमोर मागून आलेल्या पल्सर गाडीवरील एकाने त्यांच्या दुचाकीला धक्का देऊन पाडले व ते पडल्यानंतर त्यांना चाकू दाखवून त्यांच्या गाडीची चाबी व पैशाची बॅग घेऊन पलायन केले. यामध्ये दि.२४ व २५ जूनची जमा केलेली रक्कम असल्याचे समजते.या अगोदर शहरात १८ जून रोजी क्राईम ब्रँच पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून दोन अज्ञात चोरट्यांनी श्यामसुंदर राधाकिसन बंग यांची सोन्याची अंगठी व गोफ असा दोन लाखाचा ऐवज हात सफाईने लंपास केल्याची घटना घडली होती.









अमरावती : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई अमरावती विमानतळावरून छत्रपती संभाजीनगर कडे रवाना होताना विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, जिल्हाधिकारी आशिष येरेवर, पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी त्यांना निरोप दिला.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

शुक्रवार, दि. २७ जून २०२५



## थोडक्यात

### महिलेच्या बॅगमधून पर्स लंपास

**अमरावती :** खरेदी करण्यासाठी गेलेल्या महिलेच्या पर्समधून रोख रक्कम व सोन्याचे दागिने असलेले पर्स अज्ञाने चोरून नेली. चोरट्याने रोख ४ हजार ७०० रुपयांसह २९ हजारांचे दागिने, असा एकूण ३३ हजार ७०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना वलगाव मागीवरील एका हॉस्पिटलसमोर घडली. या प्रकरणी महिलेने दिलेल्या तक्रारीवरून नागपूरी गेट पोलिसांनी अज्ञात बुरखाधारी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### विवाहितेचा छळ, पतीसह चौघांविरूध्द गुन्हा दाखल

**अमरावती :** पाच वर्षांपूर्वी विवाहितेचा धामणगाव रेल्वे येथे रितीरिवाजाप्रमाणे विवाह झाला. परंतु, सुरूवातीपासूनच पतीसह सासरच्यांनी तुला संस्कार नाही, असे म्हणत तिचा छळ करणे सुरू केले. इतकेच नव्हे, तर तिला नांदायचे नाही, असे म्हणत पतीसह सासरच्यांनी तिला माहेरी आणून दिले. या सर्व प्रकाराने त्रस्त विवाहितेने गाडगेनगर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी पतीसह सासरच्या चार जणांविरुद्ध ४९८ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### खाद्य पदार्थ विक्रेत्यावर कारवाई

**अमरावती :** खाद्य पदार्थाची चारचाकी हातगाडी विक्रेत्याने रस्त्यावर लावल्याने रहदारीस अडथळा निर्माण झाला. याची दखल घेत फ्रेजरपुरा पोलिसांनी अमीर खान गौस खान (३६) याच्याविरुद्ध २८५ कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. ही घटना भातकुली तहसील कार्यालयासमोर घडली.

### वीज मिटरमध्ये केली छेडछाड

**अमरावती :** वीज मीटरमध्ये अनधिकृतरित्या छेडछाड करीत १ हजार ८५० रुपयांची वीज चोरी केली. ही बाब वीज चारी पकडणे मोहिमेंतर्गत माडी रोडवरील इंदला नाका, राजुरा येथे उघडकीस आली. या प्रकरणी महावितरणच्या रहाटगाव शाखेचे अभियंता राहल माणिकराव सांभारे यांनी बडनेरा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी महिलेविरुद्ध भारतीय वील कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

### अवैध देशी दारू विक्रेत्यावर कारवाई

**अमरावती :** टाकरखेडा संभू येथे अजीम शाह कलीम शाह (३८) हा अवैधरित्या देशी दारूची विक्री करती असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. वलगाव पोलिसांनी धाड टाकून त्याला ताब्यात घोले. त्याच्या जवळून एकूण ४९० रुपयांची देशी दारू जप्त करीत त्याच्यावर दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

### क्षुल्लक कारणावरून युवकाला मारहाण

**अमरावती :** तक्षशिला महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईलवर गेम खेळणाऱ्या युवकाला तेथे आलेल्या दोघांनी क्षुल्लक कारणावरून वाद घालत मारहाण करीत जखमी केले. या प्रकरणी जखमी निहाल मुकेश तिरथकर (२७) याने फ्रेजरपुरा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मारहाण करणाऱ्या दोघांविरुद्ध ११८ (१), ३ (५) अन्वये गुन्हा नोंद केला.

### तहसील कार्यालय परिसरात युवकाला मारहाण

**अमरावती :** जुन्या तहसील कार्यालय परिसरात कामावरून परत येताना आंबे घेण्यासाठी थांबलेल्या युवकाला दुचाकीवरून आलेल्या तिघांनी तुला दिसत नाही का, असे म्हणत लाथाबुक्क्यांनी व लोखंडी पाईपने मारहाण करीत जखमी केले. याबाबत अब्दुल रज्जाक अब्दुल सत्तार (३२, रा. अलीम नगर) याने कोतवाली पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी तिघांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला.

---

अंतर्गत रस्त्यांची अवस्था झाली दयनीय; महापालिकेच्या ठेकेदारांची मनमानी

# ‘सुपर’च्या मागे केरकचऱ्याचे डम्पिंग!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** अमरावती महानगरपालिकेच्या मुख्य रस्त्यांना वगळता शहरातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. त्याचप्रमाणे शहरातील स्वच्छतेच्या बाबतीतही सारखी परिस्थिती दिसून येते. प्रत्येक वॉर्डातील गल्लूया आणि चौक कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी भरलेले आहेत. विशेष म्हणजे, सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या मागील बाजूस शहरातील कचऱ्याचा मोठा ढीग टाकण्यात आला आहे. पाहणीअंती असे लक्षात आले की, हा भाग महापालिकेच्या ठेकेदारांनी कचरा टाकण्याचा डंपिंग झोन बनविला आहे. अशीच परिस्थिती जिल्हा स्त्री रुग्णालयाकडे जाणा ?्या मार्गावरही दिसून येते. या रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापासून सुपर स्पेशालिटी रुग्णालयापर्यंतचा रस्ता

खड्यांनी भरलेला आहे. या रस्त्यावरून प्रसूतीसाठी किंवा अन्य उपचारासाठी येणाऱ्या महिलांची आणि रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. खाजगी वाहनांपासून ते रुग्णवाहिकांमधून येणा ?्या रुग्णांचीही अवस्था या खराब रस्त्यांमुळे बिकट बनली

आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या लागून ठिकठिकाणी



पडलेला कचरा आणि त्यातून येणारी दुर्गंधी यामुळे रुग्ण तसेच त्यांच्या सोबत येणारे परिजन आणि नागरिक परेशान आहे. शहराच्या मध्यवती भागातले रुग्णालयाला लागून ही अवस्था असेल, तर शहराच्या इतर भागांची काय अवस्था असेल याची कल्पनाच न केलेली बरी. महानगरपालिका प्रशासन स्वच्छतेच्या बाबतीत पूर्णतः उदासीन असल्याचे चित्र आहे. पावसाळा अजून नीट सुरु झालेला नाही. परंतु, एकदा पावसाला सुरुवात झाली की, शहरात जलजन्य आजारांचा फैलाव होण्यास वेळ लागणार नाही. महानगरपालिकेची ही उदासीनता निश्चितच चिंताजनक आहे.

> रोज शेकडो रुग्ण उपचारासाठी जिल्हा स्त्री आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालयात येतात. या मार्गाची अवस्था फारच वाईट आहे. रुग्णालयाच्या परिसरात ठिकठिकाणी साचलेला कचरा आणि दुर्गंधी यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.
>
> **पंकज वानखडे,**
> **रुग्ण नातेवाईक, अमरावती**

---

## रुख्मिणी नगर प्रभागात आ.सौ. सुलभा खोडके यांनी लावला विकास कामांचा धडाका

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** निवडणुकीपुरता पक्ष असतो व राजकारण असते. नंतर ज्या लोकांनी आपल्याला निवडून दिले त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणे हे एक लोकप्रतिनिधी मी,म्हणून आपले कर्तव्यच असते. निवडणुकीपूर्व काळात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी एक विकास कामांचा कृती आराखडा घेऊन आपण विकास कामांची शृंखला सुरु केली आहे. जनतेच्या अपेक्षेनुरूप विकास कामांची पूर्तता करण्यावर आपला भर असून शहरात विकासाचे चक्र गतिमान करण्यासाठी सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले.

रुख्मिणी नगर -प्रशांत नगर भागात आ.सौ. सुलभाताई संजय



खोडके यांनी विकासकामांचा धडाका लावला आहे. दिनांक २५ जून रोजी स्थानिक भागातील सहा ठिकाणी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी पायाभूत सुविधांच्या विकसकामांचे भूमिपूजन करून कार्यारंभ केला. सर्वप्रथम वनराई कार्यालय येथील कॉंक्रीट रस्त्याचे बांधकामाचे भूमिपूजन आमदार खोडके यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनतर राजेंद्र कॉलनी ते प्रशांत नगर पुलापर्यंत रस्ता डांबरीकरण, श्याम नगर येथील नालीचे बांधकाम,डाखे ते अंबुलकर यांच्या घरापर्यंत पेव्हिंग ब्लॉक, इखेवाडी जवळ रस्त्याच्या बाजूला पेव्हिंग ब्लॉक ,लहानुजी नगर येथील रस्त्याचे बांधकाम अशा विविध पायाभूत सुविधांच्या कामांच्या ठिकाणी कुदळ मारीत आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी भूमिपूजनाची औपचारिकता साधली. यावेळी स्थानिक नागरिकांनी आ.सौ. सुलर्भा खोडके यांना स्थानिक भागातील विविध समस्यांबाबत अवगत केले. स्थानिक भागात साफसफाई, विद्युत पुरवठा वारंवार खंडित होणे , रस्ते नाल्यांची दुर्दशा अशा समस्या आहेत. याचे निराकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी निवेदनाद्वारे केली.

### जि.प.शाळा उदखेड येथे शैक्षणिक प्रवेश उत्साहात

**अंजनगाव बारी :** आज दिनांक २३ जून २०२५ रोजी जि.प.प्राथ शाळा उदखेड येथे शैक्षणिक सत्र २०२५- २६ च्या शाळा शुभारंभ दिनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य देऊन स्वागत करण्यात आले तसेच सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके व बूट व इतर साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा वनिता सोळंके , सरपंच्या शैलजा खंडार ग्रामपंचायत सदस्य प्रकाश भोयर, पोलीस पाटील प्रतिभा पाटील तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते विद्यार्थ्यांना गोड पदार्थासह मिष्ठांन भोजन देण्यात आले. अशा प्रकारे शाळा शुभारंभ दिनाचा कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

## शिराळा येथे कृषिकन्यांद्वारा बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला संलग्न पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अंतिम वर्षातील विद्यार्थीद्वारे शिराळा येथे दि. १३ जून रोजी सोयाबीन बीज प्रक्रिया कृती प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील कृषिकन्यांनी सोयाबीन बियाणे पेरणपूर्व शिफारसीनुसार रासायनिक, बुरशीनाशक कीटकनाशक व जैविकखतांची बीज प्रक्रिया कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखविले तसेच बीज प्रक्रिया विषयी उपस्थित शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसनदेखील केले. सदर प्रात्यक्षिका दरम्यान सोयाबीन बियाण्यास रासायनिक



बुरशीनाशक, कीटकनाशक तसेच जैविक बुरशीनाशक व जैविक खतांची बीज प्रक्रियेचा क्रम, बीज प्रक्रिया करताना व पेरणीवेळी घ्यायची काळजी, बीज प्रक्रियेचे पीक उत्पादन वाढीच्या व पीक संरक्षणाच्या दृष्टिने होणारे फायदे यासंदर्भात तांत्रिक मार्गदर्शन पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थिनीने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषीकन्या साक्षी धुमाळे, ईशा घरडे, सुहानी शिरभाते, कृपाली सोनकुसळे, श्रुती मालेकर यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमासाठी शिराळा येथील शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रम अंतर्गत पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे व उप. प्राचार्य नितेश चौधरी, कार्यक्रम समन्वयक प्रा. श्वेता देशमुख व कार्यक्रम अधिकारी डॉ. अदिती रजाने व वनस्पती रोगशास्त्र विभागाचे प्रा. राहुल काळसकर यांचे मार्गदर्शन लाभले.

---



## शाळेच्या प्रवेशोत्सवात विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**नांदगाव पेठ, दि. २६ :** येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये नववर्षाच्या शैक्षणिक सत्राची सुरुवात अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात झाली. यंदाच्या प्रवेशोत्सवात विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव करून तसेच पारंपारिक टोपी घालून विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. या प्रवेशोत्सव कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ग्रामपंचायत सदस्या वृषाली इंगळे, प्रा. मोरेश्वर इंगळे, दिनकर सुंदरकर, सचिन हटवार, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा वैशाली तायडे, शाळेचे मुख्याध्यापक देवेंद्र ठाकरे, उपमुख्याध्यापक राऊत सर आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. नियोजित वेळेत शाळा सत्राला प्रारंभ झाला. सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्रवेशद्वार जवळ उपस्थितांच्या हस्ते स्वागत करून त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. त्यांनतर शाळेच्या प्रांगणात शिक्षकवृंद तसेच मान्यवरांनी पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना प्रवेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांमध्ये प्रवेशोत्सवदरम्यान प्रचंड उत्साह होता.

## एसबीआयच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**मोर्शी, दि. २६ :** भारतीय स्टेट बँकेच्या ७० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून भारतीय स्टेट बँक शाखा मोशी तथा रक्तदाता संघ मोर्शी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५ जून रोजी पार पडलेल्या रक्तदान शिबिरात एकूण ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले.यावेळी प्रत्येक रक्तदात्यास भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी रक्तदान करून आपले सामाजीक दायित्व निभावले. रक्तदान शिबिर ही संकल्पना केवळ रक्तदानाच्या माध्यमातून समाजसेवा करणारी नसून देशासाठी लढणाऱ्या सैनिकांना प्रेरणा देण्यासाठी, देशासाठी बलिदान देणाऱ्या सैनिकांना आदरांजली वाहणारी आहे. भारतीय स्टेट बँकेचे मॅनेजर



जयंत मोरे यांनी या रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. याप्रसंगी रक्तदाता संघाचे अध्यक्ष डॉ. प्रदीप कुऱ्हाडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक तथा रक्तदान संघाचे कोषाध्यक्ष डॉ.प्रमोद पोतदार, जयदेवा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष तथा रक्तदाता संघाचे कार्याध्यक्ष मिलिंद ढोले,कृष्णा वाघमारे,बंटी नागले, पत्रकार अजय पाटील, शेखर चौधरी, शरद कनेर, संजय उल्हे,रवींद्र गुल्हाने,विनोद ढवळे, निखिल ओझा, रामभाऊ कळंबे तसेच भारतीय स्टेट बँकेचे मॅनेजर जयंत मोरे, मधुकर तलपडे,प्रमोद टांगाडगे, हीरामन शिंदेकर, प्रेरणा सवालाखे,निकिता कांबळे,डिंपल वर्मा, शांभवी सिंग,अंकिता बेलेकर, सुबोध तोताळे, रूचीत देशमुख, शुभम जामोदकर, रवी विरुळकर, रोशन विरुळकर, आदित्य गोहत्रे, दीपक बोकड, अंशुल ढोले, छगन बनते यासह गावातील राजकीय मंडळी प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.रक्त संकलनासाठी उपजिल्हा रुग्णालयाच्या स्वाती बुरंगे,रेश्मा बहुरूपी,सुजित वानखडे, बबलू शेख, निलेश शेंद्रे उपस्थित होते.



## श्री साईबाबा विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** श्री आयुर्वेद एवं शिक्षण विकास मंडळ, अमरावती द्वारा संचालित श्री साईबाबा विद्यालय, साईनगर, अमरावती येथे दिनांक २३ जुन २०२५ रोजी शालेय सत्राच्या पहील्या दिवशी शाळेत प्रवेश घेतलेल्या वर्ग ५ वी च्या विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात फुलांचा वर्षाव व ग्रीटींग कार्ड देऊन स्वागत करण्यात आले. तसेच वर्ग ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यर्थ्यांनी वेलकम डॉन्स सादर केला व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक राजेश टावरी सर तसेच पर्यवेक्षक आशिष पसारकर सर यांच्या हस्ते शालेय पुस्तकांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पालक वर्ग, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते. तसेच सर्व ५ ते ८ च्या विद्यार्थ्यांना खिचडी व गोड पदार्थाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक यांनी स्वच्छता व पर्यावरणाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले व शालेय नियमाची माहिती व २०२४-२५ मध्ये विद्यालयाच्या दहावीच्या निकालाबाबत अवगत केले व सर्व दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

# दिव्य ज्योतिर्लिंग अमरावतीत

## हजारो भाविकांनी घेतले दर्शन; एक हजार वर्षे जुन्या सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे अवशेष

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** एक हजार वर्षांपूर्वीच्या दिव्य सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे पवित्र अवशेष रविवारी (दि. २२) अमरावतीत दाखल होताच, शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. आर्ट ऑफ लिव्हिंग आणि वैदिक धर्म संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने हे अवशेष दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात आले. ३० हजार भाविकांनी या अवशेषांचे दर्शन घेतले, तर स्थानिक आश्रमात सकाळी रुद्रपूजा, सत्संग आणि भजनांनी परिसर भक्तिमय झाला. आषाढी एकादशीपर्यंत ही दिव्य यात्रा महाराष्ट्रात फिरणार असून, यानिमित्ताने भक्तांना सतयुगकालीन अध्यात्मिक अनुभूतीचा लाभ मिळणार आहे. एक हजार वर्षे जुन्या सोमनाथच्या दिव्य ज्योतिर्लिंगाचे अवशेष रविवारी आर्ट ऑफ लिव्हिंग, वैदिक धर्म संस्थान, आश्रम



यांच्या संयुक्त उपक्रमाने शहरात दाखल झाले. भाविकांना शहरात पूजा आणि दर्शनाचा लाभ देण्यात आला. ३० हजारांहून अधिक मूळ अवशेषांचे दर्शन घेतल्यानंतर स्थानिक भानखेडा रस्त्यावरील आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रमात रविवारी सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत रुद्र पूजा आणि सत्संग आयोजित करण्यात आला. यानिमित्ताने, आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रमचे परमपूज्य स्वामी सूर्यतेज यांच्या उपस्थितीत ही पूजा करण्यात आली. सकाळी ११.३० च्या सुमारास, १ हजार वर्ष जुने हे मूळ अवशेष परतवाडा येथील रहिवासी प्रदीप खंडेलवाल यांच्या घरी दर्शनासाठी ठेवण्यात आले. येथे दुपारी २ ते ३.३० पर्यंत स्थानिक बानिक भाविकांनी लाभघेतला. यावेळी, 'ऐसा डमरू बजाय भोलेनाथ ने सारा कैलाश पर्वत मगन हो गया...' असे भजन गात संपूर्ण वातावरण भक्तीने भरले होते. शंभर वर्षानंतर दिव्य ज्योतिर्लिंगाचे अवशेष आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेचे संस्थापक पंडित पं. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्याकडे आणण्यात आले. त्यांच्यामुळे आपल्या सर्वांना शहरातील सतयुग काळातील या दिव्य ज्योतिर्लिंगाचे रुद्र पूजा आणि दर्शन घेण्याचा सौभाग्य मिळत आहे. या ज्योतिर्लिंग यात्रेअंतर्गत, ६ जुलै रोजी आषाढी एकादशीपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात ते फिरवले जाईल. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक प्रणित, आयोजन समितीचे सदस्य उमेश गिलोरकर, सचिन माने, गजेंद्र 'गुधे', संदीप देशमुख, संजीवनी देशमुख, डॉ. राजेश गाडवेल, रिद्धी रावल, प्रवीण बुंदेले, गाडगेश्वर शिवमंदिराचे संचालक दयाशंकर केशरवाडे, वनविभागाचे संचालक दयाशंकर जवखेडे, संजीवनी देशमुख आदींनी परिश्रम घेतले. अनिल सिकची, नाना कुकडे, माजी नगराध्यक्ष विलास इंगोले, सुरेश रतावा आदींनी अथक परिश्रम घेतले.

### मोहम्मद गझनीने अनेक वेळा लुटले सोमनाथ मंदिर

परदेशी आक्रमक मोहम्मद गझनीने सोमनाथ मंदिर अनेक वेळा लुटले आणि तेथे असलेले दिव्य ज्योतिर्लिंग नष्ट केले, जे जमिनीपासून दीड ते दोन फूट उंच हवेत तरंगत असे. त्या दिव्य ज्योतिर्लिंगाचे काही अवशेष तेथील अग्निहोत्री पंडितांनी दक्षिण भारतात नेले. १०२४ मध्ये, या अग्निहोत्री पंडितांनी या दिव्य ज्योतिर्लिंगाचे अवशेष शंकराचार्य यांना दाखवले. त्यांनी अग्निहोत्री पंडितांना हे अवशेष १०० वर्षे लपवून ठेवण्याची आणि नंतर ते त्या काळातील दक्षिण भारतातील एका संताला, ज्यांचे नाव शंकर असेल, त्यांच्याकडे सोपवण्याची सूचना केली. अशाप्रकारे अवशेष आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेचे संस्थापक पंडित गुरुदेव श्रीश्री रविशंकर यांच्याकडे आणण्यात आले असल्याचे बंगलुरू येथील स्वामी शरणानंद यांनी सांगितले.

## रानकसायाकडून बाभळीच्या झाडांची अवैधरित्या कत्तल!

अजिंक्य भारत | गजानन ढवळे

**चांदूर बाजार, दि. २६ :** ग्रामपंचायत हद्दीतील रोडलगत असलेल्या दोन्ही बाजूच्या बाभुळीच्या झाडांची अवैध कत्तल करून रानकसाई रात्रीच्या वेळी त्या झाडीची परस्पर विल्हेवाट लावत असल्याचे गावकऱ्यांच्या दररोज निदर्शनास येत आहे.

या जिवंत असलेल्या बाळूळीच्या झाडाचा कत्तल कोनाच्या आशीर्वादाने होत आहे व या झांडाची परस्पर रित्या विक्री करून त्याची विल्हेवाट लावण्यामागे वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल यांचे कनेक्शन कोना सोबत जुळलेले आहे या सर्व बाबीकडे लक्ष देवून त्यावर अंकुश लावणार कोण? असा प्रश्न सामान्य जनतेच्या मनामध्ये घर करून बसलेला आहे. असेच जर वनपरिक्षेत्र अधिकारी कुंभकर्णी झोपेच सोंग घेवून रानकसायांना खुली सुट देत असेल तर जंगत समुह नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. वृक्ष तोडीच्या विरोधात



सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असून सुद्धा रानकसाई कुनाचीही भिती न बाळगता बाळूळी कडू लिंब इत्यादी झाडांची अवैध कत्तल करून परस्पर विक्री करत आहे. या सर्व प्रकारावर वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देऊन रानकसायावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी ही मागणी सुजान नागरीकाकडून जोर धरू लागली आहे.

## विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव



## यवतमाळात राजर्षी शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**यवतमाळ :** आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त यवतमाळात अभिवादन कार्यक्रम पार पडला. शहरातील शाहू महाराज चौकात त्यांच्या प्रतिमेस हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. शहर काँग्रेस कमिटी, तालुका काँग्रेस कमिटी आणि मराठा सेवा संघातर्फे हा कार्यक्रम संयुक्तपणे घेण्यात आला. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष अनिल देशमुख, तालुकाध्यक्ष रमेश भीमनकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवि ढोक, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड, शशिकांत खडसे, सचिन मनवर, सीमा तेलंग, किशोर चव्हाण, कृष्णा पुसनाके यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## उबुंटू इंग्लिश स्कूलमधील मोफत क्रिकेट शिबिराचा समारोप

**यवतमाळ :** येथील उबुंटू इंग्लिश स्कूलतर्फे उन्हाळी सुट्टीत आयोजित निःशुल्क क्रिकेट शिबिराचा समारोप नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. समारोपानंतर शिबिरार्थी विद्यार्थ्यांचा सराव सामना घेण्यात आला. विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले आहे. या शिबिरात प्रशिक्षक पराग पांडे यांनी विद्यार्थ्यांना क्रिकेटचे धडे दिले. विद्यार्थ्यांचे पोषण आणि शारीरिक विकासावरही यावेही विशेष भर देण्यात आला. समारोप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अबासाहेब पारवेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नावलेकर उपस्थित होते. त्यांनी खेळ आरोग्यासाठी किती आवश्यक आहे, हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग खांदवे, कार्यकारी संचालक अनुप यादव, बीसीसीआयचे प्रशिक्षक बाळूनवघरे आणि मुख्याध्यापिका शुभांगी बोरखडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन श्री पडघन यांनी केले. तर आभार पराग पांडे यांनी मानले.



## डॉ. अंजली गवार्ले यांना 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' पुरस्कार प्रदान

**यवतमाळ :** येथील गवार्ले हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. अंजली गवार्ले यांना दिल्ली येथे 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आरोग्य आणि योग क्षेत्रातील त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला.

जागतिक योग दिनानिमित्त दिल्लीतील महाराष्ट्र सदनात झालेल्या कार्यक्रमात पद्मश्री जितेंद्र सिंग, डॉ. एम. के. खान आणि प्रणव मिश्रा यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. विशेष म्हणजे, डॉ. गवार्ले यांना या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणूनही आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी आरोग्य व योग क्षेत्रात केलेल्या सामाजिक कार्याबद्दल हा सन्मान झाला. त्या 'आरोग्य अभियान इंडिया' या महिला डॉक्टरांच्या राष्ट्रीय संस्थेच्या अध्यक्षा आहेत. या संस्थेअंतर्गत डॉ. माधवी पंधरे, डॉ. पुष्पलता इंगळे, डॉ. नेहा व सुमित अग्रवाल, डॉ. सरिता वाडेकर, महिला बाल विकास विभाग, प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सतीश चिरडे, यांना नॅशनल एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराने आरोग्य क्षेत्रातील सामाजिक कार्याची सर्व डॉक्टरांना निरंतर प्रेरणा मिळत राहील असे मत डॉ. गवार्ले यांनी व्यक्त केले.



## यवतमाळचे पर्यावरण कार्यकर्ते विनोद दोंदल यांचा सन्मान

**यवतमाळ :** येथील सामाजिक कार्यकर्ते विनोद दोंदल यांना त्यांच्या पर्यावरण क्षेत्रातील कार्यासाठी राज्यस्तरीय संमेलनात सन्मानित करण्यात आले. चंद्रपूर येथे हा गौरव सोहळा पार पडला. पर्यावरण संवर्धन व विकास समितीतर्फे रविवारी, दि. २२ जून रोजी झालेल्या या संमेलनात खासदार प्रतिभा धानोरकर, खासदार नामदेव किरसान आणि आमदार करण देवतळे आदी मान्यवर उपस्थित होते. दोंदल यांनी वृक्षारोपण, सीडबॉल निर्मिती आणि स्वच्छता अभियान यांसारखी कामे केली आहेत. हा सन्मान म्हणजे आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या कामाचा गौरव आहे, अशी भावना व्यक्त करत त्यांनी प्रकाश खुडसंगे, आशीष भोयर, कैलास कोडापे यांच्यासह संपूर्ण टीमचे आभार मानले.

# उपजिल्हा रुग्णालय कधी सुरू होणार?

## दिग्रसमधील आरोग्यसेवेचा बोजवारा; 'ट्रॉमा केअर युनिट' ची मागणी जोर धरू लागली

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ जय राठोड

**दिग्रस, दि. २६: दिग्रस येथील ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्याची आणि प्रस्तावित 'ट्रॉमा केअर युनिट' तत्काळ सुरू करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. ग्रामीण रुग्णालयातील अपुऱ्या आरोग्य सुविधांमुळेरुग्णांचे होत असलेले हाल थांबवण्यासाठी, ही श्रेणीवाढ गरजेची बनली आहे.**



दिग्रस हे जिल्ह्यातील एक प्रमुख शहर आहे. तरीदेखील येथे आरोग्यसेवा अत्यंत अपुरी आहे. सध्याचे ग्रामीण रुग्णालय रुग्णांची वाढती संख्या पेलण्यास असमर्थ ठरत आहे. अपुरा कर्मचारी वर्ग, बंद अवस्थेतील एक्स-रे मशीन, औषधांचा तुटवडा आणि रुग्णालयाच्या परिसरात पसरलेली घाण व दुर्गंधी, यांमुळे रुग्णांचे प्रचंड हाल होत आहे. त्यामुळे, गोरगरीब आणि सामान्य रुग्णांना नाइलाजास्तव महागड्या खासगी रुग्णालयांत धाव घ्यावी लागत अहो. त्यांना मोठा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरातील अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार मिळत नाही. त्यामुळे याठिकाणी 'ट्रॉमा केअर युनिट'ची नितांत गरज निर्माण झाली आहे.

या रुग्णालयाच्या श्रेणीवाढीसाठी आणि नवीन बांधकामासाठी जागेचा प्रश्नही मार्गी लागला आहे. सध्याच्या रुग्णालयाची इमारत, बाजूच्या संजय गांधी बाल उद्यानाची जागा आणि लवकरच स्थलांतरित होणाऱ्या पशुवैद्यकीय रुग्णालयाची जागा, अशी मोठी जागा उपलब्ध होणार आहे. अनेक वर्षापासून चर्चेत असलेले हे उपजिल्हा रुग्णालय आणि ट्रॉमा केअर युनिट आता केवळ कागदावर न राहता, प्रत्यक्षात सुरू व्हावे, अशी आर्त हाक दिग्रस, मानोरा आणि आर्णी तालुक्यातील रुग्ण आणि नागरिक देत आहेत.

### पालकमंत्री याकडे लक्ष देतील का?

**दिग्रस विधानसभा मतदारसंघाचे आमदार जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड आहेत. रुग्ण सेवेपासूनच त्यांनी आपले राजकीय करिअर सुरू केले आहे, आजही रुग्णसेवेकडे त्यांचे जाणिवेने लक्ष असते. ते या समस्येकडे लक्ष घालतील अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.**

### रुग्ण संख्येत दिवसेंदिवस वाढ

**दिग्रसच्या ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता सदर रुग्णालय सेवा देण्यास अपुरे पडत आहे. अपुरा कर्मचारी वर्ग, बंद एक्सरे मशीन, औषधांचा तुटवडा, यामुळे गरीब व सर्वसामान्य रुग्णांची मोठ्या प्रमाणात परवड होत आहे. नाईलाजाने त्यांना अखेर खासगी रुग्णालयात धाव घ्यावी लागत आहे. यामुळे रुग्णांना प्रचंड मन:स्ताप सोसावा लागतो.**

## एसबीआयतर्फे रक्तदान शिबिर

**उमरखेड, दि.२६:** स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त येथील शाखेतर्फे बुधवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या राष्ट्रव्यापी उपक्रमांतर्गत आयोजित शिबिरात ७५ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून सामाजिक दायित्व जपले. उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

बँकेच्या ७० व्या स्थापना दिनानिमित्त देशपातळीवर ७०हजार युनिट रक्तसंकलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून उमरखेड शाखेत हे शिबिर झाले. उपव्यवस्थापक केदार कोंडे यांनी स्वतः रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाखा व्यवस्थापक प्रदीप फटइंग होते. याप्रसंगी मान्यवरांची उपस्थिती होती.

## आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉलपटू रोहित मेश्राम यांचा यवतमाळात सन्मान

### अमोलकचंद महाविद्यालयातर्फे धनादेश देऊन गौरव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२६:** थायलंड येथे झालेल्या आशिया चषक सॉफ्टबॉल स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या येथील अमोलकचंद महाविद्यालयाचा विद्यार्थी रोहित उमेश मेश्राम याचा शहरात विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला. त्याच्या या आंतरराष्ट्रीय कामगिरीबद्दल त्याचे कौतुक होत आहे.



रोहित नुकताच २ ते ७ जून दरम्यान बँकॉक येथे झालेल्या स्पर्धेत खेळून परतला. या यशाबद्दल अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र भांडवलकर यांनी त्याचा धनादेश व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. यावेळी क्रीडा संचालक किशोर तायडे, संजय पंदिरवाड आदी उपस्थित होते. तसेच, आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी आयोजित केलेल्या एका विशेष कार्यक्रमात खासदार प्रतिभा धानोरकर, माजी मंत्री माणिकराव ठाकरे, शिवाजीराव मोघे, वसंत पुरके यांच्या उपस्थितीत रोहितचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. विजय दर्डा आणि सचिव प्रकाश चोपडा यांनीही त्याचे अभिनंदन केले.

## अल्पभूधारक शेतकऱ्याच्या मुलाचे 'नीट'परीक्षेत यश

### विश्वदीप सावळे याला ५३२ गुण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि.२६:** तालुक्यातील तिवरी येथील एका अत्यल्प भूधारक शेतकऱ्याच्या मुलाने 'नीट' परीक्षेत उज्ज्वल यश मिळविले आहे. विश्वदीप उल्हास सावळे असे त्याचे नाव असून, त्याने ५३२ गुण मिळवून डॉक्टर होण्याचे स्वप्न तो साकार करणार आहे. केवळ दोन एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असल्याने, विश्वदीपची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. मात्र, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने आपले ध्येय गाठले.



त्याचे प्राथमिक शिक्षण तिवरी येथे, पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण दिग्रसच्या दिनबाई विद्यालयात, तर अकरावी-बारावीचे शिक्षण रुई तलाव येथील बळीराम राठोड कनिष्ठ महाविद्यालयात झाले. त्यानंतर नांदेड येथील कोचिंग क्लासमध्ये त्याने परीक्षेची तयारी केली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, त्याने आपल्या वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. त्याच्या या यशामुळे आता सर्वच स्तरांतून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## CAPTION आधुनिकतेची कास....



**दिग्रस : शेतीमधील मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाकडे वळत आहेत. आता सोयाबीन पेरणीसाठी पारंपरिक पद्धतीऐवजी टोकण यंत्राचा वापर करत आहेत. खरीप पेरणीच्या काळात मजुरांची मोठी टंचाई निर्माण होते. यावर मात करण्यासाठी आता टोकण यंत्राचा वापर करताना शेतकरी . (छायाचित्रसेवा : फारूक अहेमद)**

## बसस्थानकात अस्वच्छता

**पुसद, दि. २६:** येथील बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावरील एक भलेमोठे फलक वर्षभरापासून धोकादायक स्थितीत लटकत असून, ते अपघाताला निमंत्रण देत आहे. यासोबतच पसरलेली अस्वच्छता आणि खड्ड्यांमुळे प्रवासी व नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. हे धोकादायक फलक वादळी वाऱ्याने कधीही कोसळून मोठी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मात्र, बसस्थानक प्रशासन याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे. याशिवाय, संपूर्ण स्थानक परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. रोगराईचा धोका वाढला आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नाही आणि जे माठ आहेत, तेदेखील अस्वच्छ आहेत. प्रवेशद्वारावर पडलेल्या मोठ्या खडड्यांमुळे ही अपघात होण्याची शक्यता आहे.

## 'पवित्र पोर्टल' च्या भरतीतून यवतमाळ जिल्हा 'हद्दपार!'

### राज्यभरात शिक्षक भरती, जिल्ह्याला ७५८६ पदांपैकी एकही पद नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** राज्य शासनाच्या 'पवित्र पोर्टल'मार्फत झालेल्या शिक्षक भरतीत, संपूर्ण राज्यातून केवळ यवतमाळ जिल्हा वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राज्यभरात ७५८६ पदांची भरती होत असताना, जिल्ह्याला एकही जागा न मिळाल्याने बेरोजगार तरुणांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र शासनाने नुकतीच पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया जाहीर केली. या अंतर्गत, मुलाखतीसह अंतिम निवड झालेल्या भावी शिक्षकांची नावे संबंधित शिक्षण संस्थांना पाठवण्यात आली आहेत. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेतून यवतमाळ जिल्हा पूर्णपणे वगळण्यात आला आहे. आदिवासीबहुल आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, संवेदनशील जिल्ह्याला शिक्षणाच्या दृष्टीने अधिक सहकार्याची गरज असताना, शासनाने आणि जिल्ह्यातील तीन मंत्र्यांनीही याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. ही केवळ प्रशासकीय चूक नसून, जिल्ह्यावर झालेला हा जाणीवपूर्वक अन्याय आहे, अशी भावना व्यक्त होत आहे. या निर्णयामुळे, नव्याने लागू झालेल्या एसईबीसी (मराठा समाज) आरक्षणाचा लाभही जिल्ह्यातील पात्र उमेदवारांना मिळू शकलेला नाही, कारण जिल्ह्यात एकही पद मंजूर झालेले नाही. यामुळे मराठा समाजासह इतर सर्वच बेरोजगार तरुणांचे मोठे नुकसान झाले आहे. भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे पुन्हा आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, ही शिक्षक भरती प्रक्रिया अधिक लांबणीवर पडून, यवतमाळ जिल्ह्यात भरती कधी होईल, याबाबत गंभीर शंका निर्माण झाली आहे.

# आर्णी तालुक्यात 'प्रशासन आपल्या दारी'

## 'धरती आबा' अभियानांतर्गत विशेष शिबिरे; आदिवासी बांधवांना गावातच मिळताहेत दाखले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ सचिन शिंदे

**यवतमाळ, दि.२६:** केंद्र सरकारच्या 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियाना'अंतर्गत आर्णी तालुक्यात 'प्रशासन आपल्या दारी'हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला जात आहे. याअंतर्गत, तालुक्यातील दुर्गम भागांतील कोलाम आणि इतर आदिवासी बांधवांना आवश्यक असलेले विविध शासकीय दाखले आणि कागदपत्रे त्यांच्या गावातच शिबिरांद्वारे उपलब्ध करून दिली जात आहेत. त्यामुळे त्यांची तहसील कार्यालयातील पायपीट थांबली आहे.



एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (आयटीडीपी), पुसद आणि तहसील कार्यालय, आर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने २४ ते २७ जून दरम्यान या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. अनेकदा, आदिवासी बांधवांना शासकीय कार्यालयात जाऊनही वेळेवर कागदपत्रे मिळत नाहीत. त्यामुळे ते अनेक शासकीय योजनांपासून वंचित राहतात. हीच अडचण दूर करण्यासाठी, शासनाने त्यांच्या गावातच शिबिरे आयोजित करून सेवा देण्यास सुरुवात केली आहे. सध्या शेतीचा हंगाम आणि शाळा-महाविद्यालयांचे प्रवेश सुरू आहेत. त्यामुळे शिबिरांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. या शिबिरांचे आयोजन तालुक्यातील आठ गावांमध्ये करण्यात आले आहे, ज्यात रुद्रापूर, काठोडा, कोपरा, भानसरा, कोळवण, दहेली, मणपूर आणि बेलोरा या गावांचा समावेश आहे. विविध शासकीय दाखल्यांच्या वाटपासोबतच, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, मातृवंदना योजना, जीवनज्योती विमा योजना आणि विश्वकर्मा योजना यांसारख्या योजनांची माहिती देऊन मार्गदर्शनही केले जात आहे. हा संपूर्ण उपक्रम तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांच्या नेतृत्वात राबविला जात आहे.

### अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग

**तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांच्या नेतृत्वात महसूल विभागाची संपूर्ण यंत्रणा या शिबिरांच्या यशस्वीतेसाठी कार्यरत आहे. यात नायब तहसीलदार उदय तुंडलवार, प्रमोद गुल्हाणे, अडगुलवार, पुरवठा अधिकारी सचिन बिन्नोड, पुरवठा निरीक्षक जीवन राठोड, तलाठी दिलीप राठोड आणि सुरेश आठवले यांच्यासह सर्व संबंधित महसूल कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग आहे. त्यांच्या या पुढाकारामुळे आदिवासी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

## मानधन योजनेसाठी अर्ज करा

**यवतमाळ, दि.२६:** कला आणि साहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांसाठी शासनाच्या मानधन योजनेकरिता अर्ज आमंत्रित करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत पात्र १०० कलावंतांना दरमहा पाच हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या कलावंताचे वय ५० वर्षांपेक्षा जास्त असावे, तर दिव्यांग कलावंतांसाठी ही वयोमर्यादा ४० वर्षे आहे. अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ६० हजारांपेक्षा कमी असावे आणि त्याने कला क्षेत्रात किमान १५ वर्षे योगदान दिलेले असावे. विधवा, परित्यक्त्या व दिव्यांग कलावंतांना यात प्राधान्य दिले जाईल.

# शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या; ‘भाऊसाहेब माने जिनिंग’चा ठराव

## दुबार पेरणीचे संकट, कर्जाचा डोंगर; सहकारी संस्थांकडून कर्जमाफीच्या मागणीने जोर धरला, राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्जास विलंब

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**उमरखेड, दि. २६:** सततची नापिकी, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जबाजारीपणाने मेटाकुटीलकुटीला आलेल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, या मागणीसाठी उमरखेड तालुक्यातील दोन प्रमुख सहकारी संस्थांनी पुढाकार घेतला आहे. भाऊसाहेब माने शेतकरी सहकारी जीन-प्रेस आणि कृषी उत्पन्न बाजार समितीने आपल्या संचालक मंडळाच्या सभेत, शासनाकडे संपूर्ण कर्जमाफीची मागणी करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव एकमताने संमत केला आहे.

भाऊसाहेब माने जीन-प्रेसच्या १८ जून रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत, संचालक उद्धव गायकवाड यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा प्रस्ताव मांडला, ज्याला संचालक संजय माने यांनी अनुमोदन दिले. अध्यक्ष शिवाजीराव माने, उपाध्यक्ष जितेंद्र पवार आणि मानद सचिव चिंतामणीराव कदम यांच्यासह सर्व संचालकांनी हा ठराव संमत केला. त्यानंतर, सोमवार, दि. २३ जून रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभेतही, संचालक भीमराव पाटील चंद्रवंशी यांनी मांडलेला कर्जमाफीचा ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावांमध्ये म्हटले आहे की, ‘शेतकरी आत्महत्या, कर्जबाजारीपणा आणि हवामानातील बदलांमुळे येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे.’ ‘सध्या पावसाने दडी मारल्याने दुबार पेरणीचे संकट समोर उभे आहे.’ अशा परिस्थितीत, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी शासनाने तातडीने संपूर्ण कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी या दोन्ही संस्थांनी केली आहे. सत्यशोधक शेतकरी संघाने या दोन्ही संस्थांच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. शेतकर्यांच्या या दोन्ही संस्थांनी घेतलेल्या निर्णयाचे उमरखेड तालुक्यातील शेतकर्यांनी स्वागत केले आहे.



**‘सततच्या नापिकीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला कर्जमुक्त करून हातभार लावण्याची गरज आहे. या दोन्ही संस्थांनी घेतलेला निर्णय कौतुकास्पद आहे.’**

**-डॉ. विजयराव माने,**
**अध्यक्ष, सत्यशोधक शेतकरी संघ.**

### बळीराजा पूर्णपणे हतबल

**या ठरावांमध्ये शेतकऱ्यांच्या बिकट परिस्थितीवर भर देण्यात आला. सततची नापिकी, नैसर्गिक आपत्ती, शेतमालाला नसलेला हमीभाव आणि कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे. त्यातच, यंदाही मृग नक्षत्रानंतर पावसाने दडी मारल्याने दुबार पेरणीचे संकट समोर आहे. अशा परिस्थितीत, शासनाने कर्जमाफी करून शेतकऱ्यांना आधार द्यावा, अशी मागणी केली आहे.**

---

## थोडक्यात

### शिवसेना तालुका प्रमुखपदी अरगडे



**दिग्रस :** माजी नगराध्यक्ष रवींद्र अरगडे यांची पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्राद्वारे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तालुका प्रमुखपदी निवड केली आहे. ते आपल्या निवडीचे श्रेय पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय देशमुख, जिल्हा प्रमुख प्रवीण शिंदे यांना देत आहे. श्री. अरगडे यांच्या राजकीय अनुभव, तालुक्यात दांडगा जनसंपर्क असल्याने यांच्या निवडीने नवचैतन्य निर्माण झाले आहे. आणि पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी मदत होणार आहे.

### स्वयंरोजगार प्रशिक्षण

**यवतमाळ :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे (एमसीईडी) जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी स्वयंरोजगार विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २ ते ८ जुलै दरम्यान होणाऱ्या या सशुल्क प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी आता केले आहे. हे प्रशिक्षण येथील उद्योग भवनात होणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील उद्योग संधी, उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, प्रकल्प अहवाल तयार करणे, बाजारपेठ सर्वेक्षण आणि शासकीय कर्ज योजनांची माहिती दिली जाणार आहे. विशेषतः, 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमां'अंतर्गत कर्ज प्रस्तावांसाठी विशेष मार्गदर्शन मिळणार आहे. या प्रशिक्षणामुळे स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्यांना दिशा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### रुग्णांची हेळसांड

**यवतमाळ :** येथील वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याचा आरोप करत, आम आदमी पार्टीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. रुग्णांची आर्थिक पिळवणूक थांबवून सोयी-सुविधांमध्ये तत्काळ सुधारणा करण्याची मागणी 'आप'ने केली आहे. रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन वारंवार बंद असते, अनेक आवश्यक औषधे व रक्त तपासणी किट उपलब्ध नसल्याने रुग्णांना बाहेरून खर्च करावा लागतो, असा आरोप 'आप'ने केला आहे. या गैरसोयी दूर करून रुग्णांची हेळसांड थांबवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. यावेळी गुणवंत इंदुरकर, विलास वाडे, मनोहरराव जिल्हेकर, शत्रुघ्न आडे, अविनाश धनेवार यांच्यासह 'आप'चे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# अनुदान रक्कम कापणाऱ्या बँकांवर गुन्हे दाखल करा

## पालकमंत्री संजय राठोड यांचे सक्त आदेश; जिल्हा नियोजन समितीची बैठक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि.२६:** शासकीय योजनांमधील अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यातून परस्पर कपात करणाऱ्या बँकांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करा, असे सक्त आदेश पालकमंत्री संजय राठोड यांनी आज जिल्हा प्रशासनाला दिले. जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत, त्यांनी बँकांच्या या मनमानी कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत, प्रशासनाला कठोर कारवाईचे निर्देश दिले.

नियोजन भवन येथे आयोजित या बैठकीत, पालकमंत्री राठोड यांनी जिल्ह्याच्या ७५४ कोटी रुपयांच्या वार्षिक आराखड्याचा आणि खर्चाचा आढावा घेतला. यावेळी, अनेक बँका शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारे अनुदान परस्पर कर्ज खात्यात वळवत असल्याच्या तक्रारीवरून ते आक्रमक झाले. ‘वारंवार सूचना देऊनही ज्या बँका ऐकत नाहीत, त्यांच्यावर गुन्हे दाखल करा,’ असे ते म्हणाले. ‘विशेषतः स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सर्वाधिक तक्रारी असल्याने, या बँकेतील शासकीय ठेवी कमी करून, ज्या बँका सहकार्य करतात त्यांना द्या,’ असे निर्देशही त्यांनी दिले. या बैठकीत जलजीवन मिशनच्या कामांचाही आढावा घेण्यात आला. ‘जी कामे कंत्राटदारांनी सुरूच केली नाहीत, त्यांची फेरनिविदा काढा आणि जे दिरंगाई करत आहेत, त्यांच्यावर कारवाई करा,’ असे आदेश त्यांनी दिले. तसेच, वैद्यकीय महाविद्यालयातील गैरव्यवस्थापनाची जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतंत्र चौकशी करावी आणि यवतमाळ नगरपरिषदेवर नवीन प्रशासक नेमावा, असेही त्यांनी सूचित केले. शेतकऱ्यांना बळजबरीने 'लिंकिंग'करून कृषी निविष्ठा विकणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या बैठकीला जिल्ह्यातील मंत्री, खासदार, आमदार आणि सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखालील या बैठकीला आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार धीरज लिंगाडे, राजू तोडसाम, बाळासाहेब मांगुळकर, किसन वानखेडे, संजय देरकर, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, सहायक जिल्हाधिकारी अमित रंजन, अप्पर पोलिस अधीक्षक पियुष जगताप आणि जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### जिल्ह्याच्या विकासासाठी ७५४ कोटींचा आराखडा

**यावर्षी, यवतमाळ जिल्ह्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून ७५४ कोटी ३८ लाख रुपयांच्या आराखड्यास मंजुरी मिळाली आहे. यात सर्वसाधारण योजनेसाठी ५२८ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ८४ कोटी आणि आदिवासी उपयोजनेसाठी १४२ कोटी ३८ लाख रुपयांचा समावेश आहे. हा निधी मागील वर्षाच्या तुलनेत ७३ कोटी ५७ लाखांनी जास्त असून, तो वेळेत खर्च करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले आहेत.**

---

# वळण रस्ता वाहून गेल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला

## वनोजाजवळील पुलाचे काम रखडले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. २६:** येथील वनोजा गावाजवळ एका पुलाचे काम रखडले असतानाच, रात्री झालेल्या पावसामुळे पर्यायी वळण रस्ता वाहून गेला. यामुळेवनोजा, धानोरा, रोहिणी, दापोरी, येवती, पार्डी, परसोडा, चहांद या सर्व गावांचा संपर्क तुटला असून, नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

राळेगाव-येवती मार्गावरील या पुलाचे बांधकाम गेल्या दोन महिन्यांपासून सुरू आहे. मात्र, पर्यायी रस्त्याची योग्य व्यवस्था न केल्याने, रात्रीच्या पावसात तो वाहून गेला. हा परिसरातील एकमेव वर्दळीचा रस्ता असल्याने विद्यार्थ्यांची शाळा, शेतकऱ्यांची कामे आणि नागरिकांची आवश्यक ये-जा पूर्णपणे थांबली आहे. रुग्णांना वेळेवर दवाखान्यात नेणेही कठीण झाले आहे. या प्रकारामुळे कंत्राटदाराच्या सुस्त आणि मनमानी कारभाराविरोधात ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. बांधकाम विभागाने आणि कंत्राटदाराने या कामात दिरंगाई न करता, तातडीने पर्यायी रस्ता तयार करावा आणि पुलाचे काम पूर्ण करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. ठेकेदाराच्या मनमानी व सुस्त कारभाराबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे कामात दिंगाई न करता ठेकेदाराने लवकराच लवकर काम पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. संबधित बांधकाम विभागाने या पुलाचे काम लवकर व्हाव, यासाठी प्रयत्न करावे, अशी अपेक्षा नागरिकांची आहे.

---

# अंशकालीन स्त्री परिचरांचे मानधन वाढवा

## कृती समिती आक्रमक : आरोग्यमंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.२६:** राज्यातील आरोग्य विभागातील अंशकालीन स्त्री परिचरांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी लढा तीव्र केला आहे. मानधनवाढीच्या मागणीसाठी कृती समितीच्या शिष्टमंडळाने नुकतीच आरोग्यमंत्र्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आहे.

आमचे काम पूर्णवेळ असूनही, आम्हाला अंशकालीन संबोधून तुटपुंजे मानधन दिले जाते, असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. किमान २१हजार रुपये वेतन देणे, सेवेत कायम करणे, प्रसूती रजा मंजूर करणे यांसारख्या मागण्यांचे निवेदन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना देण्यात आले. शिष्टमंडळाशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर, त्यांनी मंत्रिमंडळात हा विषय मांडून तातडीने न्याय देण्याचे आश्वासन दिले. या शिष्टमंडळात बळवंत पवार, बाजीराव मोरे, सुमन मोरे, नीता अडसूळे, संगीता वेदपाठक आदी उपस्थित होते. कृती समितीचे निमंत्रक एम. ए. पाटील यांनी पावसाळी अधिवेशनात प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. निवेदनावर निमंत्रक एम. ए. पाटील, नामदेव चव्हाण, नीलेश दातखिळे, राजू देसले, दिलीप उटाणे, सूर्यमणी गायकवाड, बळवंत पवार, हमीदा शेख, अब्दुल गफार, सुरेश खाडे, प्रवीण मस्तुद, इंदूमती केवट, चित्रा जगताप, दिवाकर नागपूरे, देविदास बोदडे, शालू कुथे, रत्नप्रभा गायकवाड, सुचिता गायकवाड, देविदास जिगे, सुचिता गायकवाड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

# पावसाळ्यात अशी घ्या काळजी

**यवतमाळ, दि. २६:** पावसाळ्याच्या आगमनासोबतच येणाऱ्या डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड यांसारख्या विविध आजारांपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना करून स्वतःला आणि कुटुंबाला सुरक्षित ठेवता येते. डेंग्यू आणि मलेरियासारखे आजार डासांमुळे पसरतात. यासाठी घरात व परिसरात पाणी साचू देऊ नये, आठवड्यातून एकदा कोरडा दिवस पाळावा आणि मच्छरदाणीचा वापर करावा. या काळात सर्दी-खोकल्याचाही प्रादुर्भाव वाढतो. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ. उमेश जोगे यांनी नागरिकांना वैयक्तिक स्वच्छतेसोबतच परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले आहे.

---

# वाठोणा बाजार आरोग्य केंद्रात आग

## औषध वितरण विभागाचे रेकॉर्ड जळून खाक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**राळेगाव, दि. २६:** वाठोणा बाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषध वितरण विभागाला आग लागून, सर्व महत्त्वाचे रेकॉर्ड जळून खाक झाले. ही घटना सोमवारी (दि. २३) रात्री घडली. धक्कादायक म्हणजे, घटनेवेळी प्रभारी वैद्यकीय अधिकारी उपस्थित असूनही त्यांनी दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप इतर कर्मचाऱ्यांनी केल्याने, या प्रकरणाला आता वेगळे वळण लागले आहे. सोमवारी रात्री साडेनऊच्या सुमारास आरोग्य केंद्रात आग लागल्याची माहिती, रात्रपाळीवर असलेल्या ए.एन.एम. यशोधा आडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरून दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी कामावर आलेल्या कर्मचाऱ्यांना, औषध वितरण विभागातील सर्व कागदपत्रे आणि रेकॉर्ड पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत आढळले, ज्यामुळे प्रशासकीय कामकाजात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. या घटनेनंतर, कर्मचाऱ्यांनी एकच खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या आरोपानुसार, घटनेच्या वेळी प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्ज्वला बरबटकर या कार्यालयात उपस्थित होत्या. मात्र, त्यांनी कोणतीही तातडीची कारवाई न करता, त्या थेट यवतमाळकडे रवाना झाल्या. त्यांच्या या भूमिकेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. त्याचबरोबर, रात्रपाळीवर असलेले परिचर मेश्राम हे देखील त्यांच्या कर्तव्यावर हजर नसल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे, या आगीला नेमके जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या गंभीर घटनेची सखोल चौकशी करून, दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे.

---

# वक्तृत्व हे जनसंवादाचे महत्त्वपूर्ण माध्यम

## आनंद गायकवाड; मोफत भाषण कला प्रशिक्षण वर्गाची यशस्वी सांगता

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.२६:** ‘वक्तृत्व ही केवळ बोलण्याची कला नसून, ते लोकांमध्ये आत्मविश्वास आणि सकारात्मकता निर्माण करणारे जनसंवादाचे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे,’ असे प्रतिपादन प्रशिक्षक आनंद गायकवाड यांनी केले. यवतमाळ येथील वैभव नगरातील त्रिरत्न बुद्धविहारात आयोजित १५ दिवसीय मोफत भाषण कला प्रशिक्षण वर्गाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येचे औचित्य साधून, बुधवारी (दि. २५) या प्रशिक्षण वर्गाची सांगता करण्यात आली. यावेळी गायकवाड यांनी शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी कार्यावरही प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंधू धवने होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून आंबेडकरी साहित्य व कला अकादमीचे अध्यक्ष कवडू नगराळे, स्वातंत्र्य सैनिक जवाहरलाल दर्डा विधी महाविद्यालयाचे प्राध्यापक संदीप नगराळे आणि प्रशिक्षणार्थी आशीष वीर व सुजाता नगराळे उपस्थित होते. ‘या प्रशिक्षणामुळे आम्ही आता उत्कृष्ट वक्ते होऊ,’ असा विश्वास अध्यक्ष सिंधू धवने यांनी व्यक्त केला. कवडू नगराळे यांनी, व्यावसायिकतेच्या युगात मोफत प्रशिक्षण देण्याच्या या उपक्रमाचे कौतुक केले. तर, संदीप नगराळे यांनी, महिलांनी या ज्ञान केंद्रातून उद्योजक बनावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी अनेक प्रशिक्षणार्थींनी आपली मनोगते व्यक्त केली. या प्रशिक्षण वर्गाच्या यशस्वीतेसाठी धनराज धवने, रामदास वीर, दीपक ढोणे, किशोर राऊत, निळकंठ दिघाडे, चंद्रशेखर गुजर, मुकुंद वासनिक, प्रमोद बासरे, राजेश बनसोड, अंकुश गेडाम, शारदा वासनिक, छाया वीर, दर्शना वासनिक, अर्चना काळपांडे, रमा इंगळे, राखी नगराळे, अंजू बहापुरे, इंदिरा बनसोड, संतोषी लोटे, नंदा ढोणे, शुभांगी नगराळे, ज्योती गवळी, सोनाली बासरे, सुजाता वावरे, यशोधरा भगत, कुंदा बोरकर, जयश्री वंजारी, निर्मला गुजर, छाया भोवते आणि जयश्री सोनोने यांनी परिश्रम घेतले. अनिता गेडाम यांनी प्रास्ताविक केले. शुभांगी लिहितकर यांनी संचालन केले. बबिता गुजर यांनी आभार मानले.

### मोफत ज्ञानाचे दान

**सध्याच्या काळात, जिथे भाषण कला शिकवणे हा एक मोठा व्यवसाय झाला आहे, तिथे हा पंधरा दिवसांचा प्रशिक्षण वर्ग पूर्णपणे मोफत आयोजित करण्यात आला, ही बाब अत्यंत कौतुकास्पद असल्याचे मत आंबेडकरी साहित्य अकादमीचे अध्यक्ष कवडू नगराळे यांनी व्यक्त केले. त्यांनी आयोजकांचे कौतुक करत, भविष्यातही जास्तीत जास्त लोकांनी अशा निःस्वार्थ उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.**

---

# हरीश जाधवचे 'नीट' परीक्षेत उज्ज्वल यश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि.२६:** अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करत, तालुक्यातील महाळुंगी येथील आश्रमशाळेचा विद्यार्थी हरीश विश्वजित जाधव याने 'नीट' परीक्षेत ५२२ पर्सेंटाइल मिळवले आहेत. त्याच्या या प्रेरणादायी यशामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहेत. तो अनेकांसाठी आदर्श ठरला आहे.

हरीश हा स्व. सजनिबाई आडे माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेचा विद्यार्थी आहे. त्याने आर्थिक अडचणींनाच आपले सामर्थ्य बनवून, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले. त्याच्या या यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. संस्थेचे सचिव अनिल आडे यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेचे उपक्रमशील प्राचार्य भूपाल राठोड आणि सर्व कर्मचाऱ्यांनीही त्याचे कौतुक केले. ग्रामीण भागातील आणि प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी हरीशचा संघर्ष आणि यश एक दीपस्तंभ ठरणार आहे. त्याच्या या यशामुळे समाजात आणि गावात आनंदाचे वातावरण आहे.